# ॥ चैतन्य लहरी ॥



सन १९९३-९४ अंक क्र. ११ व १२

# श्री गणेश पूजा

(दिल्ली ५ डिसेंबर १९९३)

ही पृथ्वी निर्माण केल्यावर श्री परमात्मा श्री आदिशक्तिने प्रथम विचार केला तो शुद्धता आणि पवित्रता प्रस्थापित करण्याचा कारण त्यानंतरच चैतन्यलहरींचा सर्व आकांशात आविष्कार होणार होता.आतां हे परमचैतन्य सगळीकडे अखंडपणे आहे. पण ते कार्यान्वित व्हायला तुमच्यामध्यें त्याची अनुभूति यायला हवी.

तुम्ही स्वतः किंवा तुमचे विचार शुद्ध नसतील तर तुम्ही आंतमधील स्व - स्वरुपापर्यंत जाऊं शकणार नाहीं.ही जी सूक्ष्मता तुम्हाला सहजमधून मिळाली आहे ती श्री गणेशांची कृपा आहे. श्री गणेशांनीच परमचैतन्य दिलं आणि तेच चैतन्य - स्वरुपांत आपल्या सर्व चक्रांवर आहेत.सर्व चक्र पुर्णपणें स्वच्छ व शुद्ध झाल्याशिवाय कुंडलिनीचं उत्थान होतच नाहीं. आणि जरी ती वर आली तरी ती पुन्हां पुन्हां खाली जाईल.

कुंडलिनी आणि श्रीगणेश यांच्यामधें माय-लेकरांसारखं नात आहे. तुम्हाला पुराणांतील गोष्ट माहीत आहेच - श्री पार्वती स्नान करीत होती आणि अंग घासून जो मळ निघाला, त्याच्यांत खूप चैतन्य होतं, त्या मळापासून तिनें श्रीगणेश तयार केला आणि त्याला बाहेर दारापाशीं बसवला.श्रीगणेश असे पूर्णपणें श्री आदिशक्तीनेंच निर्माण केले.त्यामध्यें श्री सदाशिवाचा कांहीही सहभाग नव्हता.आतां तुम्ही हें पण नीट समजूं शकाल की सेंट गॅब्रिअल कुमारी मेरीकडे येऊन तिला म्हणाले होते कीं, "तुझ्या उदरांतुन या जगाला तारणारा जन्माला येणार आहे." एरवी अविवाहित स्त्रीला गर्भधारणा होणं हे फार मोठं पाप समजलं जात.पण भारतीयांना तसं वाटणार नाहीं कारण श्रीपार्वतीने श्रीसदाशिवांचा कांहीही आधार न घेतां एकटीनें श्रीगणेश निर्माण केल्याच ते मानतात. श्री येशू ख्रिस्तांचा जन्म असाच झाला.परदेशी लोकांना हे समजणं आणि पटणं अवघड आहे कारण ते सर्व माणसांकडे फक्त मानवप्राणी म्हणूनच बघतात, आणि आजसुद्धां त्यांच्यामधें या 'अद्वितीय गर्भधारणे' बद्दल प्रखर मतभेद आहेत. सहजयोग्यांनी या परमचैतन्याद्वारे झालेले खूप चमत्कार बघितले आहेत आणि त्यांचा परिणाम आतां कमी झाल्यामुळें तुमचं लक्ष या जगाकडे वळलं आहे.जग म्हणून आपण जे बघतो ती 'माया' आहे, आणि त्याच्या पलीकडे सत्य-विश्व आहे.श्री गणेश हे साक्षात् आहेत हे सत्य त्यांना त्यांच्या हातावरच कळतं.

मी जेव्हां ग्रीसमध्यें होते तेंव्हा मी पाहिलं की आदिशक्तीनें तिथें "अँथिना" चा अवतार घेतला होता, तिथें त्यांनी तिचं मंदीर पर्सेपोलिस (Persepolis) येथे निर्माण केलं आणि त्याच्या दाराशी इथें "बाल-भगवान" (Child God) आहेत असा आलेखही तयार केला.आतां इतका खूप काळ गेल्यामुळें हा बाल - भगवान कोण हे आतां कुणालाच माहीत नाहीं.

परकीय लोकांच्या हल्ल्यांमधें हा वारसा आणि त्याच्या परंपरा या सर्वांचा नाश केला गेला.मग आम्ही आणखी एका ठिकाणी गेलो असताना तिथें दगडाचा एक मोठा गोल तुकडा पाहिला (नाभीसारखा) ज्याच्यातुन खूप चैतन्य वहात होतं आणि त्याच्या मागच्या बाजूला आम्हाला स्वयंभू श्रीगणेश सापडले.

कालान्तरान धर्माबद्दल आस्था ठेवणारे कांही लोक पुढे आले, त्यांना धर्माची पुन्हा प्रस्थापना करायची होती.ज्यामुळें ते शुद्धतेच्या वरच्या स्तरावर पोचूं शकतील आणि 'उद्धारा'ची वेळ येईल तेव्हां ते त्याकरता योग्य ठरतील. त्याचकरतां त्यांनी या गोष्टींकडे जास्त लक्ष दिलं.त्यांना 'मोझेस' कडून आधीच 'दहा आज्ञा (Ten Commandments) मिळाल्या होत्या आणि त्याचं पालन करुन योग्य वेळीं त्यांना आत्मसाक्षात्काराकरतां स्वतःला योग्य बनवायचं होतं.आपल्याकडे सुद्धां गुरु नानकादि थोर संतांनी याचकरता खूप कष्ट घेतले आणि सांगितलं की सर्व माणसांनी धर्म पाळावा.संतुलनांत रहावं आणि पाप न जमवतां फक्त पुण्याचाच साठा करावा.

श्रीगणेशाचं कार्य वेगळं आहे.त्यांच्या प्रभावी शक्तीचा उपयोग करुन ते शुद्धता जपतात.'अबोधिता' ही त्यांची सर्वात मोठी शक्ति.त्याचं हत्तीचं तोंड हे त्यांच्यापाशी अहंकार-प्रतिअहंकार नसल्याचं द्योतक आहे.ते चिरंजीव बालक आहेत.येशू ख्रिस्त हे त्यांचेच अवतार होते.विज्ञानाचा उपयोग करुन आपण सिद्ध करुन दाखवलं आहे की श्रीगणेश मुळांत एक शक्ति आहे आणि तिला जो आकार आला ते गणेशाचं रुप आहे.याचाच अर्थ असा की जे पूर्णपणें शुद्ध आहे, विनम्र आहे, निरागस आहे, स्वच्छ आहे आणि श्रद्धायुक्त आहे अशा हृदयांतच श्रीगणेशजागृत होऊं शकतात. श्रीगणेशांच्या कृपेशिवाय कुंडलिनीचं जागरण होऊंच शकत नाहीं.कुंडलिनी ही श्रीगौरीची शक्ति आहे आणि तिच्या जागरणाच्या प्रत्येक क्षणीं श्रीगणेश तिचं रक्षण करत असतात. एवढचं नाहीं तर एका चक्रातुन पार झाल्यावर ते चक्र ती बंद करते म्हणजे ती पुन्हां खाली येऊं शकणार नाहीं. आपल्यामधें श्रीगणेशाचं स्थान



पुढिल मजकूर मागील कव्हर पानावर

# ख्रिसमस पूजा

## गणपतीपुळे २५ डिसेंबर १९९३

आज आपण येशु ख्रिस्तांच्या जन्मदिन साजरा करणार आहोत.सध्याची वेळ ही आणीबाणीची आहे कारणं कांही ख्रिस्त-विरोधी लोक ख्रिश्चन धर्माचे अधिकारी झाले आहेत जे ख्रिस्तांच्या जन्माबद्दल विरोधी विचार सांगत आहेत. त्यांना तसा अधिकार नाहीच , शिवाय त्यांना साक्षात्कार झालेला नाहीं व परमात्म्याची त्यांना कांही माहिती नाही.ते म्हणतात की मेरी माता कुमारी नव्हती आणि ख्रिस्तांचा जन्म त्याप्रकारे झाला नाही.तुम्ही कोणी तरी त्यांना लिहावं आणि विचारावं की या बोलण्याचा त्यांच्याजवळ काय अधिकार आहे ? या सत्ययुगांत ह्या लोकांचं पितळ उघडं पडणार आहे कारण असं बोलण्याचा त्यांना अधिकारच नाही आणि त्यांना या सर्वव्यापी चैतन्याचीही अनुभूति नाही.दैवी चमत्कार कसे होतात याची त्यांना कल्पना नाही.त्या परमेश्वराच्या कृपेशिवाय असे चमत्कार होऊंच शकत नाहीं तुम्हां सर्वांना परमेश्वराच्या आशीर्वादांची अनुभूति मिळाली आहे.मी एक साधं उदाहरण देते - या वर्षीच्या नवरात्र-पूजेच्या वेळी एक फोटो काढला गेला.त्यात पार्श्वभूमि म्हणून एक पडदा आला ज्याच्या पाठीमागून नाकडोळे असलेला सुर्य डोकावत होता.नंतर आम्ही जेव्हां मॉस्कोला गेलो होतो त्यावेळीं तसाच पडदा स्टेजवर होता.परमचैतन्याने हा पडदा दीड महिना अगोदरच दाखवला होता आणि नंतर त्याची कल्पना करुन तयार केला गेला असे हजारो चमत्कार सांगता येतील.आता आमचं विमान मॉस्को शहरावर उडत असताना बाहेरचं तपमान -२० सांगितलं गेलं.आम्ही मॉस्को विमानतळावर पोचलो तेव्हां ते -१५ होतं आणि नंतर दुपारी -४ झालं दुसऱ्या दिवशीं ते +१० झालं.एरवी जसजसा वेळ जातो तसतसा गारवा येतो पण यावेळी उष्णताच वाढायला लागली.याचा अर्थ सर्व मूलतत्वें आपल्याला मदत करत आहेत.इतर सर्व छोटे-मोठे प्रश्न सुटतात , हे कसं होतं याचं तुम्हाला आश्चर्य वाटेल.

आता प्रश्न असा विचारला जातो की ख्रिस्ताला सुळावर का जावं लागलं ? तो कां नाहीं वाचवला गेला ? ख्रिस्तांना सुळावर जावं लागलं कारण त्यांना आज्ञा चक्र पार करायचं होतं जिथें जागा अरुंद होती.त्यांना क्रॉसमधून पार करुन पलीकडे प्रस्थापित व्हायचं होतं. त्यांच्या जीवनांतला संदेश क्रूस नसून पुनरुथ्यान हा आहे.पुनरुथ्यान होणारच आहे ही गोष्ट त्यांना दाखवायची होती.प्रत्येक अवताराचं एक-एक वैशिष्ट्य असतं.पण त्याचा शेवट पुनरुथ्यानच असतो. ते त्यांनी केलं कारण त्यांना मृत्यु होताच.नाहीं तर तुम्ही स्वतःचचं पुनरुथ्यान कसं करणार ? जगांमधें पुष्कळ गोष्टी अवघड वाटतात पण खऱ्या त्या तशा नसतात. कांही जण असंही म्हणतात कीं ख्रिस्तांनी स्वतःचं पुनरुथ्यान केलं नाहीं.खरं तर ते त्यानंतर बऱ्याच दिवसांनी काश्मीरमधें वारले.याला पुरावा आहे. पण तरीही लोकांचा विश्वास बसत नाहीं कारण त्यांना माहीत असतं की ते बहुमतवाले असले तर त्यांना कांहीही करता येत.पण आतां तसं नाही होणार. खरं तर मोहम्मद साहेबांनीच म्हटलं आहे की ख्रिस्तांच्या मातेच्या पवित्रतेची पूजाच केली पाहिजे.कुराणांत तसं लिहिलं आहे.त्यांनी पहा मातेचा आदर कसा ठेवला.पण बायबलमधें मेरी मातेचा तसा आदर केलेला नाहीं. तिला ते फक्त "स्त्री" समजतात.याचं कारण पॉल , जो ख्रिस्त-विरोधी होता आणि ज्याने ख्रिश्चन धर्मावर तावा मिळवला होता , आणि त्याचा प्रसार करत होता. त्याला स्वतःच महत्व प्रस्थापित करायचं होतं आणि त्यासाठीं त्याने पीटरचा , जो ख्रिस्तांचा सर्वांत वाईट शिष्य होता , उपयोग केला.त्याच्याबद्दल ख्रिस्तांनी सांगूनच ठेवलं होतं "तूं सैतानाच्या कब्जांत जाशील." कांही लोक अजूनही असं विचारतात "कुमारी मातेनें ख्रिस्तांना कसा जन्म दिला ?" भारतात श्रीगणेशांची पूजा करतात.श्रीगणेश आणि ख्रिस्त एकच आहेत. आदिशक्तीनेंच श्रीगौरीरुप घेऊन कौमार्यावस्थेत श्रीगणेश निर्माण केले हे आपण मानतो.आपण विश्वास ठेवतो.पाश्चात्य देशांत विश्वास हा तर्कप्रधान म्हणतात , खोटे-नाटे पुरावे गोळा करणारे पण लोक असतात.वर्तमानपत्रांतून अशा फालतु गोष्टी छापून ते काय मिळवूं पाहतात ? तुम्ही समजून घेतलं पाहिजे की तर्कविवाद करुन तुम्हाला "सत्य" समजणं शक्य नाही. कारण तर्काचं ज्ञान सीमित आहे. बंधनात आहे. अहंकारयुक्त आहे. ख्रिस्ताबद्दलचं सत्य तुम्हाला तर्काच्या माध्यमातून कसं कळणार ? पण आतां आपल्याजवळ शास्त्रीय पुरावा आहे.त्यांनी कार्बन अणूचं मॉडेल केलं , उजवीकडून डावीकडे बघितलं तर स्वस्तिक दिसतं , डावीकडून उजवीकडे बघितलं तर ॐकार दिसतो , खालून बघितलं तर अल्फा व ओमेगा दिसतात.ख्रिस्त म्हणाले होते "मी अल्फा आहे आणि मी ओमेगा आहे.ज्या पद्धतीनें ते अल्फा व ओमेगा म्हणाले तसंच चिन्ह खालून वर पाहिल्यास दिसतं.एका बाजूने ॐकार , एका बाजूनं स्वस्तिक एकत्र आले आणि वर चढून प्रगट झाले की ते अल्फा आणि ओमेगा होतात.ख्रिस्तांच्या विरोधांत असणाऱ्या लोकांच्या डोक्यात हे शिरणारच नाही. परमचैतन्य ही काय शक्ति आहे हें पण त्यांना समजणार नाहीं.तुम्हाला साक्षात्कार मिळाला आहे.तुमचा दुसरा जन्म झाला , हे सर्व कसं झालं ? श्रीगणेश किती शक्तीशाली आहेत तुम्ही जाणता , ख्रिस्त म्हणाले होते (Holy Ghost) च्या विरुद्ध कुणी बोललेलं मला खपणार नाहीं.तसं ख्रिस्तांच्या विरुद्ध मलाही खपणार नाहीं.या एकाच कारणासाठीं या सर्व विरोधी लोकांचा पुरा नायनाट झालेला मला

पहायचाय.आजच्या त्यांच्या या जन्मदिनी मला सांगायला हवं की ख्रिस्त आणि श्रीगणेश एकाच तऱ्हेनें जन्माला आले.ते साक्षात् सुज्ञता होते.पण त्यांनी तीन साडेतीन वर्ष काम केल्यानंतर लोकांनी त्यांना जास्त जगू दिलं नाही.ते भाषण करायचे , पण जे त्यांनी सांगितलं ते नुसतंच बरोबर नाही तर अकलेचं होतं. त्यांत लोकांनी फेरफार केलेही असतील तरीही बायबलमधें लिहिलेलं बरचसं अजून खरं आहे.त्यांनी आयुष्यभर सत्याबद्दलच सांगितलं.त्यांनी पहिल्यांदाच परमेश्वराबद्दल इतकं सुस्पष्टपणे सांगितलं , तुम्हीही हे स्पष्टपणें समजुन घेतलं पाहिजे.

"तपा" मधें आणखी तीन संत झाले.एक बुद्ध आणि दुसरा महावीर. बुद्ध व महावीरांच्या काळामध्ये धर्मापेक्षां कर्मकांडाला फार महत्व आलं होतं. म्हणून ते म्हणाले , " आम्ही देवांबद्दल कांही बोलणार नाही , तर चैतन्याबद्दल बोलूं" सगळ्यांनी हेच केलं. अष्टवक्र , जे जनकाचे गुरु होते ते सुद्धां चैतन्यलहरींबद्दल बोलले.नानकांनी पण तेच सांगितलं.नामदेव जेव्हां औरियामधे गेले तेव्हां ते पण म्हणाले की देवाबद्दल कांही बोलणार नाही - हरीबद्दल बोलूं नका , परमचैतन्याबद्दल बोला.कारण परमचैतन्यापर्यंत गेल्याशिवाय देव भेटणार नाही.येशू ख्रिस्तच पहिल्या प्रथम परमेश्वराबद्दल बोलले.ते फार शूर होते.त्यांना कसलीही भीति नव्हती.त्यांच्या बालपणच्या काळाबद्दल फारसं लिहिलं गेलं नाही. ही दुर्दैवाची गोष्ट झाली. फक्त एकच प्रसंग सांगतात जेव्हां ते एका फारसी माणसाबरोबर वाद घालत होते आणि त्यांच्या विचारातील बुद्धिमता आणि विवेक पाहून तो फारसी माणूस आश्चर्यचकित झाला.

कालान्तरांने या लोकांना जरी मेरीमाताबद्दल आदर नव्हता तरी सर्वसाधारण लोकांमध्यें आदराचीच भावना होती.त्यांचा विश्वास होता की ती देवताच असली पाहिजे एरवी ख्रिस्तांचा असा जन्म कसा झाला असेल ? म्हणून त्यांनी तिला नांव दिलं - मॅडोना - मेडन् - कुमारी.मग ही मॅडोना चर्चमधें आणि इतर ठिकाणी दिसूं लागली. लोकांनी तिला देवता मानलं. तिच्याकडे मातास्वरुपात पाहूं लागले.हे लोकांनी केलं , बायबल किंवा ख्रिश्चन धर्माने नाही. ती महालक्ष्मी होती आणि महालक्ष्मी म्हणूनच आपण तिची पूजा करतो.तीच राधा होती.राधेला एक मुलगा - अंड - होता ज्याचा अर्धा भाग येशू होता आणि अर्धा श्रीगणेश - पण जन्म झाल्याबरोबर 'बापा' करतां रडूं लागला. वडील श्रीकृष्ण होते.विशुद्धीचं बोट म्हणजे तर्जनी.येशू जेव्हां आकाशाकडे हात करतात तेव्हां तर्जनी म्हणजे श्रीकृष्ण आणि मधलं बोट (इंग्रजी (V) अक्षरासारखं) श्रीविष्णु दाखवतात.आई ही राधा - 'रा' म्हणजे शक्ति आणि 'धा' म्हणजे धारण करणारी.तिनेंच त्याला "येशू" नांव दिलं.हेब्रूभाषेत तें (Yesu) असं लिहितात आणि मराठी बायबलमधेंही , जे हेब्रूचं भाषांतरच आहे. (Yesu) असंच नांव आहे.येसु हे श्रीकृष्णाच्या मातेचं नांव 'यशोदे'चा येशू किंवा जीजस् आणि ख्रिस्त हा शब्द म्हणजे कृष्ण. जीजस् , येशू , ख्रिस्त ही नांवे तिनें त्याचं आणि कृष्णाचं कसं जवळचं नांत आहे हे आपल्याला कळण्यासाठी दिली. श्रीकृष्णांचा अवतार भारतात झाला कारण अमेरिकेत अवतार घ्यायला तें तितके कडक नव्हते.अमेरिकेतल्या लोकांना तालतंत्र नाही , मर्यादा माहीत नाहीत , धर्माचं तर नावंच नको.ते फार अधर्मी लोक.म्हणून येशू ख्रिस्त जो पूर्णपणें शुद्ध , बुद्धिमान आणि श्रीकृष्णांसारखी लीला न करणारा हेच तिथे अवतार घेऊन आले.श्रीकृष्ण म्हणायचे की ही लीला श्रीरामांच्या कठोर कर्तव्याचा परिणाम कमी करण्यासाठीं आहे.येशू ख्रिस्त तसं कांही म्हणाले नाहीत.तरीही जिथें जिथे ख्रिश्चन धर्म आहे तिथे तिथे ही लीलाच आहे ! अधर्म ही लीला , कसं वाट्टेल तसं वागलं तरी ती लीला - आम्ही निष्पाप ! किती विचित्र ! हाच मुर्खपणाचा कळस , स्वतःचा नाश करणारी प्रवृत्ति.

भारतीय लोकांना धर्म म्हणजे काय हे चांगलं माहीत आहे , चूक कोणतं बरोबर कोणतं हे ते ओळखतात.इथें आलेल्या ख्रिश्चन सहजयोग्यांचं मला जास्त कौतुक आहे कारण ते ज्या देशांतुन आले तिकडे कुंडलिनी हे काय आहे याची कांहीच कल्पना नाहीं , तरी पण या लोकांनी खुप मेहनत घेतली आहे आणि सहजयोगांत चांगली प्रगति केली आहे.हे परमेश्वराचे आशीर्वाद आहेत कारण ते प्रामाणिक आणि शुद्ध इच्छा असलेले होते.ख्रिस्तांमुळेंच ते सहजयोगांत आले , त्यांच्याशिवाय हे कुणाला शक्य नव्हतं.इथें श्रीगणेश हे एक तत्वचिन्ह आहे पण तिकडे त्यांनी अवतार घेतला.त्यांनी धर्म म्हणजे काय आणि त्याचं पालन कां करायचं हे लोकांना सांगितलं.तरीही ते लोक पैसा या विषयाकडे अतिशय झुकलेले आहेत , परमेश्वराच्या नांवाखालीं पैशाकरतां त्यांनी काय नाही केलं ? आणि हे ख्रिस्तांच्याच जन्मभूमीमधे हे आणखी विशेष.त्यांचा जन्म गवतानें भरलेल्या तबेल्यांत झाला. अत्यंत गरीब घराण्यांत आणि तेसुद्धां माणसं राहूं शकणार नाहींत अशा ठिकाणीं.जन्म होण्यासाठी मोठमोठ्या घरांची किंवा राजवाड्यांचीच जरुर असते काय ? शुद्ध जीव कुठेंही जन्माला येतो. एवढा थोर माणूस आणि अशा परिस्थितीत जन्मला ! पण आतां सगळंच बदललंय , लोक उपभोगवादी झालेत , पैसा-पैसा फक्त आणि त्याच पैशापायीं स्वतःचाच नाश करायला निघालेत. समतोलपणा हा प्रकारच नाही.' पाश्चात्य देशांत आजकाल हेच चाललं आहे.आणि आपणही त्याचंच अनुकरण करत आहोत: आपण सुधारलेले हा टेंभा मिरवीत त्यांच्याच विनाशकारी मार्गानें चालले आहोत ! विनाशाकडे वाटचाल !

आपण मुलांच्या बाबतीत फार जपलं पाहिजे , देवाच्या नांवाखाली चाललेले त्या लोकांचे घाणेरडे प्रकार या संवयी उचलूं नयेत.एवढं सार असुनही आपल्याकडे खुप सहजयोगी झाले.त्यांना परमेश्वराचे आशीर्वाद मिळाले , परमचैतन्य आणि ख्रिस्त त्यांना समजले.तुम्ही हिंदू असा नाहीं तर आणखी कोणी , ख्रिस्त सर्वांचे आहेत.साऱ्या विश्वाचे आहेत.साऱ्या विश्वाचा ते आधार आहेत.देवी महात्म्यांत हेच सांगितलं आहे हे लक्षांत घ्या.ख्रिस्ताचं अनुकरण करणाऱ्या कोणालाही कमी लेखणं बरोबर नाहीं.आपण श्रीगणेशांप्रमाणे ख्रिस्तांबद्दल तीच भक्ति , श्रद्धा , प्रेम व शरणागती ठेवली पाहिजे.ख्रिश्चन लोकांच्यात ख्रिस्ताबद्दल इतकी श्रद्धा असेल असं मला तरी वाटत नाहीं पण सहजयोग्यामधे ती आहे कारण त्यांची श्रद्धा प्रकाशित झाली आहे.तुमचा स्वतःवर , सहजयोगावर आणि त्या जीवनावर पूर्ण विश्वास असला पाहिजे.हे जोपर्यंत होत नाहीं तोपर्यंत तुम्ही खरे सहजयोगी नाहींत.अजूनही पुष्कळ लोक काठावर उभे राहिल्यासारखे आहेत , त्यांच्यामधें अजून हा योग रुजायचा आहे , त्यांना समजलं तरी वरवर समजतं , परमेश्वराच्या प्रेमसागरामध्यें ते वरवर तरंगत राहतात , खरं म्हणजे हे प्रेम लोकांना वाटत राहण्याची तळमळ तुमच्यांत यायला हवी.इतर कांही लोक भौतिकवाद अजूनही मानतात.ते वाम-मार्गानें पैसा मिळवायचा विचार अजूनही करतात व या अर्थानें ते भौतिकवादी , आणखी कांही मुलाबाळांत गुरफटलेले असतात.ही आसक्ति फार वाईट.ख्रिस्तांना ती नकोच होती , आपण ख्रिस्तांना नीट समजलं पाहिजे , यांचा आदर करतांना या भौतिक जगाच्या गोष्टी टाकून दिल्या पाहिजेत.

मी असं म्हणत नाहीं की तुम्ही हिमालयात जा , संन्यास घ्या वा बुद्धांसारखें मुलाबाळांना सोडून जा , पण संसाराबद्दल एक अलिप्तता ठेवा.तुम्ही सर्व जण या जगाच्या पाठीवरच राहणार आहात पण अनासक्त होण्याची संवय करा. सुरुवातीला " माझे वडील आजारी आहेत , माझी आई आजारी आहे " इ.ठीक होतं पण आता नाहीं.आतां सहजयोगानें खूप वेग घेतला आहे म्हणून मागे पडणारे बरेच असतील.म्हणून काळजी घ्या.या भौतिक व प्रापंचिक गोष्टींमधे गुंतून जाऊ नका.विशेषकरुन भारतीयांना आश्रमांत रहायला आवडत नाहीं.त्यांना आपलं घरचं आवडतं म्हणजे त्यांना बायकोवर हुकुमत गाजवतां येते आणि

खाण्यापिण्याचे चोचले पुरवले जातात.म्हणूनच मला वाटतं ही उपासाची पद्धत भारतात चालू झाली - जिभेची आसक्ति कमी करण्यासाठी.उपास करायचा आणि खाण्यापिण्याच्याच गप्पा मारायच्या काय अर्थ आहे यांत ? ख्रिस्तांनी ४० दिवस उपास केला आणि सैतान मोहांत पाडू लागला तर त्यांनी फक्त दुर्लक्ष केलं.

भौतिकवादाचे वेगवेगळे परिणाम दिसतात. पाश्चात्यांमधे " माझं घर , माझी पत्नी , माझी मुलं " म्हणून तर पौर्वात्यांमधे " मी काय खावं , माझं घर व कुटुंब कसं असावं " या तऱ्हेनें हे अजूनही असंच चालव्यू.फक्त तुमची उन्नति जसजशी सूक्ष्म होते तसतसं हे पण सूक्ष्म होत जातं. आणि या गोष्टी संपतही नाहीं.माझ्या माहितीच्या एका सहजयोग्याला सहजयोगाचाच धंदा करायची कल्पना सुचली. एवढांसुद्धां तावा स्वत:वर नाहीं ठेवता येत ? हें सोपं आहे. ख्रिस्तांनी केलं.तुम्ही त्यांची पूजा करणार आहात तर आधी या गोष्टी कमी करा.कारण ते जरुरीचं आहे.कांही कमी पडणार नाही.कुठेंही राहता येईल.आता बघा मी कांहीही मागत नाहीं.माझा देह कांही मागत नाहीं.म्हणून मी कधीं थकत नाहीं.मी इथें तुमच्यासारखी राहते.एवढंच काय मी इथेंच झोपू पण शकेन.एकदा मी आगगाडीतून पुण्याहून हैद्राबादला चालले होते.किती दचके आणि धक्के ! पण मला तर एका ग्रहावरुन दुसऱ्या ग्रहाकडे चालल्यासारखं वाटत होतं ! दुसरा कोणी असतां तर हे दचके खाऊन खूप चिडला असता.पण मला तर मजाच वाटत होती एका ग्रहावरुन दुसऱ्या ग्रहावर उडण्याची ! तर माझी प्रतिक्रिया ही अशी अगदी वेगळी असते. आणिबाणीचा प्रसंग आला की मी निर्विचार होते आणि मग एक प्रकारे खूप शांति सगळीकडे जणुं पसरु लागते.जर तुम्ही खऱ्या अर्थानें अलिप्त राहिलांत तर तुम्हालाही याचा अनुभव मिळेल.

आतां मला मुलं आहेत , नातवंड आहेत.मी कधीं त्यांना फोन करत नाहीं. ते मला करतात.मी माझ्या नवऱ्याला पण कधीं फोन करत नाही.टेलिफोन करणं हा वेळेचा अपव्यय आहे.माझ्या आंतमधें टेलिफोनची व्यवस्था आहे आणि तुमचं सर्व ठीक चाललं आहे हे मला समजतं.पण जोपर्यंत तुम्ही खऱ्या अर्थानें अलिप्त होत नाहींत तोपर्यंत हे जमणं कठीण आहे. आतां माझ्या माहितीतले कांही सहजयोगी आहेत जे कधीकधी एकदम बेभान होऊन मारामारी करायचे.मी तर माझ्या मुलांवरही कधी हात उगारला नाहीं.तुम्हाला माहीतच आहे.खरं तर ते चूक आहे . कुणीही हात उगारणं किंवा दुसऱ्याला स्पर्श करणं बरोबर नाहीं. कधीं रागवू नये , कधी ओरडू नये.नाही तर तुम्ही कसे खाली जाल तुम्हालाही कळणार नाहीं.नेहमी शांत , स्वस्थ पण करुणायुक्त रहा.जर आसक्त असाल तर तसंच करत बसाल.म्हणून तुम्ही रागावणार नाहीं याची काळजी घ्या.दुसरा तसं वागत असला तर मला सांगा.ख्रिस्तांकडे पहा - एकदां चर्चच्या बाहेर कांही लोक विक्री करत होते तर त्यांना राग आला आणि हंटर घेऊन त्यांना बडवलं.पण ते ख्रिस्त होते ! आणि ज्या लोकांनी त्यांना सुळावर दिलं त्यांच्याबद्दल ते परमेश्वराला म्हणाले " हे देवा माझ्या बापा ! त्यांना क्षमा कर . ते काय करताहेत हे त्यांना माहीत नाही ! "

त्यांच्यापासून शिकण्याची हीच गोष्ट - त्याचं चारित्र्य , किती क्षमाशील व प्रेमळ.त्यांनी लोकांशी आपुलकीने वागून त्यांना उद्धाराचा मार्ग दाखवला. त्याकाळी सर्वत्र अनाचार आणि गोंधळ माजला होता तरी त्यांनी " सत्य , आत्मा , जागरण " याबद्दलच सांगितलं.ज्या लोकांना त्यांनी सांगितलं ते सर्व आंधळे होते तरी ते बोलत राहिले.बायबलमध्यें बऱ्याच कहाण्या आहेत.एक अशी आहे की 'उद्धारांच्या वेळी ' मेलेल्या माणसाचं शरीर थडग्यांतून बाहेर पडतं.फक्त ख्रिश्चन लोकांमधेंच नाहीं तर मुसलमान आणि ज्यू लोकांतही ही समजूत आहे.जरा विचार करा - थडग्यामधें कालान्तरानें काय शिल्लक राहतं - तर हाडं फक्त , मग ही हाडं जर बाहेर आली तर त्यांना साक्षात्कार कसा देणार ? विचार केल्यावर समजेल की या कहाण्या आहेत.तर्कानें ते सिद्ध होऊं शकत नाहीं.नल-दमयन्ती आख्यानांत स्पष्ट सांगितलं आहे की कलीयुगामधें दऱ्या-खोऱ्यांत आणि डोंगरात जाऊन साधना करत असलेले सर्व साधक पुनर्जन्म घेऊन येतील आणि त्यांना आत्मसाक्षात्कार मिळेल.पण ज्यांना तो मिळाला आहे त्यांनी त्यामध्यें प्रस्थापित व्हायला हवं.त्यांची कुंडलिनी जागृत होईल हे म्हणणं तर्कसंगत आहे कारण आतां तसंच होत आहे.म्हणून आतां लोकसंख्या भरमसाट वाढत आहे आणि त्यांतल्या किती जणांना साक्षात्कार मिळेल हे मला सांगता येणार नाही.पण ज्यांना तो मिळाला आहे त्यांनी त्यांत खोलवर रुजायला पाहिजे आणि इथंच मला दिसतं की कांही सहजयोग्यांमधें अजून आसक्ति सूक्ष्मस्वरुपांत शिल्लक आहे.म्हणून सध्या तुम्ही सर्वजण ख्रिस्तांच्या गुणांना , जे महान आहेत , शरण जावं असं मला वाटतं , त्यांतला त्यांचा सर्वांत उच्च गुण म्हणजे त्यांना आत्म्याच्या विरोधांत असलेली कुठलीही गोष्ट अजिबात खपत नाहीं.

मी निक्षून सांगत आहे तुम्ही सहजयोगी असूनही कांही चुकीची गोष्ट कराल तर कांही मर्यादेपर्यंत ते चालवून घेतील. आपल्याला कुणाची चूक दाखवायची असेल तर तेही सहजयोगाच्या पद्धतीने केलं पाहिजे , रागावून , उद्धटपणें नाही.अजूनही सहजयोगांत रागीट लोक असल्याचं मला समजलं तर मी फार अस्वस्थ होते.याला कारण खराब लीडर आणि त्याकरतां तुम्ही उपचार केले पाहिजेत.पण लक्षांत ठेवा की असं वागणं चालणार नाहीं.या लोकांनी दोन दिवस उपाशी राहून स्वत:लाच शिक्षा करुन घेतलेलं बरं.रागाचा पारा चढणं ही सगळ्यांत वाईट गोष्ट आहे , श्रीकृष्ण म्हणतातच की हा रागच सर्व संकटांचं मूळ आहे.म्हणून आपला रागीटपणा आपण आवरला पाहिजे आणि लक्षांत ठेवलं पाहिजे की ख्रिस्त हे साक्षात् क्षमारुपच होते.

आज आपण त्यांची पूजा करत आहोत.त्यांना सुळावर चढवणाऱ्यांनाही ते ज्यू नव्हते तर रोमन होते - त्यांनी क्षमा केली. रोमन सत्तेनेंच त्यांना सुळावर दिलं.या प्रवृत्तीमुळें लोक त्यांचा द्वेष करू लागले.त्रास देऊ लागले आणि त्यांचा छळ करुं लागले.याची प्रतिक्रिया ज्यू लोकांमध्येही उमटली आणि त्यांनी पण तसाच प्रकार केला. शेवटी - असं कधीच केलं नव्हतं - मॅजिस्ट्रेटनें त्या सर्व समुदायाला विचारलं की त्यांना कुणाला सुळावर द्यायचं आहे ? या माणसाला की एका चोराला - असं कधीच झालं नव्हतं.मॅजिस्ट्रेटनी स्वत:च निर्णय करायचा असतो.तेव्हां हे सर्व ज्यू लोकांना शापित करण्यासाठीं झालं.

पण आता देवकृपेनें पुष्कळ ज्यू सहजयोगांत आले आहेत आणि इस्त्रायल मधेंही आपली केन्द्र आहेत.अमेरिकेत आलेले ईराणमधले लोकही , त्यात ज्यू आणि मुसलमान पण आहेत.आता बऱ्याच संख्येने सहजयोगांत आले आहेत. तुर्कस्तान आणि भारतातले सूफी पण आल्याचं मला कळलं आहे. आतां सर्वांच्यामधेंच ते कार्यान्वित होणार आहे.ख्रिस्तांना आपण नीट समजून घेतलं पाहिजे , त्यांच्या जीवनाचा अर्थ जाणला पाहिजे , त्यांनी सर्व जगावर कसं प्रेम केलं ते लक्षात घेतलं पाहिजे.त्यांचा जन्मच जणुं सुळांवर जाण्यासाठी झाला , त्यांना हे माहीत होतं आणि त्यांनी ते करुन दाखवलं.त्याचं जसं वर्णन केलं गेलं आहे ते बरोबर नाहींये.ते खूप सशक्त , धडधाकट व उंच पुरुष होते.त्यांना क्रॉस घेऊन जावं लागले.त्या लोकांनी त्याचं टी.बी.पेशंटसारखं चित्र केलयं खरं पण त्यांनाच तो क्रॉस नेता आला असता कां ? अशा तऱ्हेनें त्यांच्या व्यक्तीमत्वाला कमी दाखवण्याचा , त्याचं चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला गेला.पण तुम्हां सहजयोग्यांनी त्याचं खरं स्वरुप जाणलं पाहिजे , त्यांचा योग्य आदर केला पाहिजे , त्यांच्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे.ते तुमचे थोरले बंधू आहेत , आणि श्रीगणेशरुपात त्यांचा हाच अवतार आहे.तुमच्या सर्व परिस्थितीत , सर्व कठीण काळी ते तुमचा सर्व तऱ्हेनें सांभाळ करणार आहेत.आपण त्यांना पूर्णपणें शरण जाऊं या आणि त्यांची क्षमाशीलता आपल्या जीवनांत उतरवूं या.

## परमपूज्य श्री माताजींच्या २४ मार्च १९९० रोजी सायंकाळी केलेल्या भाषणाचा अनुवाद

**"सत्याच्या शोधात असणाऱ्या सर्व साधकांना आमचा नमस्कार"**

माझ्यावरील आपल्या प्रेम व भक्ति यांची मला अनुभूति आहे. स्वतःकडे मी पाहिलं तर मला आश्चर्य वाटतं की त्याचेसाठी (प्रेम व भक्ति) असं मी काय केलं आहे ? जी काहीं मी आहे ती आहे.त्याचं एवढं विशेष काय आहे ? या जीवनांत मी काहीच साध्य केलं नाही.पण मी म्हणायलाचं हवं , की तुम्ही सहजयोगात जे मिळवल आहे त्यावद्दल मी तुमची खरोखर आभारी आहे.हे घडून येणं महत्वाचं होत व त्याची वेळ आली होती.

आपण देश विदेश , राजकारण , अर्थकारण व इतर सर्वांचे विषयी बोलतो. तेव्हा सर्व सत्वावर (इसेन्स) कार्यान्वित होतात व या सर्व पद्धतिंच्या , मूलतः , सत्वातच (इसेन्स) अडचण आहे. आणि जर तुम्हाला सत्वाचंच ज्ञान झालं तर परिस्थिती हाताळणं अतिशय सोपं आहे.तुम्ही जाणताच की कुंडलिनी आपल्यातील सत्व आहे.जर आपल्या कुंडलिनीचे उत्थापन केलं तर सर्व चक्रे प्रकाशित करता येतात व आपले शारिरीक , मानसिक , भावनिक व अध्यात्मिक हित साधता येत.त्याच प्रमाणे मानवी प्रयत्नाच्या या क्षेत्राच्या मुळाशीच व सत्वातच काहितरी घोटाळा झाला आहे.उदा.लोकशाही पहा - तिच्या सत्वात जी चूक आहे ती ही कीं , तिचा कल पैसा संपादन करण्याकडे आहे.आत्मा मिळविण्याकडे नाही.त्यामुळे सर्वांचाच व्यापार होत आहे कारण मुलतः या प्रणालीच्या आंतच हा प्रश्न बसलेला आहे. मग त्याला कोंब फुटतो व तो मोठा होऊन त्याचा वृक्ष बनतो व त्याला फुले येतात.त्यांच प्रमाणे लोकशाहीला (वृक्षाला) आज या सर्व समस्यांची फुले आली आहेत.

दुसरे उदाहरण साम्यवादाचे घ्या.त्याचा प्रश्न हा कीं तीकडे सत्ता संपादन करण्याकडे कल आहे.सत्ता संपादनाच्या प्रवृत्तीमधे , इतकी सत्ता मिळविली जाते की त्या व्यक्तिवरील सर्व नियंत्रण सुटते व ती व्यक्ति अतिशय क्रूर व अत्याचारी होते , जसा स्टालिन होता.कारण ईश्वरी सत्ता संपादनाची प्रवृत्ती नाही.

मानवी कायदे घ्या , मानवी कायद्यांमधे मुळातच एक अडचण आहे. यामधे न्याय हा मानवी जीवन मुल्यांच्या मूलभूत कल्पनांवर आधारित असतो. मानवी जीवन मूल्ये आपल्यामधील व्हॅलंसी (धर्म) आहे. जसं कार्वनला चार व्हॅलंसी (धर्म) असते.तसेच आपल्यामधे व्हॅलंसी असते.या व्हॅलंसीची (धर्म) मूलभूत संख्या दहा असते. जेव्हा आपण या व्हॅलंसी ओलांडून जातो अथवा त्या नष्ट करण्याचा प्रयत्न करतो अथवा त्याचा दुरुपयोग करतो , तेव्हां आपण निसर्गाच्या नावाखाली मानवतेच्या नावाने अथवा ईश्वराच्या नावाने वेकायदेशीरपणे वागतो.परंतू मानवी कायद्यांच्या मुळातच अडचण आहे.ती ही की लोक प्रकाशित नाहित.त्यांच्या व्हॅलन्सी (धर्म) प्रकाशित नाहित.परंतू जो पर्यंत त्या व्हॅलन्सी (धर्म) प्रकाशित होत नाहित पर्यंत कोणत्याही धर्माचं पालन त्यांनी करो , कोणत्याही ग्रंथाचे वाचन करोत कोणतेही सत्कार्य त्यांनी करु दे त्यांच्या शांती अहिंसा वगैरे कितीही महान कल्पना असु देत , मुळातच त्यांच्यांमधे ही अडचण बसली आहे , कीं त्यांच्या व्हॅलन्सी (धर्म) प्रकाशित नाहीत.

परंतू सत्वतः ती मानवी चूक नाही ती आपल्यातील अज्ञानाची चूक आहे.आपल्यातील अज्ञान हे आहे कीं आपण आत्मा नाही हे आपण जाणत

नाही.हे सर्व नियम देवदूतांसाठी आहेत.ज्यांच्या व्हॅलंसी (धर्म) प्रकाशित झाले नाहीत अशा माणसांसाठी नाहीत, म्हणून, प्रथम सहज योगात तुम्हाला म्हणावं लागतं मी निरपराधी आहे, मी कोणतीही चूक केली नाही, मी अगदी चांगला आहे, स्वतःमध्ये आत्मविश्वास आणा कारण मानवी कायदे, विशिष्ट कायदा तुम्ही जाणत नाही म्हणून विनाकारण तुम्हाला गुन्हेगार ठरवतील, तुम्हाला वकील व चार्टर्ड अकौंटंट जवळ बाळगावे लागतील, नाहीतर न जाणो केव्हा तुम्हाला जेलमधे जावे लागेल.

पण तुम्ही जर प्रकाशित व्यक्तिमत्वाचे असाल तर तुम्ही कोणताही गुन्हा करीत नाही.कारण सत्वातच (ईसेन्समधे) तुमच्यामधिल सर्व धर्म प्रकाशित झाले आहेत, आणि योग्य काय व अयोग्य काय हे तुम्ही जाणता. पण तरी सुध्दा ख्रिस्तांना क्रुसावर चढवलं गेलं, सॉक्रिटिसना विष पाजलं, या सर्व महान व्यक्तिंना कायदे बनविणारांचा व धर्म मार्तंडाचा, जे धर्माला जबाबदार होते ज्याना फक्त आपणच योग्य आहोत असं वाटत होतं, त्यांचा छळ सहन करावा लागला. आदि शंकराचार्यांना फार त्रास सहन करावा लागला ज्ञानेश्वर इतके विद्वान होते, पण त्यांना सुध्दा किती त्रास सहन करावा लागला.

तर मानवांत मूलभूत अडचण ही आहे कीं ते प्रकाशित नाहीत त्यांची मज्जासंस्था धर्माने भरली नाही.त्याचे पोषण नाही.तुमच्यात धर्म असेल तर तुम्ही कोणताही गुन्हा करीत नाही.कदाचित कायदे बनविणाऱ्यांच्या नजरेत ती व्यक्ति गुन्हेगार असेल, कारण जे कायद्याचे सुत्रधार आहेत ते स्वतःच आंधळे आहेत.माणसे प्रकाशित जीव नाहीत.हे कायदे बनविणारे लोक समजत नाहीत.हीच मानवी कायद्यांची मूलभूत समस्या आहे.त्यांनी हे समजून घ्यायला हवं. अर्थात मानवी कायदे, चेतनेत न उतरलेल्या परमेश्वरी ज्ञानातून घटीत झाले आहेत.तेव्हा कोणतीही शिक्षा दिली तरी सुधारणा होणार नाही.उलट ते अधिक वाईट होतील.कदाचित भीतीमुळे ते कायद्याचं पालन करतील पण त्या भीतीचाही उपयोग नाही कारण त्यांनी आपल्या स्वातंत्र्यात व कायद्याचे पालन करायला हवं या समजूतदारपणातून ती आली नाही. तेव्हा काय करायच तर त्यांना सहज योगाची शिक्षा द्यायची काहीतरी करुन सर्व गुन्हेगारांना तुम्ही सहज योगात आणू शकाल, तर एक दिवस ते फार चांगले लोक बनतील.आपल्याकडे वाल्मिकीच उदाहरण आहे. जो आधी दरोडेखोर होता व मग एक महान कवि झाला.

तेव्हा आधुनिक काळाचं, कलीयुगाचं सत्व हे आहे कीं ते कृत युगाच्या प्रभावाखाली आहे. कृत युगाच्या काळात, परमेश्वरांची सर्व व्यापी शक्ति अनेक गोष्टी घडविणार आहे, आणि त्याचे सत्व (**Essence**) हा आहे की ती मानवाचे परिवर्तन करणार आहे. ही कलियुगाची महानता आहे. नलदमयंती, अख्यानांत असं सांगितलं होतं, की नलाने एकदा कलीला पकडले व तो त्याला ठार मारणार होता, पण कलिने त्याला स्वतःच महात्म्य सांगितले कीं आज जे दऱ्या डोंगरांत सत्याचा शोध घेत आहेत ते कलियुगात गृहस्थाश्रमी म्हणून जन्म घेतील व त्यांना साक्षात्कार मिळेल.त्यांना सर्व ज्ञान मिळेल.कारण हे कलियुगाचे सत्व आहे. जेव्हा लोकांना या सर्व गोष्टी प्राप्त होतील, कारण त्यांच्यावर कृत युगाचा प्रकाश कार्य करीत आहे. कृत युगाच्या प्रकाशांत गोष्टी उघड होत आहेत. प्रत्येक गोष्ट उघड होत आहे, व ती लोकांना समजत आहे. लोक जरी साक्षात्कारी नाहीत तरी ज्यांना ही जाणीव झाली आहे कीं आपल्यात काही तरी फारच बिघडलं आहे. आधुनिक काळाचे किंवा कलियुगाचं हे सत्व आहे.

यावेळी माझा जन्म झाला आहे, जेव्हां मला हे तुम्हाला सांगण्याचं काम करायच आहे की तुम्ही स्वतःमधे परिवर्तन करा.इतर सर्व कामापेक्षा हे फारच वेगळं काम आहे.जेव्हा देवी आली होती त्यावेळी तिने राक्षसाना मारलं तेव्हां राक्षस व मानव वेगळे होते.त्यामुळे तिला माणसांचे रक्षण करणे शक्य झाले. पण आज माणसांच्या डोक्यात राक्षस शिरले आहेत व त्यांना सांगणे की राक्षस तुमच्या डोक्यात जाऊन बसले आहेत, हे महाकठीण आहे.पशू पाशात असतात म्हणजे देवाच्या नियमनात असतात, म्हणून त्याचं वागणं ठीक असत. उदा. सिंह विंचू होत नाही व विंचू साप होत नाही. पण या कलियुगात माणसामधे हे शक्य आहे. आज तो सिंह दिसतो तर उद्या तो साप होतो व परवा त्याचा विंचू बनतो. आदम व ईव्ह यांच्या काळात माणसाला जे स्वातंत्र्य दिलं होतं त्याचा परिपाक आज अशा प्रकारची माणसे बनण्यात झाला आहे. या स्थितीवर पोहोचल्यावर एखाद्या व्यक्तिला स्वतःची जाणिव होते कीं काही तरी बिघडले आहे. माझ्या मुलांना मी काय देत आहे ? मी काय करीत आहे ? मी कोठे आहे ? जेव्हा असे प्रश्न मनांत येतात ती वेळ आहे, जेव्हां महालक्ष्मी स्वतःचा प्रकाश तुम्हाला देते, की तुम्हाला सत्याचा शोध घ्यायला हवा. जेव्हा सत्याचा शोध सुरु होतो, तेव्हा विल्यम ब्लेकने सांगितल्या प्रमाणे "परमेश्वरांचे लोक". सत्याचा शोध घेतील व खरोखरच ते परमेश्वराचे लोक बनतील. यावेळी विशेष प्रकारचे सत्याचे शोधक जन्माला येतील व इतरानांही ते परमेश्वरांची माणसे बनवतील.

तेव्हा सहज योग, हळू हळू अनेक ऋषी, शास्त्रज्ञ, द्रष्टे व

अवतरणे याच्यातून उत्क्रांतिच्या प्रक्रियेमधून बांधला जात आहे. आणि हे सर्व आपल्या अंतर्यामी आहे. सर्व जग आपल्या अंतर्यामी आहे. या सर्व महान गोष्टी आपल्यामधे आहेत. मानव घृणास्पद नाही. तो सर्व उत्क्रांतीची परमोच्च स्थिती आहे. त्याचा तिरस्कार करावा असा तो नाही. फक्त तो अज्ञानी आहे. अज्ञानांत दोर सापासारखा दिसतो. प्रकाश असल्याशिवाय तुम्ही दोर पाहूं शकत नाही म्हणून कोणत्याही प्रकारे मी कोणालाही अपराधी म्हणणार नाही. कोणी काही जरी केलं तरी तो परीवर्तन घेऊ शकतो कारण आत्मा अजून प्रकाशमान आहे. अनेक गोष्टींनी तो ढगाळला आहे. एखाद्याला जर सुदैवानी ते ढग दूर करता आले तो आत्मा प्रकाशमान होऊन झळकेल.

आत्मसाक्षात्कार म्हणजे स्वतःबद्दल तुम्हाला होणारी जाणिव तुमच्यात काय बिघडले आहे ? तुम्ही कोठे आहात ? ते मुलासारखे होतात. मला जसं ते सांगतात ! अनेक क्षेत्रात उच्च स्थितीला असलेली मंडळी, आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर लहान मुलांसारखी झाली. त्यांना स्वतःमधले प्रश्न दिसले स्वतःबद्दल व दुसऱ्या बद्दल ते पूर्णतया जाणू लागले. ही महान गोष्ट घडली कारण हे आधुनिक काळाचे सत्व आहे. यावेळी आपल्याला स्वतःला व इतरांना आपल्या मज्जासंस्थेद्वारे जाणून घ्यायचे आहे. ही घटना मानवाच्या चेतनेचा एका नव्या क्षेत्रात (डायमेशन) प्रवेश आहे. युगने त्याला सामूहिक चेतना असे म्हटले आहे. ते प्रत्यक्षात उतरलं आहे. घटित होणं आहे, केवळ बोलणें नाही. ते एकमेकांचे खरेखुरे भाऊ, बहिणी होतात. म्हणजे, ते एका पूर्णत्वाचे अविभाज्य घटक बनतात.

ईश्वरी प्रेम तुमच्यात परिवर्तन करते. कारण तुम्हाला तुमच्यामधे ते (बिल्ट) वृद्धिंगत करायचे आहे तुम्हाला परिवर्तित करते व तुम्ही इतके सुंदर होता ! समजा ज्यांनी टेलिव्हिजन पाहिला नाही त्याला तो दाखविला तर तो म्हणेल ती पेटी (बॉक्स) आहे. तुम्ही म्हणाल की त्यामधे फिल्म पाहता येते, तर त्याचा विश्वास बसणार नाही. कारण तो अज्ञानी आहे. जेव्हा तुम्ही मेन्सला तो जोडाल व तो पाहिल, तेव्हा त्याचा विश्वास बसेल. त्याचप्रमाणे मला तुम्ही सर्व किती महान व श्रेष्ठ दिसत आहांत ! सहज योगात बाईट लोक सापडत नाहीत. ते कमालीचे प्रामाणिक आहेत. कधी खोटे बोलत नाहीत. त्यांना काही सांगायचे नसेल तर ते गप्प बसतात. ते अतिशय जागरुक, कार्यक्षम (डायनॅमिक) व दयाळू आहेत. सर्वच एखाद्या चक्रीवादळासारखं आहे. जेव्हां तुम्ही बदलता तेव्हा सर्व ठिकाणी बदल घडून यायला सुरुवात होते. पूर्व युरोपियन देशातील लोकांना मी जागृती दिल्यावर ते त्यांच्या देशात गेले व तिकडे बदल घडून यायला सुरुवात झाली. याची तुम्ही सुरवात केली आहे कारण हे कृत युग आहे व ते कार्यान्वित होणार आहे. हे सर्व तुम्ही स्विकारले आहे त्याबद्दल मी तुमची ऋणी आहे.

आईचं प्रेम निर्व्याज्य असले तरी आईच्या तुमच्याकडून कांही अपेक्षा आहेत. या जगामधे आपल्याला परिवर्तन करायचं आहे. आपल्याला स्वतःच्या गहराईमधे उतरायचं आहे इतकच. जितके गहनतेत तुम्ही उतराल, तितकं ते चांगल आहे. जेवढं पात्र मोठं तेवढी त्यांत ईश्वरी शक्ति ओतली जाईल. म्हणून आपल्याला ध्यान करुन गहन व्यक्ति झालं पाहिजे. आपल्याला स्वतःसाठीच हे करायचं आहे. या जीवनात तुम्ही जन्म घेतला आहे म्हणून करायचं आहे. तुमच्यावर ही फार मोठी जबाबदारी आहे कारण तुम्ही यावेळी इथे आहात. संपूर्ण मानव जातीमधे परिवर्तन होण्याची महान घटना घडत असताना तुम्ही जन्म घेतला आहे. ही किती महान गोष्ट आहे, व त्यांत तुम्ही सहभागी आहांत. म्हणून तुमच्या पुण्याईत किती महानता असली पाहिजे. आणि तुम्ही याचा हृदयापासुन स्विकार केला आहे. व तुम्ही ती कार्यान्वित करीत आहात. तुम्हाला वाटत असेल श्री माताजी आम्ही फक्त आनंदात आहोत. खरं म्हणजे गहराईत उतरला आहात म्हणून तुम्ही आनंदात आहात. तुमच्या गहराईतून आलेले तुमचे व्यक्तिमत्व इतर मानव जातीमधे परिवर्तन घडविण्याची सुरुवात करेल. व त्या माणसांना कळेल कीं ते परमेश्वरी राज्यात आले आहेत. व हे सर्व तुमच्यामुळे होणार आहे. माझ्या नःही आणि म्हणून गहनता हवी. मी निरिच्छ व्यक्ति आहे. तुम्ही यांची इच्छा करायला हवी व सर्व जगाकरिता याची सुरुवात करायला हवी.

पुन्हा मी तुमची आभारी आहे व नम्र विनंती करते कीं शपथ वगैरेची आवश्यकता नाही कारण मी पण शक्ति आहे. सहज योगात शिस्तीचं बंधन नाही. स्वतः समजून घेणे आहे की तुम्ही अशा वेळी जन्माला आला आहात कीं सूक्ष्म परंतू कार्यक्षम असं महान परिवर्तन करण्याचं महत्वाचं कार्य करणं आवश्यक आहे व ते घडून येत आहे.

परमेश्वराचे तुम्हा सर्वांना आर्शिवाद. जास्तीत जास्त ध्यान करा व स्वतःच्या जाणिवेत रहा. आपल्याला हे महान कार्य करायचं आहे. सर्वात उच्च प्रकारची ही उत्क्रांती आहे. बदल व जन परिवर्तन करायच आहे. एक गोर्बाचेव्ह पुरणार नाहीत. अशा अनेकांची आवश्यकता आहे. आणि आपण ते घडवून आणणार आहोत.

परमेश्वरांचे तुम्हाला अनेक आर्शिवाद !

# माताजींचा पूजेबद्दल उपदेश

पूजा किंवा प्रार्थना तुमच्या हृदयांतून विकसित होते.मंत्र हे कुंडलिनीचेच बोलणें आहे. पण एकादा मंत्र हृदयापासून उच्चारला नाहीं किंवा त्याचं पठण कुंडलिनीच्या साक्षीमधें झालं नाही तर ती पूजा नुसतं कर्मकांड ठरते. हृदयांत झालेली पूजाच सर्वश्रेष्ठ असते. तुम्ही पूजेचे मंत्र म्हणता तेव्हां त्यांत पूर्ण श्रद्धा हवी.पूर्ण श्रद्धा ठेऊन केलेली पूजा तुमच्या हृदयालाच मिळते.अशा पूजेंतुन आनंद लहरी ओसंडून वाहतात कारण तुमच्या आत्म्याकडून ती होत असते. लोक ग्लासमधें मद्य ओततात तुमची पूजा तशीच आहे. त्यामध्यें श्रद्धा हे मद्य आहे व मंत्र - प्रार्थना हा ग्लास आहे. ते तुम्ही सर्वकाही विसरुन पिता त्यावेळी तुमच्या डोक्यांत विचार कसा येणार ? त्यावेळी तुम्ही आनंद सागरांत डुंबून जाता.पण अशा पूजेंतून मिळणारा आनंद सदैव व न संपणारा असतो.

दुसरी गोष्ट तुम्ही लक्षांत घ्यायला हवी ती म्हणजे तुमचा गुरु ही फार मोठ्या लोकांची आई आहे.या नुसत्या विचारानेंच तुमच्यातील गुरुतत्व प्रस्थापित होणार आहे.माझी मुलं केवढे जबरदस्त झाले , जगन्मान्य झाले.ते शब्दांनी सांगता येणार नाहीं.एकाहून एक मोठा त्याच मालिकेंत तुम्ही आहांत , माझे शिष्य झालात. तुम्ही त्याचाच आदर्श ठेवा.त्यांच्याच मार्गावरुन चला.त्यांना ओळखा , त्यांचा आदर करा.म्हणजे तुमचं गुरुतत्व प्रस्थापित होईल.त्यांनी केलेला उपदेश तुमच्या रक्तांत उतरु दे.त्यांचा अभिमान असूं दे.मग इतर लोक काय म्हणतात त्याची पर्वा करु नका.आजूबाजूच्या सर्व लोकांना तुम्हाला तुमच्याकडे खेचून आणायचं आहे.तेव्हां प्रथम आपलं वजन पडलं पाहिजे.- गुरुत्वाकर्षणासारखं.धरणीमाता सर्वांना आपल्याकडे खेचून ठेवते तसं आपण सर्वांना आपल्या मार्गाकडे खेचून आणणार आहोत.आज तुम्ही प्रत्येकानें आपल्या हृदयांत , तुमच्या आत्म्याच्या साक्षीत वचन द्या की तुम्ही असेच गुरु व्हाल की तुमच्या आईला अभिमान वाटेल.

आता भवसागर प्रस्थापित करायच आहे.प्रथम तुम्ही तुमच्या गुरुला ओळखा आणि तो (श्री माताजी) प्रत्येक चक्रावर आहे.तुमचा गुरु किती मोठा , शक्तिशाली आहे ? म्हणून तुमचा आत्मविश्वास वाढला आणि अशा शक्तिशाली गुरुमुळें प्रत्येकाला सहजच साक्षात्कार झाला आहे.तुम्ही एखाद्या श्रीमंताकडे कांही मागायला गेलात तर तो तुम्हाला दोन पैसही देत नाहीं. तुमचा गुरुच एवढा शक्तिशाली आहे कीं तुम्हाला तुमच्यांतील सर्व शक्ति प्राप्त होतात.अशी शक्ति मिळाल्यावर तुम्ही खूप समाधानी , आनंदी आणि प्रसन्न होणार आहात. तुमच्यामधील जे लोक सहजयोगी आहेत त्यांना हे लगेच पटेल.जे लोक प्रथमच माझं भाषण ऐकत आहेत त्यांना हे लगेच उमजणार नाहीं.मी काय म्हणते ते तुम्हाला नक्कीच समजेल.तेव्हां हे गुरु-तत्व जाणायला प्रथम तुमचा गुरु कोण आहे हे ओळखा.साक्षात आदिशक्ति ! काय महान आहे. हे आता भवसागर प्रस्थापित करा.

खरा गुरु कुणापुढेही मान तुकवणार नाहीं.फक्त आई आणि बहीण आणि अशा कांही संबंध असलेल्या व्यक्तीपुढे तुम्ही डोकं ठेवा.पण इतर कुणाच्याही पायावर डोकं ठेवायला नको.

आजचा दिवस हा श्री गौरीमातेचा आहे.गौरीनेच कुमारावस्थेंतुन श्री गणेश निर्माण केले.आणि त्याच पद्धतीनें तुम्हाला साक्षात्कार झाला आहे.अगदी त्याच पद्धतीनें.म्हणून तुम्ही याच शक्तीचा , म्हणजे श्री गौरीच्या शक्तीचा उपयोग करुन तुमचं हृदय स्वच्छ करा.तुमचं हृदय स्वच्छ व्हायला हवं , विचार शुद्ध व्हायला हवेत आणि मनांत पावित्र्य असायला हवं.ही शुद्धता भक्तीतुनच निर्माण होणार आहे.पण अजूनही तुमच्या मनांत थोडासा जरी संदेह असेल तर मी सांगते त्या तीन गोष्टी होणार आहेत हे लक्षांत घ्या.प्रथम आपण आतां विश्व - निर्मल - धर्मात आलो आहोत.म्हणजे तुम्ही श्री गणेशांच्या कृपा दृष्टीमधें आला आहात. आत्म्याच्या छायेत आला आहात आणि परमेश्वराच्या आशीर्वादात आहांत.पण एक लक्षात घ्या.एकदा सहजयोगी झाल्यावर तो धर्म तुम्ही पाळायला हवा , त्याच्याशी तुम्ही प्रामाणिक रहायला हवं.

या धर्माशी एकनिष्ठ रहायचं तुम्ही आज ठरवलं असेल तर एक गोष्ट लक्षांत ठेवा.ती म्हणजे या धर्माच्या मर्यादा तुम्ही पाळल्या नाहीत तर तुम्हाला कांहीही होऊ शकतं.' मी सहजयोगी आहे ' याचं दिवस-रात्र स्मरण ठेऊन तुम्ही या मर्यादा पाळल्यात तर तुम्हाला कोणाकडूनही धोका नाही., त्रास नाहीं , नुकसान नाही याची खात्री बाळगा.उलट सहजयोगाच्या या मर्यादा पाळल्यामुळें आयुष्यभर तुम्हाला आनंदच मिळेल.पण जर या मर्यादेबाहेर गेलात तर मात्र तुमच्यापुढें कठीण प्रसंग येतील.तेव्हां ही दुसरी गोष्ट मला सांगायची आहे की आजपासून आपण फार मोठ्या ध्येयाकडे वाटचाल सुरु केली आहे जे साक्षात्कारी लोकांना फार पूर्वीपासून मिळणार होतं.

फक्त तुम्ही तुमचं स्वरुप ओळखा.मग सर्व कांही ठीक आहे.कशाचाही त्रास करुन घेऊ नका , कसलीही काळजी करु नका.फक्त पूर्णपणे शांत रहा. तुम्ही अशा शांत स्थितीमधें आहांत का हे ओळखण्यासाठीं मी कांही खुणा सांगते. तुम्ही कांही चुकीची गोष्ट केली नसेल तर ठीक आहे , हरकत नाहीं कारण तुम्ही कांहीच केलं नाहीं , जोपर्यंत तुम्ही कांही चुकीची गोष्ट करत नाही तोपर्यंत तुम्हाला काळजी वाटायला नको. आणि तुमच्याकडून कांही चूक झालीच तरी परमेश्वर क्षमाच करणार आहे.मग तुम्ही काळजी कशाची करणार ? तेव्हा तुम्ही सर्व तऱ्हेने सक्षम रहा , पूर्णपणें धैर्यवान बना , आणि परमेश्वराच्या या आशीर्वादात पुढे चला.

तिसरी गोष्ट म्हणजे हे सर्व करत असतांना तुम्ही परमेश्वराला वचन दिल पाहिजे की आम्ही सहजयोग नीट समजून घेऊन शिकू आणि त्यांतील प्रत्येक उपदेशाचं पालन करुन आम्ही आदर्श सहजयोगी बनूं.आम्ही स्वतः पवित्र राहूं , आणि सहजयोगासाठीं सर्वस्वी वाहून घेऊ.हें वचन तुम्ही हृदयापासुन द्यायचं आहे.सहजयोगाला शरण जाणें म्हणजेच आनंद , समाधान , शांति यांना शरण जाणें.त्याचा तुम्हालाच फायदा आहे.नुकसान कोणाचच नाही.आजच्या या पवित्र दिवशीं आपण सर्वांनी हाच निश्चय करायचा आहे आणि तो ठामपणें पाळायचा आहे.

मला आंता दिसतंय की सहजयोग यापुढे वेगळ्या दिशेंने विकसित होणार आहे.हे परिवर्तन नक्की होणार आहे.आतां सहजयोग घ्यायला हजारोंच्या संख्येने लोक पुढे येणार आहेत.पण मुख्य म्हणजे तुम्हा सहजयोग्यांना , जे पायाचे दगड आहेत , खूप मेहनत करायची आहे , सर्व मूर्खपणाच्या प्रलोभनांपासुन दूर रहायचं आहे.आजपर्यंत सहजयोगाला न शोभणाऱ्या (अ-सहज) गोष्टींचा त्याग करायचा आहे.तुमची भाषा मधुर हवी , वागणं सौजन्यपूर्ण , नम्र , चांगलं असावं , तुम्ही योग्यासारखं दिसायला हवं , संतासारखं जगायला हवं आणि तुमच्या व्यक्तिमत्वातूनच सहजयोगाची थोरवी लोकांना दिसावी.

इटलीमध्यें असताना मी म्हणाले की इंग्लंड हे विश्वाचं हृदय आहे पण हे मान्य करायला ते तयार नव्हते.या विधानाचा त्यांना धक्काच बसला.इंग्लंड हे विश्वाचं हृदय आहे यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता.याला एक कारण होतं की पूर्वी एकदां रोमन लोकांनी इंग्रज लोकांवर हल्ला केला आणि त्यावेळी रोमन लोकांना वाटलं की इंग्रज लोक फार आगाऊ आहेत , त्यांनी पराजय स्वीकारतानाही पराभूत माणसाचा उदारपणा दाखवला नाही.पराभव झाल्यानंतरही ते लोक असेच आगाऊ राहिले.म्हणुनं इंग्लंड हे विश्वाच हृदय असेल यावर त्यांचा विश्वासच बसेना.हे जर हृदय आहे तर मग विश्वाची रचना कशी असेल? मग त्यांनी मला इंग्रज लोकांच्याबद्दल सांगितलं आणि मग मला वाटलं की मला पण असच कांहीतरी अवगत होतं.

आता इंग्लंडसारख्या विशिष्ट देशांत जन्म झाला असल्यामुळें तुम्हाला पण त्या उच्च स्थितिपर्यंत उन्नत होण्याची क्षमता प्राप्त झाली आहे.ही क्षमता तुमच्यामधें मुळांतच आहे.मग काय कमी पडत आहे ? ही क्षमता असूनही , महान पार्श्वभूमि आणि या देशांत जन्म मिळण्याची पात्रता असुनही हे सहजयोगी इतक्या वर्षानंतरही इतरांसारखे कां नाही पुढे आले ? काय कारण आहे याला ? नीट लक्ष द्या.आपलं हृदय एका विशिष्ट गतीमधें स्पंदन करत , त्याच्या हालचालीचा विशिष्ट आवाज (नाद) आहे.एवढंच नाहीं तर हे सर्व ग्राफवर कळून येतं.इतकं हे पद्धतशीर , व्यवस्थित , नियमित कार्य चालतं.अर्थात हृदयाच्या कामाची शिस्त आहे.इतकी की अगदी लहानसहान खराबी वा आवाज वा बदल ग्राफवर तावडतोब रेखाटला जातो.आपलं हृदय हे इतकं संवेदनाक्षम आहे.हीच गोष्ट इथं कमी पडत आहे - हृदयाची शिस्त.

आतां आपण सर्वांत महान अशी ही नवरात्र साजरी करतो तेव्हां विशेष गोष्ट म्हणजे आपल्याला हे हृदय पूर्णपणें , आंतूनसुद्धां इतकं स्वच्छ केलं पाहिजे की त्या शुद्धतेमुळें आपल्या शरीरात सगळीकडे वाहणारं रक्तपण शुद्धच होईल. म्हणून या हृदयाच्या पेशी , ज्यांतून हा भाग बनला आहे , त्यापण उच्च प्रतीच्या असायला हव्या.मानवी हृदयाच्या पेशी उत्कृष्ट , सक्षम व खुप संवेदनशील असतात. या हृदयांतूनच ' अनाहत ' ध्वनी येतो - असा ध्वनी की ज्यात खरखर मुळीच नाही.एका बाजूला उंन्नत स्थितीला आलेले लोक आहेत तर दुसरीकडे नुसते बडबडणारे दिखाऊ पण आतून पोकळ लोक असतात.आधी हृदय खुप स्वच्छ करा आणि त्याच्या उत्कृष्ठ पेशी बना.

विचित्र आणि बिघडलेल्या हृदयामुळें अहंकार बळावतो.कुणी कांहीही म्हटलं - आणि असे लोकही आहेत - तरी कांही लोकांना तुम्ही कांही सांगितलं की तेवढ्या वेळेपुरते ते लक्ष देऊन ऐकतात पण दुसऱ्याच क्षणाला ते विसरुन पण जातात. म्हणून ही आणखी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे की आत्मपरीक्षण करुन आपल्याला समजायला हवं की आपल्यात कमी आहे ती गोष्ट म्हणजे ही शिस्त. आणि ती शिस्त आपण पाळायलाच हवी एरवी आपली प्रगति होणार नाही.पण या सर्वांकरतां मला वाटतं की आपल्यामधें एक मूलभूत बौद्धिक क्षमता हवी.म्हणजे शिक्षण नाही , ती मुळांतच असायला हवी ज्यायोगें आपल्याला समजेल की आपली प्रगति अजूनही व्हायला हवी.याच भूमिकेमधें आत्माच कार्य करतो , सत्ता नाहीं. म्हणजेच साक्षी , नुसतं पाहणारा , परमेश्वराचं प्रतिबिंबच जो आहे. देवीकडून होणारं कार्य जो पाहतो.खरं म्हणजे होतं काय तर उच्च स्थितीवर आल्याशिवाय आपण नुसतंच म्हटलं की आत्म्याकडे बघतो आहे तर आपण खरी उन्नति साधु

आपल्याला समजेल की आपली प्रगति अजूनही व्हायला हवी.याच भूमिकेमधें आत्माच कार्य करतो, सत्ता नाहीं. म्हणजेच साक्षी, नुसतं पाहणारा, परमेश्वराचं प्रतिबिंबच जो आहे. देवीकडून होणारं कार्य जो पाहतो. खरं म्हणजे होतं काय तर उच्च स्थितीवर आल्याशिवाय आपण नुसतंच म्हटलं की आत्म्याकडे बघतो आहे तर आपण खरी उन्नति साधु शकणार नाहीं. सर्व आशीर्वाद असूनही - सात तेजोवल्यांप्रमाणें सात आश्रमही हृदयांत आहेत - आपल्याला समजत नाहीं की आपल्यामध्यें ही शिस्त असणं जरुर आहे. फक्त आपल्या फायद्याकरतां किंवा नुसतं सहजयोग करतो वा मी सहजयोगी आहे अशी प्रौढी बाळगणं या गोष्टी हृदयांतून प्रतीत होत नाहीत.

आतां सावधानतेचा इशारा पण द्यायला हवा. सहजयोग आतां वाढण्याच्या वळणावर आला आहे म्हणून महत्वाचा, आतां त्याचा प्रसार खूप वेगानं होणार आहे, तो जणूं भरारी मारण्याच्या स्थितीला आहे.जे मागे राहतील ते मागेच पडतील.म्हणून उगीच आगाऊ पणाच्या गोष्टी करु नका. प्रथम तुमचं व्यक्तिमत्व.नाहीतर प्रत्येक जण म्हणेल 'हे लोक आगाच आहेत. अगदी नम्र हाऊन समजून घ्या कीं तुम्हांला विमानांत बसून आकाशाकडे झेप घ्यायची आहे आणि जमिनीवरच थांबून राहायचं नाहीये.इतका त्याला वेग येणार आहे.

यावेळीं मी आणखी दोन चक्रांबद्दल बोलत नाहीं., आपण या सात चक्रांबद्दलच बोलू.या चक्रांची शक्ति आपण आपल्यामधें जागृत केली आहे का? ते कसं करायचं? तुम्हाला तेवढा वेळ पण हवा ना, तुम्ही सर्व गडबडीत असतां.आणि वर पुन्हा आगाव.तर या शक्ति जागृत करण्याकरतां आपल्याला या चक्रांकडे काळजीपूर्वक लक्ष द्यायला हवं.मी जिथे-जिथे गेले मला आश्चर्य वाटलं त्यांच्याकडे बघून, त्यांचे प्रश्न ऐकून. कोणीही त्यांचे कुटुंब, घर, नोकरी किंवा अशाच फालतू गोष्टींबद्दल बोललंच नाहीं.त्यांनी फक्त विचारलं "माताजी, या चक्राची शक्ति, त्या चक्राची शक्ति कशी विकसित करायची?" मग मीच त्यांना म्हटलं "तुम्ही याच चक्राबद्दल कां विचारलं?" तर ते म्हणाले "हीच आमच्यात कमतरता आहे, माझं हे चक्र ठीक व्हायला हवं."

आज सगळ्यांत चांगली गोष्ट म्हणजे आज नवरात्र आहे आणि या दिवशीं मी लंडनमधें आहे आणि इथेच ही नवरात्र-पूजा होत आहे. ही सगळ्यांत महान पूजा आहे.महान कार्य आहे ज्याकरतां तुम्ही इथें आलात, इतर कुठल्याही देशाला हे भाग्य मिळालं नाहीं.तर आपण ही नवरात्री पूजा का करायची? आपल्या हृदयांतच ही नवरात्र-पूजा व्हायची म्हणजे आपण त्या शक्तीच महात्म्य ओळखायचं. या सर्व चक्रांतील शक्तींची आपल्याला प्रत्यक्ष जाणीव होईल, आणि ती सर्व चक्रं प्रकाशित झाल्यावर त्या शक्तींच्या जागृतीचा आविष्कार आपल्यामधेंच कसा दिसून येणार आहे ते पण तुमचं तुम्हालाच समजणार आहे.ही सात चक्र आणि हृदय व चंद्र मिळून ही नऊ चक्र आहेत. म्हणजे सात चक्र आहेत व त्यांच्याशिवाय ही आणखी दोन शक्तिकेन्द्र आहेत. त्यालाच ब्लेक साहेबांनी 'नऊ केंन्द्रे' म्हटलं आहे.

साक्षात्कार झालेल्या लोकांना मी कांही सांगण्याची वा शिस्त लावण्याची जरुर नाही. आज तुम्हाला असा कांही उपदेश करायलाही मला आवडणार नाही.पण मला कळून चुकलं आहे की मी आत्तांच तुम्हाला इशारा दिला नाही तर नंतर तुम्हीच मला अशा धोक्याचा इशारा कां नाही दिला म्हणून दोष लावाल.मी सांगितलेल्या हा इशारा नीट समजून घ्या. साक्षात्कार झाल्यानंतर तुम्हाला मी शिस्त लावण्याची गरजच नाही, कारण तुम्हाला आतां प्रकाश मिळाला आहे, साक्षात्कार काय आहे हे तुम्हाला समजलं आहे, काय मिळवायचं आहे हें पण तुम्हाला समजलं आहे, त्याच्यांतून तुमचा काय फायदा होत आहे हे तुम्ही जाणता, तुमचं व्यक्तिमत्व किती सुधारलं आहे हे पण ओळखता. तरी पण आणखी काही करायला हवं आणि ते म्हणजे तुम्ही स्वतःला शिस्त लागली आहे का हे स्वतःच बघा.

कोणी एखाद्या लीडरनें, कोणी आश्रमांतील व्यक्तीनें किंवा आणखी कोणीही तुम्हाला असं कांही सांगण्याची मुळीच जरुर नाही. तुम्ही स्वतःच आता साक्षात्कारी आत्मा आहात, स्वतःचे गुरु आहात, स्वतः अधिकारी व्यक्ति आहात. मनांत आणलंत की सर्व संत सर्व गुरु, सर्व सद्गुरु तुमच्यांतच आहेत.एवढंच नव्हे तर प्रत्यक्ष गंधर्व लोक तुमच्यावर फुले उधळणार आहेत. विचार करा. तरीही इथें तुम्ही आगाऊपणा मिरवता, भाषण देता, प्रौढी मिरवता, त्या साऱ्या देवतांना पण कठीण होईल, तुमच्या गळ्यांत हार घालायचे की तुमचं तोंड बंद करायचं हाच त्यांना प्रश्न पडेल.आतां इथें तुम्हाला साक्षात्कार मिळून तुम्ही उच्च स्थितीत आला आहात.म्हणून तुम्हाला समजलं पाहिजे की सहजयोगाचा अनुभव किती सुंदर - प्रसन्न आहे ज्यामुळें तुम्ही तुमच्यातील शक्ती प्रकाशित करता, तुमची चक्रं जागृत करु शकता.

जे लोक अडाणी आहेत, ज्यांना अज्ञान आहे त्यांना मी समजूं शकते. मग या अज्ञानी अवस्थेत त्यांना अबोधिता काय समजणार? पण तुम्ही आता अज्ञानी नाहींत.तुम्हाला ज्ञान मिळालं आहे, प्रकाश मिळाला आहे.अबोधितेची शक्ति खूप मोठी आहे. ती तुम्हाला पूर्ण निर्भयता देते आगाऊपणा नाही तर निर्भयपणा.आणि अबोधितेमधील सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे तुम्ही आदरणीय होता.तुम्ही जर आदराची ही भावना जोपासली नाहीं, दुसरे सहजयोगी, दुसरी माणसे, आश्रमांतील लोक वा स्वतःबद्दलही आदर बाळगला नाहीं तर सहजयोगाविषयी नुसतं बोलूनही काही उपयोग नाहीं कारण ती फक्त सुरवात आहे.तुम्ही आधी आदर करत नव्हता ठीक आहे, आगाऊपणा करत होता तेही ठीक आहे, तुम्ही एखाद्या मुर्खांच्या राज्यांत घोड्यावर स्वार होता तेहि ठीक, त्याची क्षमा केली. पण एकदा तुम्ही प्रकाशित झालात की तुम्ही या सर्व विषारी गोष्टी टाकून दिल्या पाहिजेत. हे फार सोपं आहे.

आतां आपल्यांतील पहिलं चक्र बघा, हे गौरीमातेच्या शक्तिपासून निर्माण झालं म्हणजे श्री गणेशांची आई देवी गौरीची शक्ति केवढी तरी आहे. त्याच शक्तीमुळें तुम्हाला साक्षात्कार मिळाला. मग त्या शक्तिची तुमच्यामधें

प्रतिष्ठापना करण्यासाठी तुम्ही काय केलं? आज नवरात्रीच्या पहिला दिवस आहे, बघू या आपण आजपर्यंत काय केलं? आपल्यामध्ये अबोधिता आपण प्रस्थापित केली कां? लोक बोलतात तेव्हां ते खूप हुशारी दाखवतात, अबोधित असले तर ते अशी हुशारी दाखवणार नाहींत, ते आगाऊ पण असतात, तर मग त्यांना अबोधित कसं म्हणणार? लोक चलाखी पण करतात, अबोधित असतील तर असं वागतील का? म्हणून तुम्ही प्रथम लक्षात घ्यायला हवं की अबोधिता प्रस्थापित करायची असेल तर या सगळ्या वाह्यात गोष्टी सोडायला हव्यात. तुम्हांला अबोधित व्हायचं असेल तर अबोधितेविरुद्ध असणाऱ्या सर्व गोष्टींचा त्याग केला पाहिजे.

तुम्ही बालकासारखे निष्पाप असाल तरच देवी गौरीचे आशीर्वाद मिळतील एरवी नाहीं. तुम्ही बालकासारखं निरागस व्हायला हवं, नाहीं तर सर्व फुकट आहे, तुम्हाला सांगण्याचा काही उपयोग नाहीं कारण तुम्ही स्वतःला फार शहाणे समजता. अशा माणसायला कांही सांगून-शिकवून काय फायदा कारण त्यांना वाटतं की त्यांना सगळं माहित आहे. तेव्हां ही पहिली शक्ती विकसित होण्याकरतां तुम्ही धरणीमातेवर बसायला शिका. तुम्ही या धरणीमातेचा आदर करायला हवा कारण हे पहिलं चक्र धरणीमातेपासुनच तयार झालं. या धरणीमातेवर स्वस्थ शांत मनानें बसून रहा आणि स्वतःचा आदर असूं दे. झाडावं बघा, फुलं आल्यावर ती इतकी आदरणीय-सन्माननीय वाटत नाहींत पण ती फळांनी लगडल्यावर झुकून ती धरणीमातेचा आदर राखतात. त्याचप्रमाणे सहजयोगाची फळं मिळाल्यावर तुम्ही पण नम्र झालं पाहिजे.

अबोधितेमधून माणसाला अत्यंत शांत रहाण्याची क्षमता येते. पूर्णपणे शांत, राग नाहीं, त्रासिकपणा नाहीं, मारपीट नाहीं. माणसामध्ये अबोधिता नसेल तर तो शांत राहूच शकणार नाहीं कारण अबोधिता नसलेला माणूस अगदीं शामळु असेल किंवा आक्रमक असेल. त्याच्या अंतःकरणात शांतता असणारच नाहीं. पण अबोधित माणसाला कशाचाच त्रास होत नाहीं. तो निरागस असतो., सर्व गोष्टींमधून तो आनंद व समाधान मिळवीत राहतो. पण माणूस जेव्हां चलाखी दाखवतो तेव्हाच तंटे-बखेडे सुरु होतात. त्याला वाटतं "मी इतका हुशार आहे आणि हा माणूस इतका मूर्ख आहे कीं त्याच्यावर मी ओरडलंच पाहिजे." खरं म्हणजे जो अबोधित नसतो तो सूज्ञ असूच शकत नाही. त्याच्याकडे बघितल्यावर कदाचित हुशार वाटेल पण तो सूज्ञ नसतो. सूज्ञपणा हा अबोधितेतूनच आपल्याला मिळतो. आपण असे सूज्ञ खरोखर झालो आहोत कां हेच आपल्या आपण तुम्ही बघायला हवं.

हेच आपण समजून घ्यायला हवं. आपण आपल्याला ही शिस्त लावून घेतली आहे कां? कारण आपली सुरुवातीची प्रगती फार लवकर - लवकर होते. पण आपल्याला अजून खूप पुढें जायचं आहे. मी माझेपणांतच गुरफटून गेल्यामुळें बऱ्याच लोकांना हा मुद्दा समजत नाहीं. लक्षांत घ्या. तुम्हाला अजून खूपच प्रगति करायची आहे. अशी प्रगति झाल्यावर तुम्हाला कळेल कीं तुमच्यातील सूज्ञतेला करुणेचा सुगंध लागला आहे. तुमची सूज्ञता करुणा प्राप्त झाल्यामुळें सुगंधित झाली आहे.

तुमची अबोधिता जसजशी विकसित होते तशी सूज्ञता आपोआपच येते. लोक म्हणतात 'तो माणूस खूप शहाणा आहे, उदाहरणार्थ एकादा माणूस आपल्या बायकोबद्दल कुरकुर करायला लागला तर एकादा शहाणा म्हणतो" अरे बाप रे! इकडे बघा हा अजून आपल्या बायकोतच गुंतला आहे!" दुसरा एकादा आपल्या घराबद्दल किंवा आणखी कशाबद्दल तक्रार करीत असला तर तो म्हणेल "आतां याच्याकडे पहा, हा अजून आपल्या घरातच अडकला आहे." या कशाला अंत नाही. मी कांही लोक बघितले आहेत की ते इतका आव आणतात आणि त्यांना सहजयोगावर एक तासभर भाषण दिल्याशिवाय चैन पडत नाहीं. असं एकदा तासभर भाषण केल्याशिवाय त्यांच्या अहंकाराच समाधान होत नाहीं. पण खऱ्या शहाण्या माणसाला (सूज्ञ) कांहीही सांगायची, बोलायची किंवा करण्याची जरुरच पडत नाहीं. ते त्यांच्या न बोलण्यांतूनच खूप कांही सांगतात आणि त्यांच्यातील सूज्ञतेचा दुसऱ्यावर सहज प्रभाव पडतो.

तुम्ही स्वतःलाच, फक्त स्वतःलाच, सर्व समजावून सांगायचं आहे. म्हणून प्रत्येकानं रोज ध्यान करायला हवं. ही फार महत्वाची गोष्ट आहे जी सर्व देशातील लोक, जिथें मी नसेन, करत असतात. आतां मी इंग्लंडमधे आहे म्हणून लोक मला वेगळं समजतच नाहीत, म्हणतात "माताजीचं सर्व कांही करतात." म्हणून मी पहांटे चार वाजतां उठते, स्नान करते आणि तुमच्याकरतां ध्यान करते. एरवी तुम्हाला ध्यानाला वेळ नाहीं ना! म्हणून मला तरी तुमच्याकरतां ध्यान करायला हवं. म्हणून आज तुम्ही सर्वांनी वचन द्या की तुम्ही रोज ध्यान कराल. सकाळी लवकर उठा. "आम्हाला लवकर उठायला जमत नाही. जगातले सर्व लोक सकाळी उठतात मग इंग्रज लोकांनाच का जमत नाही? पण वॉटर्लूच्या लढाईच्या वेळी मात्र ते प्रथम तिथें पोचले, त्यांनी ती लढाई जिंकली कारण ते वेळेवर तिथें पोचले. त्या शिस्तीला आताच काय झालं आहे? आपण दारू घेत नाहीं, सकाळचा दारुचा परिणाम नाहीं, रात्री उशीरापर्यंत जागत नाहीं. मग आत्तांच आपण निश्चय करु या की "मी रोज सकाळी उठून ध्यान करीन. ध्यानांत स्वतःकडे लक्ष ठेवीन - इतरांकड नाही - स्वतःच्या चक्रांकडे लक्ष ठेवीन. कुठल्या चक्रावर पकड आहे. ते मी कसं सुधारणार याकडे काळजीपूर्वक लक्ष ठेवीन."

म्हणून आजच्या नवरात्रीच्या पहिल्या दिवशीं देवी गौरीच्या शक्ति आपल्यामध्यें जागृत करुं या आणि त्याचा आविष्कार होऊं द्या. ती फार मोठी शक्ति आहे, या एका भाषणांत त्यांचं पूर्ण वर्णन करणंही शक्य नाहीं. आदिशक्तीचा म्हणजेच कुंडलिनीचा विचार करा. या सर्व विश्वामधें, धरणीमधें, सर्व वस्तुमात्रांत, पशु-पक्षांमधें आणि सर्व माणसांमधे असं सर्वत्र ती कार्य करीत आहे. तीच तुमच्या शरीराचा आणि चेहऱ्याचा आकार ठरवते, तुम्हाला कुठलं मूल होणार हे तीच ठरवते. तुम्हाला कुठल्या तऱ्हेने मूल जरुरी आहे हे तीच ठरवते, तिच्याकडूनच तुम्हांला ही सुंदर मुलं झाली आहेत,

तिच्याकडूनच तुम्हाला हे चमकदार चेहरे आणि पाणीदार डोळे मिळाले आहेत. हे सर्व तुम्हाला तिच्याकडूनच मिळालं ,असलेल्या याच शक्तिची काय अवस्था आहे? पण तुमच्यामधून तिचा आविष्कार झाला आहे कां?

तुम्ही सहजयोगी मंडळी विकसित होत असलेल्या विश्वाचे , उन्नत होत असलेल्या मानववंशाचे द्योतक आहात. तुम्हाला हे समजलं कां - सध्याच्या , जग विनाशाच्या मार्गावर आलेल्या विकट प्रसंगी तुम्हाला महत्वाची कामगिरी करायची आहे. विल्यम ब्लेक, सारखे महान नेते तुमच्याजवळ आहेत. तुमच्यामधें इतरही मोठे लोक आहेत जे या बिकट स्थितीबद्दल सांगत आले आहेत. त्यांनीच हे सर्व जुळवून आणायचं काम केलं आहे. इंग्लंडमधें पण मोठमोठ्या संत लोकांनी आजपर्यंतच काम केलं.म्हणून इंग्रज सहजयोग्यांवर खुप जवाबदारी आहे हे लक्षात घ्या. पण सुज्ञतेची कमतरता आहेच आणि हा वर आगाऊपणा , स्वतःला ओळखण्याची तयारी नाही.मग नुसती बडबड असे तुम्ही सर्व बाजूंनी सामर्थ्यहीन आणि तरीही आगाऊ मग कार्य कसं सिद्ध करणार?

ही आदिशक्ती खूपच - अविरत - कार्य करीत आहे यांत शंका नाहीं. पण तुमच्या प्रत्येकाची , जागृति मिळूनही , काय अवस्था आहे? तिचा कितीसा आविष्कार तुम्ही स्वतः जाणून घेतला आहे? आणि ही कुंडलिनी म्हणजेच "शुद्ध इच्छा" हेहि तुम्ही जाणता. स्वतःला आदर्श बनवण्याची , स्वतःची प्रगति करण्याची शुद्ध इच्छा. ही शुद्ध इच्छा खरोखरच असेल तर इतर सर्व गोष्टी दुय्यम आहेत. इतर सर्व इच्छा या फालतु व दुय्यम दर्जाच्या असतात. सर्वात उच्च इच्छा म्हणजे (सहजयोगात) खोल उतरण्याची. आणि हे सर्व कुणाकरतां? तुमच्याच फायद्याकरतां. आणि जे तुमच्या हिताच आहे तेच इतर सर्वांच्या हिताचही असेल.

म्हणून आज मी तुमच्यापैकी कितीजण रोज ध्यान करतात हे बघणार नाहीं पण मी एवढंच सांगते की जे लोक रोज ध्यान करणार नाहींत ते पुढच्या वर्षी इथें दिसणार नाहींत. मी अगदी खरं तेच सांगत आहे एवढं लक्षात घ्या. दररोज तुम्ही ध्यान केलंच पाहिजे. स्वतःला तशी शिस्त लावा. आता तुम्हाला एक नवी दिशा मिळाली आहे , एक नवीन दर्शन तुम्हाला झालं आहे. त्याची तुम्हाला प्रचीति आल्यावर त्याची अनुभूति आल्यावर नुसतें बघत राहूं नका . तेच बनून रहा.

सर्वजण असं म्हणतात - डॅमीसुद्धा - "माताजी , आपण या इंग्रज लोकांकरिता इतका वेळ देता , याच लोकांकरिता असं का?" तुम्हाला कदाचित् असंही वाटत असेल की तुम्ही फार श्रेष्ठ लोक आहांत म्हणून मी तुमच्याकरतां हे केल्यं पाहिजे. तुम्ही कांहीही म्हणा पण सगळ्यांत महत्वाची गोष्ट ही आहे की तुमचा देश हे विश्वाचं हृदय आहे आणि म्हणूनच मला इतर सर्व लोकांपेक्षां जास्त स्वच्छ करायचं आहे. पण इथें उलटाच प्रकार होत आहे. बाहेरचे लोकच खुप पुढें गेले आहेत. त्यांच्या चैतन्यलहरी , त्यांची संवेदनाक्षमता , त्यांचा समजूतदारपणा पाहून मीच आश्चर्यचकित झाले. त्यांनी सहजयोगांत प्राविण्य मिळवलं आहे. इथें प्रत्येकजण स्वतःचाच विचार करतो आहे , प्रत्येकाला सहजयोग जाणण्याची तळमळ नाहीं , फक्त त्याच्यावर भाषण करायला हवं आहे वयस्कर माणसांचा आदर नाहीं. कुणाला असंही वाटतं की त्यांना इतरांपेक्षा लवकर साक्षात्कार मिळाला म्हणून त्यांची योग्यता जास्त आहे. अशांनी येशूच हें वाक्य - जो पहिला असला तोच शेवटी राहणार - लक्षांत ठेवावं. तेव्हां लक्षांत घ्या की तुमची प्रगति तुम्ही स्वतःच करायची आहे , वर सांगितलेल्या शक्तीचा आविष्कार तुम्हीच तुमच्यामधें घडवून आणायचा आहे. हा आविष्कार म्हणजे काय हे तुम्हाला कितीसं समजलं आहे मला माहीत नाहीं.

या इंग्लंडमधे असं आहे - "त्या माणसाने नुसता मला स्पर्श केला आणि माझा अहंकार वळावला." एखादा अहंकारी माणूस कुणाबरोबर नुसता बोलला तरी तो दुसरा माणूस लगेच अहंकारी बनतो. मी म्हणते की याला संवेदनशीलता म्हणत नाहीं. तुम्ही परमेश्वराबद्दल संवेदनशील व्हा. दुसऱ्या कोणाबद्दल नाहीं. वाईट गोष्टीबद्दल तर मुळीच नाहीं. पण सामान्य माणूस वाईट गोष्टींकडे पटकन् झुकतो आणि चांगल्याकडे इतका लवकर वळत नाहीं. म्हणून तर चांगल्या गोष्टी आत्मसात करण्याची शक्ति तुम्ही सहज प्राप्त करुन घेण्यासारखी वस्तु आहे. पण या गोष्टींची कौतुकं करण्यापेक्षां त्या शक्ति मिळवण्याची आव्हानं स्वीकारली पाहिजेत. त्याची सुंदर आवड वाटली पाहिजे आणि त्यातूनच तुमची प्रगति होणार आहे हा विश्वास हवा. चमत्कारिक लोक - नुसत्या डिग्री असलेले नसती टीका करणारे. अशांना आधीच इशारा दिला पाहिजे आणि नंतर जरुर पडल्यास बाहेर टाकलं पाहिजे. मला इथल्या सर्व गोष्टी पाहिल्यावर , तुमच्या चैतन्यलहरी पाहिल्यावर , एखाद्या ट्रीपला आल्यासारखे लोक इथं बघितल्यावर मला फार वाईट वाटलं , मी किती निराश झाले तुम्हाला समजणार नाहीं. मी प्रेमाने नेहमीच भारावून जाते आणि तुमच्या प्रयत्नांचं खूप कौतुक करते हे मात्र लक्षांत घ्या. तुम्हीच ओळखाल.

गौरीमातेची शक्ति आणि आशीर्वाद असलेली व्यक्ति जेव्हा एखाद्या हॉलमधें प्रवेश करते तेव्हां तेथील सर्वांची कुंडलिनी लगेच वर चढते , जणुं त्याला वंदन करते. गौरीची शक्ति मिळाल्यावर तुम्ही वेगळेच ओळखले जाता , तुमच्या नजरेतच निरागसपणा , निष्पापपणा , निःस्वार्थीपणा , चमक आणि प्रसन्नता येते आणि जिथें तुमची नजर जाईल त्या माणसाची कुंडलिनी लगेचच चढते. गौरीमातेच्या या एकाच शक्तीमुळें कॅन्सर व इतर सर्व रोग लवकर बरे होतात. तुमचे सगळे प्रश्न मिटतात. तुमच्यातील सर्व बाधा निघून जातात आणि तुम्ही कमळासारखे सुंदर , सुगंधित बनता आणि सर्व विरोधी प्रवृत्तींचा नाश होतो.

ती शक्तिच तुम्ही बना. फक्त तत्वाकडे लक्ष द्या , आंतून आपल्याकडेच बघा. प्रत्येकानें आपल्यातील तत्वाकडे पहायला शिका. नाहीं तर आपण नेहमी मित्र , प्रेयसी , नवरा-बायको आणि इतर कितीतरी गोष्टींचीच काळजी करत असतो. ही खरी स्थिती नाहीं , ही अवस्था खालच्या दर्जाची आहे , कदाचित

भावना हृदयांत खोलवर रुजवू या की " परमेश्वराच्या कृपेनें आपण अशा काळांत जन्माला आलो आहोत जेव्हां हे सर्व (आत्मासाक्षाराचा सहजयोग) घडत आहे. या परमेश्वरी कृपेला आपणच योग्य ठरलो आहोत , आपल्याला त्यातून आत्मसाक्षात्कार मिळाला आहे आणि त्यामुळें आपण या उन्नतीच्या उच्च स्तरावर पोचलो आहोत." पण त्याकरतां आपण आपले पंख पसरु या.

म्युनिचमधें (आधीं अहंकारी असलेले) लोक आतां इतके पुढे गेले आहेत - सखोल झाले आहेत , मुलंसुद्धा , की माझा शब्दन् - शब्द हिऱ्यामोत्याच्या किंमतीसारखा मानतात व लक्ष देऊन ऐकतात , लिहून ठेवतात.ते फार निश्चयी स्वभावाचे आहेत.त्यांनी चांगलं वागायचं ठरवलं तर खूप चांगलं काम करतील. पण इथं लंडनमध्ये मी इथून जायचा अवकाश की लोक फालतू गप्पा मारायला सुरुवात करतात.मी ऐकते , चैतन्यलहरींतून मला सर्व समजतं.आपण अजून गहन झालो नाहीं , आपल्याला गहनतेंत उतरायला हवं.यालाच 'श्रद्धा' म्हणतात. श्रद्धा फार महत्वाचा गुण आहे.मला खात्री आहे की या वर्षी सहजयोग रक्तांत रुजवायचा तुम्ही निश्चय कराल.कदाचित् पूर्वी तुमचं कांही तरी चुकलं आहे त्याचा विचार करुन करुन तुम्ही कण्डिशन्ड झाला आहात. तर मग मी काय करणार ? तुम्ही नक्कीच करुं शकाल , भूतकाळ विसरुन जा. सहजयोगांत भूतकाळाला कांही अर्थ नाहीं.तुमच्यांत आता पूर्ण परिवर्तन झालं आहे. फक्त तुम्ही तुमच्यातील शक्तीचा वापर करा.मी तुमच्या सर्व व्यवस्थेकडे (चक्रांकडे) लक्ष ठेऊन आहे आणि त्यांची काळजी घेत आहे. तुम्हालाच स्वतःबद्दल आत्मविश्वास नाहीये.आणि असेच अश्रद्धाळू लोक आगाऊपणा करतात.तेव्हा पहिल्या प्रथम तुम्ही आत्म्याच्या स्व-रुपांत या , अगदीं हृदयापासून , आणि तुमची आंतरिक शक्ती दृढ करा - बडबड करुन वा दिखाऊपणा ठेऊन नव्हे तर आत्म्याची शक्ति वाढवा.

आपणच आपले पंख का म्हणून कापायचे ? तुम्ही उथळ मनाचे , सोप्यासुध्या गोष्टींची काळजी क रणारे होऊं नका , आतां त्याला महत्व नाहीं. जरा तुमच्या या आधीच्या जीवनाकडे बघा - तुम्ही जिभेचे चोचले खूप पुरवले , खूप हिंडलात , मजा केली , पुन्हां-पुन्हां लग्न केलीत , इतर लोक ज्याच्यांतच आपलं आयुष्य वाया घालवतात त्या मूर्खपणाच्या गोष्टी केल्या - आतां ते सारं संपलं आहे. आतां तुम्हांला नवीन मार्गानें जायचं आहे. तुम्ही पूर्वजन्मापासुन आजपर्यंत कितीदा लग्न केलीत , किती घरं बांधली.किती ऐष-आराम उपभोगला ! आतां सर्व संपलं.संपून जाऊ दे.ही आतां खास संधी मिळाली आहे.आतां तुम्ही उन्नत होऊ शकला नाहींत तर पुढें कधीच होणार नाही.हीच वेळ आहे हे ध्यानांत घ्या. हा ऋतंभराचा काळ आहे आणि याच काळांत तुमची उत्क्रांती होणार आहे. याचा पूर्ण उपयोग करा आणि पूर्ण निष्ठेनें सहजयोगांत उतरा.याचा अर्थ तुम्ही तुमचे व्यवसाय सोडून द्या असा नाहीं.तुम्ही सहजयोग निष्ठेनें केलात तर तुम्ही कुठलंही काम निष्ठेनेच कराल.पण ही निष्ठाच कमी पडते.ही फार शरमेची गोष्ट आहे की परमेश्वराच्या साम्राज्यांत आल्यावरही कांही लोकांच्या भयानक सवयी सुटत नाहींत.हे कसं चालेल ? कांही लोक मुळीच बोलणार नाहीत किंवा मुळीच खाणार-पिणार नाहींत.ही सर्व बेशिस्त आहे. एकदा उच्च दैवी स्तरावर आल्यानंतर तुम्ही आत्म्याकडून शिस्त शिका म्हणजे आपोआप शिस्त तुमच्यांत बाणेल.आत्म्याचं तुमचं जीवन चालवूं दे.हे शक्य आहे.हे शक्य आहे कारण मी ते सारं पाहिलं आहे.लोकांजवळ इतक्या थोडा वेळ त्यांची नावंसुद्धा माहीत झालेली नसताना - असूनही इथं मी तुम्हां सर्वांना नावांने ओळखते , तुमच्या चैतन्यलहरी जाणते आणि ते खूप पुढे गेले आहेत.तेव्हां आजचा दिवस महान आहे , भाग्याचा आहे.हाऊस ऑफ लॉर्डस् सारखे तुम्ही खास लोक आहांत.आता ते हाऊस ऑफ लॉर्डस्पणा संपणार आहे म्हणा. तुम्ही खऱ्या अर्थानें 'लॉर्डस्' सारखे वागा. म्हणूनच माझी तुम्हाला प्रेमाची विनंती आहे की या शिस्तशीर राहणीचा आदर करा.मी " हेच करा , असंच करा " अशा अर्थात हें म्हणत नाहीं , काय करायचं हे तुम्हीच जाणलं आहे.आणि त्यानंतरही मला ' मला माहित आहे , मी असं नको होत " असं सांगू नका.तुम्हाला जर कळत आहे तर तसंच कां नाहीं वागत ? तुम्हाला ती शक्ती मिळाली आहे. आज आपण पूर्ण विश्वासानें आणि आपल्या उन्नतीबद्दलच्या आत्मविश्वासानें हृदयापासून ही पूजा करुं या आणि निश्चय करुं या की 'मी स्वतःला शिस्त लावून घेईन.' ही नवरात्री नव्या जोशानें सुरु होत आहे. या प्रखर चैतन्यलहरींचा खूप फायदा करुन घ्या.

आज इंग्लंडमधें आपण कुमारीमातेची पूजा करत आहो ही फार मोठी गोष्ट आहे. आतां तुम्हांला माहीत आहेच की इंग्लंड हे विश्वशक्तीचे हृदय आहे , इथें शिववास करुन आहेत आणि कुमारीमातेचा हा आदरसत्कार , हा सन्मान , ही पूजा इंग्लंडमध्येंच होत आहे ही सहजयोग्यांना फार भाग्याची गोष्ट आहे.आतां कुणी म्हणेल की कुमारीला एवढं महत्व कां ? तिचा एवढा आदर का राखतात ? तिची शक्ती काय आहे ? ती म्हणजे तिनें ख्रिस्तासारख्या महान व्यक्तीला जन्म दिला , तिनें स्वतः पासूनच श्री गणेश निर्माण केले.तिनें पूर्णपणे निरहंकारी - ज्यांना अहंकार हा शब्दच माहीत नाहीं - अशा आपल्या मुलांची अबोधिता आणि त्यांच्या शक्तींचं रक्षण केलं. हे सर्व एखाद्या पुण्यात्म्यालाच मिळतं , ज्यानें पूर्वायुष्यांत खूप चांगलं कार्य केलं आहे.ज्याला समजलं आहे की कौमार्य ही इतर कुठल्याही शक्तीपेक्षां मोठी शक्ती आहे आणि त्याच्या पावित्र्याचं आणि शुद्धतेचं रक्षण करण्यांत ती सदैव तत्पर असते.तुम्हाला माहीत आहे की आपल्या शरीरांत ती कुंडलिनी रुपांत असते.म्हणजेच ती अत्यंत शुद्ध , पवित्र आहे.आत्मा होण्याची इच्छा सगळ्यांत शुद्ध इच्छा , पवित्र त्याच्यावर कसला डाग नाहीं , तिला फक्त शुद्धताच हवी असते.दुसरी कुठलीही इच्छा नाहीं फक्त स्वतःच परमात्मस्वरुपांत होण्याची. इतर सर्व इच्छा संपलेल्या असतात.

तुम्ही आशीर्वादित आहांत.म्हणून तक्रार करण्याऐवजी किंवा चरचरपणा दाखवण्याऐवजी ही तुमच्यावर फार मोठी कृपा झाली आहे हे लक्षांत घ्या.फार मोठी कृपा , तुम्हाला पूर्णपणें क्षमा केली आहे आणि एवढे महान आशीर्वाद तुम्हाला मिळाले आहेत.त्याला योग्य राहण्यासाठीं तुम्ही फार मेहनत घेतली पाहिजे.स्वतःला दोषी मुळींच न मानतां नम्र व्हा आणि ऋणी व्हा.आजपर्यंत तुम्ही इतकी वेडीवाकडी कामं केलीत तरीही तुम्हाला देवता बनवलं आहे.हे चरणामृत - सोमरस - ज्यानें

तुमच्या आईचे पाय धुतले ते प्यायला तुम्हीच योग्य झाला आहांत.तुम्ही आता या उंच स्तरावर आला आहांत मग तुम्ही कसली तक्रार करत राहणार ?

मला तुमच्यापैकी कुणीही , पुरुष वा महिला कोणीही , अपराधीपणाची भावना मनांत मुळींच बाळगायला नको असं वाटतं.हा तुमच्यातला फार मोठा दोष ठरेल.तुम्हाला माहीत आहे की त्याचाच पुढें उलटा परिणाम होतो.त्याचा कांही उपयोग नाहीं.पण आपल्याला जेव्हां हे समजू लागतं तेव्हां त्याबद्दल आपण नम्र झालं पाहिजे. अपराधी नाही तर विनम्र. तुम्ही जर नम्र बनला नाहींत , आक्रमकपणे सहजयोगांतून काय मिळालं अशी तक्रार करत राहिलात आणि स्वत:जवळच असलेल्या तुमच्या क्षमतेची जाण ठेवली नाहींत तर तुम्हाला काय मिळणार ? तुमच्यांतील सर्व दोषांची क्षमा करुन तुमची कुंडलिनी जागृत झाली आहे हे तुम्हाला माहीत आहे.

आज इथें आपण परमेश्वराचे दूत म्हणून जमले आहोत.तुम्ही नम्र व्हायलाच हवं.तुमचा भूतकाळ कसाही असो , तुम्ही कितीही चुका केल्या असतील तरी मी आतां तुमच्या जवळ आहे.अपराधी वाटून घ्यायचं नाहीं.हे जरा विचित्र वाटेल पण तुम्ही स्वत:कडे बघण्याचा प्रयत्न करा.आपण जसे आहोत तसेच स्वत:ला बघूं या.आपण अबोधिता व निरागस पावित्र्य हरवून बसलो तर प्रथम हा अहंकार प्रबळ व्हायला लागतो आणि मग आपलं कांही तरी चुकलं असं म्हणूं लागतो. कुंडलिनी ही तुमची शक्ति आहे.तीच तुमचा आधार आहे.ती पवित्र आहे.अबोधिता ही तुमचं सामर्थ्य आहे.ती नष्ट होणं हे आपल्याकडून होणारं प्रथम पाप ठरेल. म्हणून तिच्याबद्दल आपण नम्र होणं फार महत्वाचं आहे.त्यानंतरच आपण कांही प्राप्त करुन घेऊं शकू , ते म्हणजे एखादं साम्राज्य नव्हे किंवा सुखोपभोगी जीवन नव्हे तर सदाशिवांच्या पवित्र राज्यांत प्रवेश.

शिव हे मूर्तिमंत क्षमा आहेत. ते सगळ्यांना क्षमा करतात. अगदी राक्षसांनासुद्धां.पण त्यांना आत्मसाक्षात्कार देतां येतो का ? पिशाच्यांनासुद्धां क्षमा करतां येईल पण त्यांची ' जागृति ' होऊं शकेल काय ? नुसती क्षमा हा एक भाग झाला.नुसती क्षमा मिळाली , अगदी शिवाकडूनही म्हणजे काय झालं ? त्याचं आयुष्य वाढणार आहे कां ? आणि तसं झालं तरी त्या आयुष्याला काही अर्थ असेल का ? जे लोक निष्पाप नाहीत ते आनंद देऊ शकत नाहींत.ते स्वत:ही फार त्रासदायक जीवन जगतात आणि दुसऱ्याचं आयुष्यही अर्थहीन , त्रासदायक करतात.अहंकारीपणा हा बालकाचा गुणच नव्हे.आपण मुलांसारखं झालं पाहिजे. आणि तसे तुम्ही नसलात तरी तुम्हाला जागृति मिळाली आहे.आणि आतां तुम्ही देवांच्या बरोबरीचे झाला आहांत.नव्हे त्यापेक्षांही उंचीवर आला आहांत.तेव्हां आपलं भूषण कोणतं तर नम्रता , निर्मलता , साधेपणा , चलाखीपणा , आगाऊपणा , दुसऱ्यांना कमी लेखणं , दिखाऊपणा नव्हे तर संपूर्ण शरणागति , ' मी ' पणाच्या सर्व वृत्तिसुद्धां अर्पण करुन शरणागति.

ज्या कल्पना साऱ्या विश्वाला लागू होत नाहीत त्यांना निर्मल-पवित्र देवतेजवळ थारा नाहीं.तीच त्या पवित्रतेची खुण आहे कारण तोच तिचा स्वभाव , स्वधर्म आहे.सर्व प्रकारचे भेदभाव , जातिपाति , धर्मांधपणा , ज्यामुळे माणूस माणसापासून , महिला महिलांपासून , देश देशांपासुन दुरावला आहे.या सर्वांना तुम्ही अबोधित झाला कीं थाराच रहात नाहीं.पण हे बौद्धिक स्तरावर मिळणार नाही तर कुंडलिनी जागृत झाल्यावरच हे घडणार आहे. पण त्यांत सातत्य येण्यासाठीं तुमच्या अंतरंगात सुधारणा झाली पाहिजे - बाहेरची सुधारणा नाही. म्हणून मुळांकडे , मूलाधाराकडे लक्ष द्या.तेच तुमच्या व्यक्तिमत्वाचं मूळ आहे , त्यातूनच तुमची सर्वांगीण वाढ होते.म्हणून तुमचं लक्ष मुळाकडे ठेवा , फांद्यांकडे नको , आत्मपरीक्षण करा आणि मुळांची वृद्धि करा.पाश्चिमात्य समाजामध्यें याचीच उणीव आहे हे तुम्हालाही आता समजेल.तुम्ही तुमच्या मुळांना विसरला आहांत , म्हणून स्वत:ला सामोरे जा आणि मुळांपर्यंत पोंचा , मी तुमच्या पाठीशी आहे.आपल्याला मुळांशी गेलंच पाहिजे.

ही पवित्रता तुमच्यामधें प्रस्थापित पुन:प्रस्थापित होऊं दे.आज तुम्ही सर्वांनी शपथ घ्या - हा नववर्षाचा सण आहे - आम्ही आमच्या गलिच्छ भावना , अरेरावी स्वभाव , अधिकार गाजवण्याची वृत्ति , अहंकारी वागणं हे सर्व त्याज्य करणार." त्यांचा काय उपयोग आहे मला कळत नाहीं.जोपर्यंत तुम्ही हे सर्व अर्पण करुन शरण होत नाहीं तोपर्यंत ही पावित्र्याची शक्ति , श्रीगणेश तुमच्या आज्ञाचक्रावर जागृत (प्रसन्न) होणार नाहींत.आपण आजपर्यंत जे केलं त्यातून आपल्याला हेच शिकायचयं की आपण सर्वांबरोबर , इतर सहजयोग्यांबरोबर , आपापसांत खुप नम्र व्हायला हवं , प्रेमळ व्हायला हवं , विश्वमानवासारखं व्हायला हवं.

आतां असं पहा. एकाद्या झाडाची मुळंच गेली , तर वाळून जातं , त्याच्यापासून सावली मिळत नाही , आणि नंतर ते मृतप्राय , भयाण दिसायला लागतं.मरता-मरतांही कोलमडून एकाद्याच्या अंगावर कोसळत.त्याचे काटे पण फार वाईट असतात.हे जणु वाळूच्या प्रदेशांत येणारे काटेच.तसंच एखादा समाज जेव्हां अगदी खालच्या पातळीवर - एकमेकांबद्दल द्वेष , सुखोपभोगी वगैरे - त्यातुन कमळ वा गुलाब फुलणार नाहीं.पण तुम्ही या देशांत कमळ बनला आहात , तुमचा जन्म चिखलात झाला असला तरी आतां स्व-स्वरुपात या.तुम्ही कमळांसारखे सुंदर होता.या चिखलात पडल्यावर चिखलच होऊन गेलात. आणि आतां पुन्हा वर आलात , पण तुमचं मूळ स्वरुप तेच राहिलं.आतां जरी कमळं झाला असाल तरी त्याला अजून सुगंध नाही.सुवासाशिवाय कमळ असतं का ? सुगंध कमळाला असलाच पाहिजे.या सुगंधामुळेच चिखलातील घाणीचा दर्प जातो.तुम्हाला भारतीय सहजयोग्यांपेक्षा पुढं जायचं आहे.पण याउलट सगळ्यांमध्यें आगाऊपणा बघून मला खुप आश्चर्य वाटतं.ते सारखे याच्याबद्दल , त्याच्याबद्दल , एकमेकांबद्दल रडगाणी गातात व तक्रारी करतात.हे कां होतं , ते स्वत:ला कोण समजतात ? कारण तुमच्या मुळांची अजून वाढ व्हायची आहे.

एकदां तुमची मुळं वाढू लागली की तुमच्या वागण्यामध्यें नम्रता लगेच दिसायला लागते.हृदयापासुन जी नम्रता मिळत नाहीं ती कृत्रिम वाटते.तुम्ही पवित्र झाल्यावर , अबोधित झाल्यावरच ती दृग्गोचर होते. अबोधित म्हणजे नुसते नीतिमान नाहीत , नीतिमत्ता म्हणजे अबोधिता नव्हे , पुष्कळ लोकांना वाटतं की नीतिमान व्हायला हवं , पण तेवढंच नाहीं तर उपभोगवादी वृत्ति पण बदलायला

हवी.कांही लोकांना मुलपेक्षा घरातल्या कार्पेटची जास्त काळजी असते.नको त्या गोष्टींबद्दल , ज्या वस्तू कायमच्या याच जगांत शेवटी सोडून जायचं आहे अशा वस्तूंबद्दलही दिवसभर वादविवाद करत राहतात .सुखलोलुप वृत्ति ही हिट (Hit) " आहे , तीच तुमच्यातील अबोधिता नष्ट करते.

माझा तर अनुभव हा आहे की एखादी वस्तु मी दुसऱ्या कुणाला दान केली तर त्यांतून मलाच आनंद मिळतो.हा माझा नेहमीचा अनुभव आहे , घेण्यापेक्षां देण्यांतुन मला आनंद मिळतो.मी म्हणजे तुम्हीसुद्धां कांहीतरी दुसऱ्याला देऊन बघा आणि त्यातून होणारा आनंद मिळवा.आतां ती वस्तु तुम्हाला नको आहे म्हणून देऊन टाकायची असा याचा अर्थ नाहीं.खरं म्हणजे ने अशाच हेतूनं दिलं जातं , कारण कदाचित कुठलीही वस्तु बाळगायची म्हणजे त्रासच आला. अगदी साधी वस्तुसुद्धां कुठलीही वस्तु बाळगायची म्हणजे स्वतःच ते वस्तुरुप होणं.ही एक गुलामी आहे.त्यानें तुमच्या प्रगतीमधें अडथळा येतो.मिळवणं आणि देऊन टाकणं म्हणजे एका हातानें घेणं आणि दुसऱ्या हातानें देऊन टाकणं.

भौतिक जीवन म्हणजे सुखकारक वस्तु निर्माण करणें , एखाद्या कपांतून अमृत देण्यासारखें असेल , प्रेम-शक्तीनें भरलेलं , तर ठीक पण तो कपच तुम्ही खाऊन टाकणार नाहींत. मला दिसत ते भौतिक जीवन हे हा कप खाऊन टाकण्यासारखं आहे , त्यातल्या अमृतासारखं नाहीं.कपाला महत्व आहे की त्यातल्या अमृताला ? समजा तुम्हाला सोन्याच्या कपांतून विष दिलं तर कप सोन्याचा म्हणून तुम्ही ते विषही घेणार कां ? कुणी जाणूनबजून सोन्यातल्या कपातुन , केवळ कप सोन्याचा म्हणून विष प्यायला तयार होईल कां ? एवढी साधी गोष्टपण लोकांना समजत नाही.भौतिक बाह्य वस्तूपासून कायमच सुख मिळणार नाहीं हा अर्थशास्त्राचा मूळ विचार आहे.

माझ्या अबोधिततेमुळें मी जिथें वस्तु सगळ्यांत कमी किंमतीत मिळेल तिथें जाते.आणि त्या दुसऱ्यांना देता येतात म्हणून मला त्यांतून खूप समाधान मिळतं.म्हणून मी म्हणेन , आणि आत्म्याच्या अंत:शक्तीतून , पवित्रतेतून , म्हणेन की तुम्ही आनंद मिळवण्याची शक्ती गमावून बसला आहांत , आनंदाचा नाश करणारे आहांत , दिवसभर तुम्ही एवढंच काम करतां - मी या जिभेंतून कटु भाषा बोलताना माझे दोन्ही हात जोडून घेते कारण तुमचं मन दुखेल याची मला जाणीव असते , तुमचं मन जास्त दुखावणार नाहीं याची काळजी घेते.तुमचं हृदयच जणूं मी माझ्या हातांत सांभाळते म्हणजे तुमचं मन दुखावणार नाहीं. भाषा कटु नव्हती पण त्या भाषेंतील सत्य कटु होतं , म्हणूनच तर मी हात जोडून तुमचं हृदय संभाळून घेतलं होतं म्हणजे तुमच्या मनाला त्याच्या वेदना होणार नाहींत.

कुणालाही दुखवण्याकरतां तुम्हाला फक्त तोंडच उघडावं लागतं.पण अशा बोलण्यातून राग-द्वेषाच्या कितीतरी लहरी तुम्ही स्वत:मधेंच निर्माण करता.उलट मला दिवसाचे चोवीस तासही प्रेम करायला कमी पडतात.आता मी साठ वर्षांची झाले पण प्रेम करायला हा एवढा काळहि अपुरा पडला याची खंत वाटते. हा प्रेमाचा स्त्रोत इतका जोरदार आहे की कधी कधी माझ्या शरीराला तो पेलवत नाहीं , मग मला वाटूं लागतं की आपण इतकं प्रेम देतो त्यांत कांही चूक तर नाहीं ना ? अशा पूजेमध्येही साध्याशा निमित्तानें माझी काय अवस्था होते हे तुम्हाला माहीत आहेच.मला तुम्ही पूजेला बोलवता त्यावेळी तिथें काय आणखी होणार याचीच मला कधी कधी भीति वाटते. मग कुणीतरी प्रश्न विचारेल., " माताजी , आम्ही तुमच्याकडून सर्व चैतन्यलहरी खेचून घेतल्या कां ? " हे अगदी उघड आहे पण म्हणूनच मी ते बोलून दाखवीत नाहीं.मी जर तसं कांही म्हणाले तर तुमची विशुद्धि पुन्हा पकडेल आणि तुम्हाला कमी प्रमाणांत चैतन्य लहरी मिळतील.

पण आतां समय आला आहे की आता तुम्ही तुमच्या वागण्यामधून देवाचंही मन बदलू शकाल.रागीट देवता असली तरी तुम्ही तिला प्रसन्न करुन घ्याल.या पाश्चिमात्य लोकांमध्यें कोण याला लायक बनणार आहे ? तुम्हीच आज मला सांगा.तुम्हालाच या कामाकरितां निवडलं आहे , तुमच्यावर विशेष मेहनत घेतली आहे ज्यामुळे कारुण्य-देवता जागृत होईल आणि ते इतरांना हितकारक होईल असा समय येईल.ज्यांचा अहंकार गेला नाहीं त्यांची सहजयोगांत काय अवस्था होते तुम्ही पाहिलंच आहे.आमच्या एका प्रोग्रामला हजार लोक जमले , पण नंतरच्या बैठकीला त्यातले तीनच.हे इकडचं वैशिष्ट्य आहे.माझ्या आयुष्यातील मोलाचा काळ मी या देशांत (इंग्लंड) आणि पाश्चात्य लोकांमध्ये घालवला आहे.तरीसुद्धा या उद्धटपणाचं मला कधी कधी नवल वाटतं. एकमेकांमध्येंच नव्हे तर माझ्याशीसुद्धां हा उद्धटपणा ! कधी कधी तर ते उद्धटपणें माझ्यांशी कसे वागूं शकतात हेच मला समजेनासं होत.त्याचं माझ्याशी बोलणं , माझ्याबरोबरचं वागणं वगैरे पाहिल्यावर ते असे कसे असू शकतात हेच मला समजत नाहीं.

माझं काम फार नाजूक आहे.तुम्ही आधीच दुःखी लोक आहांत कारण तुम्हीच स्वतःला दुःखी बनवलं आहे.दुसऱ्या कुणीही तुम्हाला त्रास दिला नाहींये तर तुम्ही स्वतःहूनच अगदी नकळत हा त्रास आपल्यावर ओढून घेतला आहे. प्रत्येक लहान-सहान गोष्टींमधून हा त्रास तुम्ही करुन घेत आहांत.आणि याचं त्रास करुन घेण्यांतून तुमच्यांत अपराधीपणाची भावना रुजली आहे आणि त्यामुळें तुम्ही इतरांना दुःखी करता , इतकं हे सोपं आहे , म्हणून तुम्ही स्वतःलाच दुःखी करु नका , त्याची कांहीही जरुरी नाहीं.एवढंच लक्षांत ठेवा की दुसऱ्याशीं कठोरपणें वागण्याची तुम्हाला अजिबात जरुर नाहीं.तुमचं सर्व वागणं मधुर , आल्हाददायक असलं पाहिजे.तुमच्या मनांत सर्वांबद्दल करुणाच असूं दे.(आता मानसशास्त्रज्ञ तुम्हाला तुमच्या या मनोवृत्तीच कारण सांगताना म्हणतील की "तुमची इच्छा-शक्ति दांडगी असली पाहिजे.तुम्ही असं कठोर राहिला नाहींत तर दुसरे लोक त्याचा फायदा घेतील." पाश्चात्य लोकांकडून कोण कसला फायदा करुन घेणार आहे ? हें म्हणणचं अगदी मूर्खपणाचं आहे.ज्या लोकांनी साऱ्या जगावर अन्याय केला त्यांनीच असं म्हणणं हे चुकीचं आहे.मला समजत नाहीं की हे लोक - मानसशास्त्रज्ञ - असं समर्थन कसं करु शकतात.)

जिकडे-तिकडे , कुठल्याही वेळीं हा उद्दामपणा दिसून येतो.स्त्रियांमध्येही हा दुर्गुण दिसल्यावर मला फार आश्चर्य वाटलं.मी बेल्जियमला गेले होते तिथल्या

स्त्रिया तर या इंग्रजी महिलांपेक्षांही वाईट.फारच भयंकर , अगदीं बेकार ! विचारुच नका.त्यांच्यामधें प्रेम नाहीं , प्रेमळपणा नाहीं , कांहीं-कांहीं नाहीं.नुसता दिखाऊपणा आणि सारख्या सांसारिक विषयांत दंग , अगदी लाकडासारख्या शुष्क.वर त्यांना म्हणे आत्मसाक्षात्कार हवा.कुठलातरी मोठेपणा हवा नुसता. त्यांना काय वाटतं हेंच मला समजत नाहीं.

आजचा दिवस पवित्रतेचा आहे.या इंग्लंडमधल्या महिलांकडून मला खूप आशा आहेत.इथले पुरुष कांहींच बोलत नाहींत.या बाबतींत बेल्जियमचला प्रकारच वेगळा , कुठलाही पुरुष तोंडातून शब्दच काढणार नाहीं , त्यांची तोंडच जणु बंद करुन टाकली आहेत.माझ्यावर विश्वास ठेवा , त्यांच्या तोंडाला बायकांनी कुलुपं घालून ठेवली आहेत.फार भयंकर.ज्या देशांत फक्त बायकाच बडबड करतात.पुरुषांना बोलूच देत नाहीत त्या देशाचं पुढे काय होणार आहे ? हे फार वाईट आहे , याचा विचार झाला पाहिजे.हे सर्व करुन या बायकांनी काय मिळवलं ? आपल्या भारताचा पंतप्रधान तरी स्त्री आहे.त्या बायकांनी काय मिळवलं ? नुसतं घरांत चार भांडी-कुंडी धुवायची , डामडौल करायचा याच्याशिवाय चांगलं कांही करणंच नाही.मला तर हे समजतच नाहीं.मग कुठल्या गोष्टींचा त्याग करणं त्यांना जमेल ?

सहजयोग आतां एका नवीन वळणावर आला आहे.याची तुम्हाला आठवण करुन देणं माझं काम आहे.सहजयोगाबद्दल कांही भलत्याच समजुती , कल्पना वगैरे करुं नका.तुम्ही दुसऱ्या कुणावर नव्हे तर स्वतःवरच उपकार करायचे आहेत.जपून रहा.माझं सांगणं गंभीरपणे लक्षात घ्या.आतां तुम्हाला विशेष उन्नत व्हायचं आहे.नुसती माझी पूजा करुन भागणार नाहीं एवढंच माझं म्हणणं समजावून घ्या.आतां तुम्ही स्वतःशीच प्रार्थना करा , तुमच्यांतील सर्व देवांचीच पूजा करा.त्यांना जागृत करा.सर्वांत प्रथम देवी.देवता म्हणजे तुमच्यांतील नम्रपणा , अबोधिता आणि सहजपणा.त्यांचीच पूजा करा.त्यांना जागृत आणि प्रसन्न करुन घेतल्याशिवाय तुमचं संरक्षण होणार नाहीं , तुमची प्रगति होणार नाहीं.

स्त्रीचे मोठेपण ती किती स्वार्थत्याग करते यावरुन कळते.हे एक आव्हान आहे.तुम्हा सर्व ' जागृत ' झालेल्या स्त्रियांना माझं सांगणं आहे की तुम्ही स्वतः आधी नम्र व्हा.नम्र झाल्याशिवाय तुमच्यातील गुणांचा आविष्कार होणार नाहीं , तुम्ही उलट प्रत्येक बाबतीत आक्रमक आग्रही राहतां , कशाबद्दल ? तुम्ही असे उद्धट व कासावीस होणारे असाल तर या पवित्रतेची पूजा होणं अशक्य आहे. ही पवित्रता अगदी साधीसुधी देवता आहे.फार साधी.तुमचे कसले बेत आहेत आणि तुम्ही कशाला महत्व देतां हे तिला समजत नाहीं.तिचा मुख्य गुण ही पवित्रता आहे आणि तिला हें माहित आहे , त्याला ती धक्का लावूं देणार नाहीं.तीच तिची संपत्ती आहे.तेच तिचे ऐश्वर्य आहे.तोच तिचा मोठेपणा आहे.आणि ती कुणालाच घाबरत नाहीं म्हणून ती नम्र आहे.ती आक्रमक नाहीं , पण ती कुणाला हल्ला करुं देणार नाहीं.सात्विक पावित्र्याला धक्का लावायला कुणी धजावत नाहीं.

मी पुन्हां एकदा सांगते की सहजयोगाचं नवीन पर्व सुरु झालं आहे. सहजयोगाबद्दल भलत्या कल्पना करुं नका.त्यानें तुम्हाला सर्व आशीर्वाद दिले आहेत.तुम्ही आतां प्रकाशात आला आहात.सहजयोगाचा दुरुपयोग करुं नका , स्वतःला सुधारण्याचा प्रयत्न करा.आश्रमांत राहूनही तुम्ही तक्रारीच करणार असाल तर तुम्ही बाहेर पडणं चांगलं.तो तुमच्या सोयीसाठी नाहीये.तुमची कुणाला जरुर नाहीं.मी म्हणते हे लक्षांत ठेवा.कुणालाही तुमची जरुर नाहीं.तुम्ही खरे साधक असाल , तुम्हाला तुमच्या मुळापर्यंत जायचं असेल , तर सर्व कांही मिळेल कारण तुम्हाला तुमची स्वतःचीच जरुर आहे.पण असं मुळापर्यंत पोचायला उद्धट न होतां नम्र झालं पाहिजे.

आपली प्रगति कां होत नाही हे आपणच समजून घ्यायला हवं.खरं म्हणजे ज्यांना आत्मविश्वास नसतो तेच उद्धटपणा करतात.ज्यांचा ' स्व ' जागृत होत नाही त्याचाच आत्मविश्वास मरुन जातो.तुमच्यातला खरा ' स्व ' जागृत होऊं दे.' स्व ' जागृत नसल्यामुळेच सगळे प्रश्न निर्माण होतात आणि तक्रारी सुरु होतात. खरं म्हणजे प्रश्न तुमच्यांतूनच निर्माण होतात.म्हणून खरं तर देवानेच तुमची तक्रार करायला हवी.कारण त्याच्यामुळेंच तुम्हाला मानव - जन्म मिळाला , त्यानें तुम्हाला भूतलावर सर्व सुखं प्रेमानें दिली , तुम्हाला आत्मसाक्षात्कार दिला , आत्म्याचा प्रकाश दिला , कांहीही द्यायला कमी केलं नाहीं - आणि तरीही तुम्ही त्या परमेश्वराबद्दलच तक्रार करतां ? " मला बरं नाही , मी बरा व्हायला हवा , मी चुकलो " वगैरे तुम्हीच कुरकुर करत आहांत.असं कुरकुरत बसाल तर पस्तावाल.

ज्यांना जागृति मिळत नाहीं असे पुष्कळ लोक गर्विष्ठ असतात." माताजी मला कांहीच जाणवत नाहीं , कांहीच वाटत नाहीं." अशा वेळी तुम्हालाच लाज वाटली पाहिजे , आपण कशाला तरी मुकलो आहोत एवढी तरी जाणीव यायला हवी.कांहीतरी चुकत असेल आणि ते जाणण्याची इच्छा असेल तर स्वतःलाच म्हणा " माझं कुठेतरी चुकतय् , मी सुधारायला हवं." उलट तुम्ही म्हणतां " मला कांहीच वाटलं नाहीं , कांहीच कळलं नाहीं." ज्ञान हे अबोधितेतूनच प्राप्त होतं. हे ज्ञान खेड्यातल्या किंवा अगदी साध्या माणसात उपजत असतं.ते कसले बेत करत नाहींत.तुम्ही त्यांची मजा करायचा प्रयत्न करा म्हणजे तुमचीच फसगत झाल्याचं तुम्हाला शेवटी कळेल.खेड्यातल्या एखाद्या खेडवळ पण साध्या , जमिनीवरच राहणाऱ्या माणसाची चलाखी दाखवून गंमत करायला बघा , तुम्ही मोठे शिकलेले , एम्.ए.पी.एच्.डी.असलात तरीही तुम्हाला अर्ध्या-एक तासातच कळून येईल की तुम्हीच स्वतः अगदीं मूर्ख आहांत.संस्कृतमध्यें म्हण आहे " विद्या विनयेन शोभते " म्हणजे विद्येला विनयानेच शोभा येते.सुशिक्षित माणूस जर नम्र नसेल तर त्या शिक्षणाला कांहीही अर्थ नाहीं.

सर्वसाधारण परिस्थितीत खरं काय ते कळूं शकतं.पण तुम्ही अहंकार गाजवूं लागलात की खरं काय आहे हे कळेनासं होतं.मग तुम्ही कांहीतरी विपरीत कल्पना करता , स्वतःला स्वर्गातील राजा समजूं लागता.तुम्हाला शुद्ध इच्छा असेल तर सत्य कळेल , नुसती कल्पनाच करत बसाल तर त्यांतच वाहून जाल , मग तुम्ही स्वतःला भलतेच कोणीतरी समजाल जे पूर्णपणें असत्य असेल.तुम्ही आत्मा

आहांत आणि या तुमच्या खऱ्या स्वरुपांतच स्वत:कडे बघा.आत्मा हा सर्व व्यापी आहे , तोच तुमच्यांतील अबोधिता आहे , पवित्रता आहे , तुमचं शुद्ध रुप आहे. त्याचा आदर करा.तुमच्यांतील पवित्रतेचा , जी तुमचंच मूळ स्वरुप आहे.त्याचा आदर करा.ती जर तुमच्यांत नसती तर मी तुम्हाला आत्मसाक्षात्कार देऊ शकले नसते , सगळीकडून मारा होऊनही ती टिकून आहे याची खात्री बाळगा तसं जर नसतं तर तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळालाच नसता.

सहजयोग जेवढां शिकू व आत्मसात करु तेवढी जास्त नम्रता आपल्यामधें यायला हवी.तेच आपले वैभव आहे.भूषण आहे , सर्टिफिकेट आहे.त्याच मार्गातून आपण दुसऱ्यांच्या अंतःकरणांत शिरणार आहोत , दुसऱ्या साधकांशी जवळीक करणार आहोत.नम्रपणा बाणवणं , कुठल्या प्रकारें आणि कोणत्या उपायांमधून आपण विनम्र होतो हे समजणं हीच निर्मल विद्या - आपण नम्र कसं व्हायचं - आहे.एकदा खऱ्या अर्थानें नम्र झालात की मग "ही माझी बाथरुम आहे.ही माझी फळं आहेत.हे माझं खाणं आहे , हे टेबल.हा ग्लास माझा आहे " असं तुम्ही कधीं म्हणणार नाहीं.

अबोधित झाल्यावर सर्व वस्तूंमधून आनंद मिळवण्याची शक्ति तुम्हाला मिळेल.माझ्याकरतां बोलायचं तर मला भुतांच्या संगतीत जेवायला लागतं ( भाग पडतं) किंवा भुतंच खाऊन टाकावी लागतात.त्यांच्याबरोबरच नव्हे तर त्यांनाच खाऊन टाकावें लागणें म्हणजे अतीच झालं. म्हणून भुतं आरुढ झालेल्या लोकांचाही तुम्ही तिटकारा करुं नका.ते उद्धट असतील तर त्यांनाच बंधन द्या , याच मार्गानें त्यांना ठीक करायचा प्रयत्न करा.जर तुम्ही त्यांच्याबरोबर वाद-विवाद करुन त्यांना समजावण्याचा प्रयत्न कराल तर ते अशक्य आहे.म्हणून 'निर्मल विद्ये 'चा उपयोग करा.असा नम्रपणा हीच तुमच्यांतील चैतन्यलहरींच रक्षण करील.जसं प्रत्येक शिरेला एक आवरण असतं तसंच नम्रपणा हे पातळ आवरण आहे.नम्र असाल तर लढाई जिंकाल , नसाल तर तुमचाच पराजय.एकदा नम्रपणा मिळवला की सर्वकांही जणूं विनोद होऊन जातं आणि उद्धट , मूर्ख , भूत बनलेले सर्व लोक या खेळांतली पात्र बनून जातात.

म्हणून आपल्यातील या पवित्रतेची पूजा करुं या.म्हणून उन्नत होऊन या पवित्रतारुपी हिऱ्याला नम्रतेच्या कोंदणांत बसवू या.तुम्ही इतरांवर रागवूं शकता , पण सहजयोग्यांवर , माझ्यावर नाहीं , आणि इतरावरही अगदी जरुर असेल तरच रागवा.पण तुम्ही आपापसांत भांडणं करुनच इतरांना सहजयोग सांगू लागलात तर त्याचा कांही उपयोग होणार नाहीं.

तुम्ही तुमच्या आत्म्यासमोर नम्र व्हा आणि तसंच माझ्यासमोर माझ्याशी नम्र होणं फार महत्वाचं आहे.तुम्ही समजून घ्या की ख्रिस्तांनीच तुम्हाला हा नियम सांगून ही काळजी घ्यायला सांगितलं आहे.माझ्यासमोर वागतांना मला तुमच्यामध्यें जरासादेखील उद्धटपणा चालणार नाहीं कारण मग मी कांही करु शकणार नाहीं.तुम्ही माझ्यांशी जोपर्यंत नम्र आहात तोपर्यंत मीच सर्व कांही करणार आहे.पण जेव्हां तुम्ही माझ्यांशी उद्धटपणा दाखवाल तेव्हां दुसरं कोणी तरी , पुष्कळ हजारोंनी दुसरेच कोणीतरी कामांत येतील आणि मग मात्र तुम्ही मला दोष देऊं नका.तुम्ही माझ्यापासूनच जन्माला आला आहात म्हणून तुम्हाला सर्व संरक्षण माझ्याकडून मिळत आहे.समजा तुम्हीच तुमच्या घराच्या छपराला भोक पाडलं तर मग त्यांतुन पाणी गळायला लागल्यावर काय करणार आहांत ? म्हणून म्हणते की तुम्ही तुमच्या छपराला आधीच भोकं पाडून ठेवली आहेत. ज्या छपराकडून तुम्हाला आडोसा मिळायचा त्याच्यातच तुम्ही भोकं केलीत तर पाऊस आत येणारच.तरीही तुम्ही म्हणाल की या छपरापासून संरक्षण नाहीं तर मी म्हणेन तुमचं डोकंच कमी आहे.तर हे असं आहे आणि हाच माझा आणखी एक इशारा आहे.

म्हणून आजच्या या दिवशी गौरीमाता श्री शिवाच्या पूजेलां बसली.तिनें शिवलिंग बनवले आणि त्याच्यासमोर बसून त्याला सिंदूर लावत म्हणाली "हे आपल्या मीलनांचे प्रतीक आहे म्हणून त्याच रक्षण करा.मी त्याची काळजी तुमच्यावर सोपवीत आहे." शिवाला ती म्हणाली." तुम्ही माझं रक्षण करता , मी तुम्हाला पूर्ण शरण आले आहे " असं म्हणून ही गौरीमाता , म्हणजेच तुमची कुंडलिनी परमात्म्याला शरण गेली.आतां तुम्हीच या कनेक्शनला सांभाळा.मी आतां सर्व विसरले आहे , सर्व तुमच्या चरणी ठेवलं आहे.मला उन्नत करा , माझा उद्धार करा.मी माझं पूर्वआयुष्य टाकून दिलं आहे , पूर्वीच्या 'मी ' ला पूर्ण विसरले आहे.आता माझ्या उन्नतीशिवाय मला दुसरी कसलीही इच्छा नाही , मला तुमच्यात सामावून घ्या.इतर कशाचीही मला फिकीर नाहीं.आता इतर सर्व इच्छा संपल्या आहेत.आतां मी माझ्यांतील आत्म्याला पूर्णपणें शरण आले आहे. आता मला आणखी पुढं जायचं आहे.उंच जायचं आहे.भौतिक जीवनापासून दूर जायचं आहे.मला आतां वेगळं अस्तित्वच नको , मला आत्माच बनूं द्या , पूर्ण आत्मा.

आत्तापर्यंत जे कांही झालं ते विसरा.ती उन्नति.ते उत्थान हें अगदीं सहज , गतीनें होणार आहे.अगदी या क्षणी , आणि पुढें कधीही तुम्ही ते मिळवूं शकाल जर तुम्ही आत्म्याच्या विरोधांतल्या सर्व गोष्टींचा त्याग कराल.आत्म्याच्या विरुद्ध जे जे आहे त्या सर्वांचा त्याग केला पाहिजे , हीच शुद्ध इच्छा आहे.हीच कुंडलिनी आहे.हीच पवित्रता आहे.आत्म्याशीं पूर्णपणें एकरुप होणं.बाकी इतर सर्व वस्तुंना अर्थ नाही.त्यांना किंमत नाहीं.तुमच्याजवळ कितीही संपत्ति असूं दे., कुणाबरोबरही तुमचा विवाह झालेला असूं दे., कुठंही कसलंही काम करत असाल., कुठल्याही परिस्थितीत असाल., कुठल्याही देशात राहणारे असाल - तुम्ही फक्त आत्मा आहांत.आणि जर आत्मा झालांत तर तुम्ही मोठ्या उच्च स्थितीला याल आणि परमेश्वराच्या साम्राज्यात याल.तिथें मग सर्व वाईट गोष्टी नाहींशा होतील. जसं कमळ उमलल्यावर चिखल पूर्णपणें नाहींसा होतो. त्याचप्रमाणे माझी ही सर्व मुलें शिवाच्या चरणीं नतमस्तक होतील.

मी आत्तांच त्यांना (भारतीय सहजयोग्यांना) सांगत होते की तुम्ही या पाश्चात्य लोकांचं , जे अहंकाराने भारलेले असतात , जे कठोर शब्द वापरतात,

अनुकरण करुं नका.तसं केलं तरच आपण आधुनिक बनूं असं समजूं नका. ते नेहमी कठोर भाषा बोलतात , "मला काय जरुर पडली आहे" वगैरे शब्द वापरतात जी आपण बोलत नाहीं आणि जी आपल्याला माहीत नाही.कुणाशीही अशी भाषा वापरणं असंभावित आहे."मी तुझा तिरस्कार करतो" असे शब्दच कसे तुम्हाला सुचतात ? पण मला सगळीकडे हेच ऐकायला मिळतं - "माझं काय चुकलं आहे ? तुम्ही मला सांगणारे कोण ?" वगैरे.आम्ही अशी भाषा वापरत नाही.अशी भाषा वापरणं सभ्यपणाचं लक्षण नाही.सुसंस्कृत कुटुंबातील कोणीही व्यक्ति असं बोलणार नाहीं कारण अशानं नावांला कमीपणा येईल.इथें बस वा टॅक्सीमध्यें लोक अशी भाषा वापरतात की मलाच आश्चर्य वाटतं , त्यांची अशी भाषा मला तर समजतच नाहीं.म्हणून मी त्यांना सांगते की बोलण्यातून , भाषेतून नेहमी प्रेम व्यक्त झालं पाहिजे आणि आपल्या रीतिरिवाजानुसार भाषा असावी.

प्रश्न : सत्य हें इंद्रियांमधून जाणण्याच्या पलिकडे आहे काय ?

श्री माताजी : अगदीं बरोबर.कारण इंद्रियाकडून होणाऱ्या ज्ञानांतून सत्य जर आपल्याला समजलं तर मग आणखी कशाचा शोध घेण्याची जरुर नाही. पण इंद्रियांकडून जें ज्ञान आपण मिळवतो त्यात भ्रम असतो , ते जड असते , सूक्ष्माबद्दल त्यांतून कांही कळत नाहीं.जडाच्या पाठीमागे काय आहे हें आपल्याला कळत नाहीं.उदा.अणु कसा बनवायचा हे आपल्याला माहीत नाही.अॅमिबापासुन माणुस कसा बनला हे आपण सांगू शकत नाहीं.एकाद्या माकडापासुन आपण आपल्या इंद्रियांकडून होणाऱ्या ज्ञानाचा उपयोग करुन माणूस बनवू शकूं का ? जडाच्या मागें जे सूक्ष्मातून कार्य चालतं ते आपण करुं शकत नाहीं.म्हणून सत्य हे इंद्रियांकडून समजणार नाही.पण एकदा आपल्याला सत्य सापडलं की त्याची जाणीव आपल्याला इंद्रियामधूनच होते.हा दुसरा मुद्दा.

भारतात मुलांना पाश्चात्य लोकांप्रमाणे ओरडत नाहीत. आपल्याला त्याच्यांवर रागवायचं असलं तर आपण त्यांचा अभिमान दुखावणार नाहीं अशी भाषा वापरतो.दामले साहेबांनी आज लेंगा - कुडता घातला आहे म्हणून "आपण शिवाजी महाराजांसारखे दिसता , यावें शिवाजी महाराज." आपण अशी सौम्य भाषा वापरायला हवी की त्यांना भीति वाटणार नाहीं.त्यांची चूक सुधारायची असेल तर आपण असंच करत होतो.दुसऱ्या तऱ्हेने ती चूक सुधारली जाणार नाही.अशा दुसऱ्या तऱ्हेच्या वागण्यांतून तुम्ही मुलांवर वचक ठेऊ शकणार नाहीं. तुम्ही सारखंच मुलांवर ओरडत राहिलात.त्यांचा व इतरांचा अपमान करत रहाल तर काय उपयोग ? अपमानास्पद वागवणूक , मानसिकतेला दुखावणारी वागणूक ही आपल्या रीतिरिवाज आणि संस्कारांना धरुन नाही , आणि जे असे करतात ते बाहेर फेकले जातील.सहजयोगांत तुम्ही असं वागू शकत नाही , वागू नये हे मी मुद्दाम सांगत आहे.

सहजयोगी म्हणून आपली वागणूक सभ्यतेची , आपल्या पद्धति व रीतिरिवाजानुसार हवी.सहजयोगाची पद्धतच अशी आहे की लोकांशी बोलताना अतिशय सभ्यतापूर्वक , प्रेमळपणाची , गोड व आकर्षक भाषा वापरावी.तसंच माझं अनुकरण करतांना मी क्षमा पण करते आणि प्रेम पण करते.मी प्रेमळ पण आहे हे बघा , मी रागीट बनते ते नको.कारण माझ्या रागीटपणामधेंही एक प्रकारचा गोडवा आहे.प्रेम आहे जे तुमच्यांत नाही.तसच माझ्याप्रमाणें प्रेमाचा व आपुलकीचा अंत:प्रवाह.पण तुमच्याजवळ नाहीं.म्हणून आपण नीट बोललं पाहिजे.म्हणून पहिली गोष्ट मला सांगायची आहे ती ही कीं तुमच्या प्रेम-व्यवहारांत कटु शब्दांना स्थान नाहीं.ज्यांच्या डोक्यावर भूत स्वार आहे अशा लोकांना मी ओरडते पण त्यामुळें भुतं पळून जातात.तुम्ही तसं ओरडू लागलात तर भुतंच तुमच्या अंगात शिरतील.भुत सहसा पळून जात नाहींत , उलट त्यांना सराव होतो , म्हणून असं करुं नका.तुम्हाला जेव्हां माझी शक्ति मिळेल तेव्हाच करा.पण ती शक्ति सध्या तुमच्याकडे नाहीये.म्हणून भूत सवार झालेल्या माणसावर तुम्ही ओरडलात तर ते तुमच्याच मानगुटी बसेल.म्हणून माझ्याप्रमाणें वागण्याचा , माझं अनुकरण करण्याचा प्रयत्न करुं नका.माझी गोष्ट वेगळी आहे.मी समजून-उमजून भाषा वापरते जे तुम्हाला जमणार नाहीं.म्हणून प्रेमाची , आपुलकीची भाषा वापरा.

मी आतां दोन गोष्टी मागणार आहे.आईला मागावं लागतं हे जरा विचित्रच आहे.तुमच्याकडून पाहिजे असलेल्या भेट - वस्तूपैकीं पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही तुमच्या व्यक्तिमत्वांतून शांती पसरवा. याचा अर्थ शांत राहणारे लोक भित्रे असतात असा नाहीं किंवा मूर्खपणा सहन करणारे लोक विचित्र असतात असाही नाहीं पण शांत स्वभावाचे लोक शांतपणे विरोध दर्शवतात , ते कशाला घाबरत नाहीत , ते कुणापुढेहीं नमणार नाहींत किंवा नरमाईनें न पटणाऱ्या गोष्टींना मान्यता देणार नाहींत.पण मनाची ही धारणा संपादन करुन तिचा वापर करायला हवा , हे फार महत्वाचं आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे या शांततेतून दुसऱ्यांबद्दलचे तुमचे प्रेमच दृग्गोचर झालं पाहिजे.आश्रमांत राहणारे लोक प्रेमळ , जपणारे , आपुलकीने वागणारे व प्रसन्न स्वभावाचे मला दिसलेले आवडतील. आश्रमाचे मुख्य अधिकारी अगदीं वरच्या दर्जांचे असाय ला हवेत.सर्वसाधारण दर्जाच्या माणसांना हे काम देऊं नये.इथे येणारे लोक आईच्या घरीं म्हणून येतात , त्यांना प्रेमाची व आपुलकीची वागणूक मिळायला हवी.तुम्ही कांहीही करा , उपाशी रहावं लागलं तरी दुसऱ्यांशी तुमची वागणूक प्रेमाची व आपुलकीची असली पाहिजे. म्हणजे दुसरे लोक तुम्हांला उद्धट म्हणणार नाहींत.

दुसऱ्या कुणाबरोबर या युक्त्या वापरु नका.दुसऱ्यावर ओरडण्याची , रागावण्याची तुम्हांला मुळीच जरुर नाहीं.तसं कराल तर ती भुतं पुन्हा तुमच्या डोक्यावर बसतील , तीच तुम्हाला प्रवृत्त करतात.त्याच्यामुळे तुम्ही असेच जास्त गुंतले जाता आणि तसंच वागतां - वागतां तुमचाच नाश होतो.म्हणून उत्तम मार्ग म्हणजे मध्यांत रहावं आणि माझ्याकडून मिळालेली शक्ति वापरुन प्रेमानें व आपुलकीनें सर्वांशी वागावं.ही प्रेमाची शक्ति तुम्ही वाढवली पाहिजे , मग तुम्हाला कसलीही काळजी करायच कारण नाहीं , रागावण्याचं - ओरडण्याची जरुर नाहीं. तुम्ही कांही करणारच नाहीं कारण ही शक्तिच कार्यान्वित होईल , आणि ति ग

प्रभावानें सारा परिसर सुंदर होईल की तिथें कुणाला कसलाच त्रास रहाणार नाहीं. पण तुम्ही मोठ्यानें ओरडून बोलाल तर लोक पळून जातील , विशेषत: या अहंकाराने भारलेल्या समाजात लोक तुमच्यापासून दुरावतील आणि पळून जातील.

म्हणून मी तुम्हाला म्हणते , मला सांगायलाच हवं की तुम्ही कोणीही मोठी , खुप मोठी व्यक्ति असा , आज पहिली गोष्ट तुम्ही मला द्यायची आहे ती ही तुमच्या बोलण्यामध्यें , तुमच्या वागण्यामधें , तुमच्या हृदयांत मला तुम्ही प्रेमानें प्रस्थापित करा.दुसरी गोष्ट मला सांगावीशी वाटते की तुम्ही नेहमी शांत असा.स्वत:शीच शांतपणे रहा.म्हणजे स्वत:शीच भांडू नका , या पाश्चात्य लोकांचा हाचं दोष आहे की ते स्वत:बरोबरच झगडत असतात. " हें मला काय झालं आहे ? मी असाच आहे. वाईट आहे. मला कांहीच जमणार नाही " वगैरे मनांत ठेऊन स्वत:शीच भांडत राहिलात तर तुमची प्रगति होणार नाहीं.उलट तुम्ही म्हणत रहा " मला काय कमी आहे ? मी ठीक आहे , मला साक्षात्कार मिळाला आहे मग माझी चूक होणारच कशी ? माझ्यांत कांही दोष नाहीं.माझं काहीच चुकलं नाहीं " हा आत्मविश्वास बाळगा आणि सर्व सुरळीत होईल.तुम्ही फक्त शांत रहा.

तुम्ही बघितलं आहे की माझ्या शांत अवस्थेमुळें कितीतरी प्रश्न सुटले आहेत. हीच शांतता तुम्ही आपल्यामध्यें बाणवली पाहिजे. ही शांतता कुठल्याही परिस्थितीत सांभाळून ठेवली पाहिजे , आणि तिचा बाहेर देखावा करायची जरुर नाहीं.माझ्यांतील ही शांतताच कधीं कधीं भयंकर होते.तसं तुमच्यांत होण्याची शक्यता नाहीं.तसं कधी करुं नका , तसा कधी प्रयत्नही करुं नका , तुमचं कपाळ स्वस्थ राहील इकडे लक्ष द्या.माझ्याकडे येणाऱ्या पुष्कळ लोकांचे चेहरे विद्रुप , त्रासिक असतात. त्यांच्या कपाळावर भुत बसलेली मला दिसतात. मग मी त्यांच्यावर ओरडते आणि त्यांच कपाळ पुन्हा शांत होतं. " हे मी करत नाहीं. श्री माताजीच करतात." शांत व्हा. शांत झालात कीं तुमचं हृदय पण उघडेल - तुम्ही हृदय कां उघडू शकत नाही ? कारण तुमचा तुमच्या स्वत:वरच विश्वास नाहीं.तुमची आज्ञा उघडेल , सहस्त्रार उघडेल आणि मग तुमचं हृदय उघडणार आहे.एकदा सहस्त्रार उघडलं की हृदय आपोआप उघडतं आणि मग तुम्ही शांत जीवन मिळवूं शकता.

राजकारणामधें आपण जेव्हां साम्यवादी , भांडवलशाही किंवा लोकशाही यांच्याबद्दल जेव्हां बोलतो तेव्हां ते एक सिद्धान्त असतात पण सत्य नसतात. मी स्वत: तर एक प्रकारे खुप भांडवलवादी आहे कारण मला माझी शक्ति , माझे गुण , माझं कार्य माहीत आहे आणि ते सर्व माझंच आहे दुसऱ्या तऱ्हेने मी मोठी कम्युनिस्ट आहे कारण माझ्याजवळ इतकं सारं असुनही दुसऱ्याला ते दिल्याशिवाय मला त्यांतून आनंद मिळत नाहीं.अगदी क्षणोक्षणीसुद्धां.म्हणून हे सगळे सिद्धान्त एकत्र येणार असतील तर फक्त आत्म्याच्या चरणापाशीं , मध्यमार्गी असणारा फक्त आत्माच आहे आणि त्याच्यापासुन दूर राहून तुम्ही बघाल तर सर्व वस्तु वेगवेगळ्या आणि अलग-अलग दिसतील.पण तुम्ही प्रयत्न करुन त्या आत्म्याच्या सान्निध्यात (प्रकाशात) आलात की सर्व कांही एकरुप होऊन जातं , सुसंगत होऊन जातं आणि मग कसलाच भेद उरत नाहीं.मोहम्मद साहेब , दत्तात्रेय , राजा जनक , शिर्डीचे साईबाबा सर्व एकच होतात.एकदां तुम्ही आत्म्याच्या प्रकाशांत आल्यावर त्यांच्या तत्वज्ञानातही फरक उरत नाही , पण सामान्य मानवाला या स्थितीपर्यंत येणं ही खुप मोठी गोष्ट आहे , कारण ते सत्य सोडून सिद्धांताला चिकटून असतात. सहजयोगामधील प्रत्येकाची हीच एक अडचण आहे.

परमेश्वरी कार्य सोडून इतर कामामध्यें गुंतलेल्या लोकांबरोबर मी असते तेव्हां फार एकटी असते कारण तिथें मी देवाबद्दल , देवाच्या मोठेपणाबद्दल , मानवाबद्दल त्याला किती प्रेम आहे वगैरेबद्दल मी त्याच्यांशी बोलू शकत नाहीं. पण एखाद्या व्यवसायाच्या मुख्य कारभाराचे सर्व नियंत्रण करणारे लोक परमेश्वरी कार्यातही पुढे आल्याचं पाहिल्यावर फार समाधान वाटतं आणि तितकीच आशा वाटते.एक दिवस असाही उगवेल जेव्हां ते ही नवीन जबाबदारी स्वीकारतील आणि मग त्यांना समजेल की ते परमेश्वराच्या राज्यांत आहेत.तोच सर्व कांही करत आहे , त्यानेंच हे सर्व निर्माण केलं आहे आणि त्यातुनच त्याचा आनंद भरुन वहात आहे.हे सर्व जाणून घ्यायला , आत्तांच तुम्ही म्हणालात ना सर , तसे तुम्ही नशीबवान साधक असायला पाहिजे. मानवप्राण्यांना शेवटी साधकच बनायचं आहे.कारण बौद्धिक स्तरावरुन होत असलेल्या सर्व संकल्पना आणि सिद्धान्त यामध्यें एक चांगली गोष्ट आहे ती म्हणजे ते सर्व कार्य उथळ आहे आणि त्याला शेवटही आहे.मानवप्राण्याकडून होत असलेली सर्व निर्मिती एका विशिष्ट दिशेनेंच पुढं सरकत असते आणि मग कुठें तरी त्याचा शेवट होत असतो.म्हणून आपले सर्व सिद्धान्त आणि कल्पना कालांतराने निकालात निघतात.

खरं म्हणजे ही सद्वस्तु जेंव्हा करुणेचा आकार घेते , तेव्हां तुम्हाला त्याच्याबद्दल कांहीच करायचं नसतं.उदा.तुमची कुंडलिनी जेव्हां मी वर आणते तेव्हां ते मी करत आहे हे देखील मला माहीत नसतं.कारण तुम्ही आधीच सर्वजण तयार आहांत , तम्ही जणुं मेणबत्ती आहांत आणि मी एक पेटलेली मेणबत्ती आहे आणि या मेणबत्तीकडून दुसरी मेणबत्ती पेटवली गेली तर ते मी केलं अस मला वाटत नाहीं. कारण जर मी पेटती मेणबत्ती आहे आणि तुम्ही तयार असल्यावर माझ्याकडून तुमची मेणबत्ती पेटवली गेली तर हे सर्व आपोआपच होणारं असतं.सत्य हे असंच असतं.त्याच्याबद्दल कांही कमीपणा वाटण्याचा प्रश्नच येत नाहीं कारण ती सत्यस्थिती आहे.खरं म्हणजे मी कांहीच करत नाहीं.तुम्ही सर्व जण याच कामाकरतां आलेले आहात.परमेश्वरानेंच तुम्हाला त्याकरतां सिद्ध करुन ठेवलं आहे , तुम्ही फक्त स्वत: ते कबूल करायचं आणि ते जर कार्यान्वित झालं तर तुम्ही साक्षात्कारी बनता.

पुष्कळ लोकांना वाटतं की मी पुष्कळ लोकांचे आजार बरे केले , म्हणून मी एक चांगलं काम केल आहे , कदाचित् उपकारही केले आहेत. पण स्पष्ट

आल्यावर त्यांच्या तत्वज्ञानातही फरक उरत नाही , पण सामान्य मानवाला या स्थितीपर्यंत येणं ही खूप मोठी गोष्ट आहे , कारण ते सत्य सोडून सिद्धांताला चिकटून असतात. सहजयोगामधील प्रत्येकाची हीच एक अडचण आहे.

परमेश्वरी कार्य सोडून इतर कामामध्यें गुंतलेल्या लोकांबरोबर मी असते तेव्हां फार एकटी असते कारण तिथें मी देवाबद्दल, देवाच्या मोठेपणाबद्दल , मानवाबद्दल त्याला किती प्रेम आहे वगैरेबद्दल मी त्याच्यांशी बोलू शकत नाही. पण एखाद्या व्यवसायाच्या मुख्य कारभाराचे सर्व नियंत्रण करणारे लोक परमेश्वरी कार्यांतही पुढे आल्याचं पाहिल्यावर फार समाधान वाटतं आणि तितकीच आशा वाटते. एक दिवस असाही उगवेल जेव्हां ते ही नवीन जबाबदारी स्वीकारतील आणि मग त्यांना समजेल की ते परमेश्वराच्या राज्यांत आहेत. तोच सर्व कांही करत आहे , त्यानेंच हे सर्व निर्माण केलं आहे आणि त्यातुनच त्याचा आनंद भरुन वहात आहे. हे सर्व जाणून घ्यायला , आत्तांच तुम्ही म्हणालत ना सर , तसे तुम्ही नशीबवान साधक असायला पाहिजे. मानवप्राण्यांना शेवटी साधकच बनायचं आहे, कारण बौद्धिक स्तरावरुन होत असलेल्या सर्व संकल्पना आणि सिद्धान्त यामध्यें एक चांगली गोष्ट आहे ती म्हणजे ते सर्व कार्य उघड आहे आणि त्याला शेवटही आहे. मानवप्राण्याकडून होत असलेली सर्व निर्मिती एका विशिष्ट दिशेनेंच पुढं सरकत असते आणि मग कुठें तरी त्याचा शेवट होत असतो. म्हणून आपले सर्व सिद्धान्त आणि कल्पना कालांतराने निकालात निघतात.

खरं म्हणजे ही सद्वस्तू जेंव्हा करुणेचा आकार घेते , तेव्हां तुम्हाला त्याच्याबद्दल कांहीच करायचं नसतं. उदा. तुमची कुंडलिनी जेव्हां मी वर आणते तेव्हां ते मी करत आहे हे देखील मला माहीत नसतं. कारण तुम्ही आधीच सर्वजण तयार आहांत , तम्ही जणुं मेणवत्ती आहांत आणि मी एक पेटलेली मेणबत्ती आहे आणि या मेणवत्तीकडून दुसरी मेणबत्ती पेटवली गेली तर ते मी केलं असं मला वाटत नाही. कारण जर मी पेटती मेणबत्ती आहे आणि तुम्ही तयार असल्यावर माझ्याकडून तुमची मेणबत्ती पेटवली गेली तर हे सर्व आपोआपच होणारं असतं. सत्य हे असंच असतं. त्याच्याबद्दल कांही कमीपणा वाटण्याचा प्रश्नच येत नाहीं कारण ती सत्यस्थिती आहे. खरं म्हणजे मी कांहींच करत नाही. तुम्ही सर्व जण याच कामाकरतां आलेले आहात. परमेश्वरानेंच तुम्हाला त्याकरतां सिद्ध करुन ठेवलं आहे , तुम्ही फक्त स्वत: ते कबूल करायचं आणि ते जर कार्यान्वित झालं तर तुम्ही साक्षात्कारी बनता.

पुष्कळ लोकांना वाटतं की मी पुष्कळ लोकांचे आजार बरे केले , म्हणून मी एक चांगलं काम केलं आहे , कदाचित् उपकारही केले आहेत. पण स्पष्ट बोलायचं म्हणजे हा सुद्धां एक विचारच आहे. कारण मी त्या माणसाला काय करते ? त्याला बरी करते म्हणजे मी कांहीच करत नाहीं. कारण असं आहे - मी स्वत:ला जेव्हां तुमच्यात बघते तेव्हां तुम्ही माझेच , माझा एक अंश बनता. हे मी बुद्धीकडून बघत नाहीं तर ते माझ्या स्वत:च्या मध्य नाडी संस्थेमधे मला जाणवतं , मला स्पष्ट जाणवतं की तुम्ही माझाच एक भाग आहात. जेव्हां डॉक्टर साहेबांची बहीण माझ्याजवळ बसली होती तेव्हां मलाच तिच्या वेदना जाणवल्या , कारण तिचं शरीर माझाच एक भाग झाला आणि मी तिचा भाग झाले. मग मी तिला विचारलं "तुला या जागीं दुखत कां" आणि ती म्हणाली "होय , तुम्हाला हे कसं कळलं?" मी म्हणाले "मी तुला या वेळी कसं ते सांगू शकत नाही पण तुलाही ते याच प्रकारे कळेल." म्हणून दुसरा कोणी नसतोच तिथें दया कोठून येणार?

म्हणून अहंकाराची कल्पना म्हणजे ! आजकालच्या जगांत सज्जन राहणं हीच एक समस्या झाली आहे. तुम्ही चांगले वागत असला तर प्रत्येकजण तुमच्यावर हल्ला करेल. किंवा तुम्ही चांगुलपणाबद्दल नुसतं बोललात तर तुम्हाला सुळावर तरी जाण्याची पाळी येईल किंवा तुम्हांला वीष पाजलं जाईल किंवा असंच कांहीतरी लोक करतील. हे सर्व अहंकारामुळे होते. पण सहजयोगामधे अहंकार ही एक कल्पना नाहीं तर सत्य आहे कारण मनुष्य जेव्हां अहंकारी होतो तेव्हां त्याची आज्ञा पकडते आणि तो "सहजयोगाच्या केंद्रावर येऊन सांगतो "बघा , माझ्या आज्ञेवर पकड आली आहे." तो म्हणतो "मला अहंकाराची बाधा झाली आहे" हे म्हणायला त्याला जरासुद्धा संकोच होत नाहीं. कारण हे एकादी साडी मळली आहे आतां ती धुवायला हवी म्हणण्यासारखं आहे. तो कोण आहे हे कुणी पाहणार नाहीं. प्रत्येक वेळी कल्पना (सिद्धांत) मांडून तुम्ही कुणालाही बरोबर ओळखत नाहीं. एकदा सत्यामधें - तत्यामधें - आलात की या सर्व चुकीच्या समजुती गळून जातात , आणि म्हणूनच लोकांना मी फार लवकर बदलत असल्याचं पाहते. मला वाटतं लोकाचं असं परिवर्तन होऊं शकतं याच्यावर तुमचा विश्वास बसणार नाही.

एक साधी गोष्ट सांगते , तुम्ही पार्टीला गेलांत आणि ड्रिंक घेतलं नाही तर प्रत्येकजण म्हणेल "तुम्ही पीत कां नाहीं? तुम्ही ड्रिंक घ्यायलाच हवं" किंवा ते तुमच्यावर सक्तीपण करतील. तुम्ही म्हणाल "अरे बाबा , मी पीत नाहीं" मग तुम्हांला कांहीतरी खोटं सांगाव लागेल. मग त्याकरतां तुम्हाला सांगावं लागेल , दुसऱ्याला कळूं न देता , मोठ्या गोष्टी मिळवण्याकरतां छोट्या गोष्टी सोडाव्या लागतात - खोटं बोलणंसुद्धा. तुम्ही म्हणाल "डॉक्टरनें पिऊ नको असं सांगितलं आहे" "डॉक्टरचं सोडून द्या हो" मग तुम्ही म्हणालत "मला ॲलर्जीचा त्रास आहे , पिण्याचा मला त्रास होतो" असं कांहीतरी सांगून तुम्ही सुटका करुन घ्याल. पण तुम्हीच जर त्यांना चुकून विचारलं "तुम्ही कां पिता? " तर तुम्ही लगेच मेट्रन झालात , शिष्टपणा करायला लागलात , नसती उठाठेव करता , जादागिरी करता. वगैरे.

पाश्चिमात्य देशांत आमच्याकडे पुष्कळ साधक आहेत. पण पाश्चात्य संस्कृति एकाद्या झाडासारखी आहे. त्याची वाढ मुळापासुन होत नाहीं. आम्हा भारतीय लोकांना मुळाचं ज्ञान आहे म्हणून काळजी करत नाहीं. त्या लोकांना

मुलाबद्दल कांहीच माहिती नाही.हे कां होतं तर अहंकाराने ते इतके भारले आहेत की त्यांना आपल्याला मुलं आहेत याचाच विसर पडला आहे.किंबहुना आपल्याला मुलं आहेत ही गोष्टच ते अशक्य समजतात.अशा परिस्थितीत काय होतं तर हा अहंकार अहंकारावरच उलटतो. म्हणून या अहंकाराच्या प्रभावाखाली सारा पाश्चात्य समाज विनाशाकडे चालला आहे. पण त्यांना हे सांगून पटणंच अशक्य आहे.

उदा. सहजयोगांत आम्ही नीतिनियमानुसार जीवनाला मानतो जिथें पुरुष स्त्रीबरोबर विवाह करतो आणि नीतिनियमानुसार संसार करतो. पण आम्ही साक्षात्कार मिळेपर्यंत त्याबद्दल बोलत नाही. साक्षात्कारानंतर आपण आपोआपच त्याचं पालन करतो. पण तुम्ही एकादे वेळेस चुकून बोललात की तुम्ही नीतीनुसार राहिलं पाहिजे तर ते तुमच्या मागेंच लागतील. ते म्हणतील "आम्ही स्वातंत्र्य मिळवलं आहे आणि ही व्हिक्टोरिया काळांतली बाई आम्हाला जुन्या-पुराण्या गोष्टी सांगत आहे तर त्याचा आम्ही कशाला स्वीकार करायचा ?" म्हणून त्यांची अहंकाराची ही कल्पना इतकी विचित्र आहे कीं त्यांची आज्ञाचक्रावर पकड घेत आहे हे त्यांना समजतच नाही.

पुष्कळ लोकांची अशी आणखी एक समजूत आहे. संयुक्त राष्ट्रामध्यें आणि प्रत्येक ठिकाणीं मी पाहिलं आहे कीं त्याच्यां सुप्त चेतनेमधून मिळालेल्या कांही कल्पनांना धरुन त्यानुसार त्याचं काम चालत. पण प्रत्यक्ष मध्य नाडीसंस्थेवर त्यांना त्याची जाणीव येत नाही जसं तुम्हा सर्वांना ते समजतं. ते म्हणतील "ठीक आहे , तुम्ही भाऊ व बहिणी आहांत , आपण राष्ट्र - राष्ट्रांना मदत केली पाहिजे , आपण कांही केलं पाहिजे" वगैरे. पण प्रत्यक्ष काम करायची वेळ आली की ते तसं करत नाहींत. ते बरोबर उलटीच गोष्ट करतात. आतां याचं कारण तुम्ही सांगू शकणार नाहीं, तुम्ही त्याच्याबद्दल पुस्तकं लिहाल , त्याच्यावर निबंध लिहाल. खूप लेख लिहाल. पण त्यांना प्रत्यक्ष काम करणं त्यांच्या स्वभावांतच नाही कारण ते आत्मा झालेले नसतात.

या साक्षात्कारी लोकांच्या मेळाव्यामध्यें , जी फार महान संधि आहे , सगळे संत मंडळी जमली आहेत , तुम्ही जाणतां की अहंकार ही आज्ञा चक्रावरची बाधा आहे आणि ते सत्य आहे. कुणी म्हणेल "मला अहंकार मुळींच नाही" तर ठीक आहे , तुम्हाला नाहीं. कारण तसं म्हणणं चांगलं नाहीं. पण तो जर साक्षात्कारी असेल तर म्हणेल "माताजी , माझ्या आज्ञेवर पकड आहे. कृपा करुन ती दूर करा." कारण ते सत्य आहे हे त्याला समजतं. आणि हे सत्य असल्याचं समजलं म्हणजे तुम्ही प्रकाशित झाला आहांत ही खात्री ठेवा. अंधारात तुम्हाला कांहीच दिसत नाही पण एकदा प्रकाश पडला की तुम्हाला सारं "दिसायला" लागतं , तुम्ही ओळखतां की आपण सारे एकाच छपराखालीं आहोत. या हॉलमधला कसलाही 'प्रश्न' हा 'आपल्या सर्वांचा' प्रश्न होतो. अशा तऱ्हेंने आंतुन तुम्ही 'सामुहिक चैतन्या' मधें उतरता.

तुम्ही जेव्हा आत्मा बनता तेव्हा आत्मा हे सामुहिक चैतन्य असल्यामुळे तो सत्य बनतो , म्हणजेच हा सिद्धान्त तुमच्यापुरतं सत्य बनतो. तुमच्या चेतनेमध्यें तुम्ही इतरांना तुमच्यामधून समजूं लागता. कॅनडामधून आलेले असो वा ऑस्ट्रेलियामधून , हे लोक एकमेकांना भेटतात तेव्हा त्यांना परस्परांबद्दल प्रेम वाटूं लागतं. एकमेकांपासून ते आनंद अनुभवतात. हे पाश्चात्य लोक भारतातल्या एकाद्या लहानशा खेड्यांत जातात तेव्हा खेड्यातले लोक त्यांना इतक्या प्रेमानें मिठी मारतात. जणुं ते दोघे एकमेकांत मिसळून जातात. राजकारणांत एकत्र आलेले लोक एकमेकांशी कसे भांडतात. एकमेकांबद्दल खोट्या गोष्टी कशा पसरवतात हे आपल्याला माहित आहे. पण या लोकांची भेट म्हणजे एकाद्या कुटुंबातले लोक एकत्र आल्यासारखी असते. ही सर्व आनंदाची देवाण-घेवाण पाहणं त्याची मजा लुटणं इतकं सुंदर असतं की ते नुसतं पाहणं हे सुद्धां कृष्ण-लीलावरील एकादं नाटक पाहण्यासारखं आहे.

मी हे या देशांत सर्व ठिकाणी होत असतांना पाहिलं आहे. जेव्हा जेव्हां वेगवेगळ्या देशांतील लोक - मुसलमान , हिंदु किंवा इतर कुणीही - एकत्र येतात तेव्हां त्याच्यात एकमेकांबद्दल प्रेमाची , ओळखीची व आपुलकीची भावना इतकी तीव्र असते की इतरांना त्याचं आश्चर्य वाटतं - की हे लोक एकमेकांवर प्रेम करत , मदत करत , आपापसांत कुठल्याही प्रकारे हेवे-दावे , भांडण न करतां एकत्र कसे राहूं शकतात ? कारण त्यांच्यात चढाओढ आहे ती कोण जास्त प्रेम करतो , कोण जास्त दानी आहे , कोण जास्त समजूतदार आहे या भावनेची. सहजयोग्यांच्या समाजांत कसलेही प्रश्न नसतात. आमचा हा समाज , एवढ्या मोठ्या विश्वाच्या तुलनेंत लहान असला तरी तुम्हांला , सर , आश्चर्य वाटेल कीं इतर लोकांसारखे आमच्या समाजांत मुळींच समस्या - प्रश्न नाहींत. आम्ही असाधारण सामान्य आहोत. आमच्यामध्यें कसलीही कटुता नाहीं म्हणून कसले प्रश्न नाहींत. आमचे लोक इतके प्रामाणिक , धीट , धैर्यवान , प्रेमळ , दानत असणारे झाले आहेत की मलाच कधीं कधीं प्रेमाचा एवढा आविष्कार पाहून भरुन येतं , या प्रेम-सागराच्या लाटा मग दूरदूर पसरुं लागतात.

आज होळीचा - होलिका दहन - दिवस आहे. याचं सांकेतिक महत्व असं सांगतात की या दिवशी सर्व सैतानी प्रवृत्तींचा प्रल्हादाच्या अबोधितेपासुन नाश झाला. आणि हेंच तुम्ही लक्षांत ठेवलं पाहिजे की सहजयोगी जेव्हां अबोधित होतो. सर्व तऱ्हेंने आपल्यातील चैतन्यलहरींच्या जाणीवेवर सर्व सोपवतो - या लहरी परमेश्वरी शक्तीचाच आविष्कार असल्यामुळें - तेव्हां त्याचं पूर्ण संरक्षण होत असतं आणि होळीकासारखा सैतानही त्याला मारुं शकत नाहीं. आणि आजच्या या दिवशीं आपण खऱ्या विश्वासानें समजून घेतलं पाहिजे की सहजयोगी असल्यामुळें आपल्याला कशापासूनही भय नाहीं. आपण निर्भय आहोत , त्याचबरोबर प्रेमळ आहोत , नम्र आहोत आणि जास्तीत जास्त लोकांना वाचवणार आहोत. संबंध मानवजातीला जाणीवेच्या एका उच्च स्तरावर आणण्याचं कार्य आपण आपल्या उन्नतीमधून करणार आहोत

आणि त्याचसाठीं खूप मेहनत करणार आहोत. संत तुकाराम म्हणतातच "येऱ्या गबाळ्याचे काम नोहे." हें खूप वीर व्यक्तींचे आहे. खूप धैर्यशाली लोकच हे करु शकतील.

तुम्हाला कुठेहीं अगदी एकच सहजयोगी दिसला तरी त्याच्या जीवनपद्धतीचं तुम्हाला आश्चर्य वाटेल. आणि त्याच्यांतील प्रसन्नतेमुळें सर्वांवर त्याचा लगेच प्रभाव पडतो. अर्थात त्यांत त्याला त्रास देणारेही कांही असतात. पण देवाचं सहजयोग्याकडे पूर्ण लक्ष असतं हे सत्य लक्षात घ्या. आणि तो तुमचा कसा सांभाळ करतो हे तुम्ही सहजयोगी जाणताच , त्याच्याकडून अगदीं सहज कसं रक्षण केलं जातं हेंहि तुम्हाला माहीत आहे. परमेश्वराला ओळखता येणं ही केवढी भाग्याची गोष्ट आहे कारण तोच सर्वेसर्वा आहे , त्याच्याजवळ सर्व शक्ति आहेत आणि सर्व त्याचीच लेकुरे आहेत. तो आपला पिता आहे आणि आपण त्याच्या राज्यांत येण्याची तो वाट बघत असतो. त्याच्या सान्निध्यांत आपण शांति आणि सौंदर्य मिळवणार आहोत. कारण आपल्याला त्यानेच निर्माण केलं आणि आपण त्या स्तरांपर्यंत उन्नत व्हावं हीच त्याची अपेक्षा असते.

तुम्हाला माहीत आहे की जगांत आपल्याला समस्यांना आणि टीकेला तोंड द्यावं लागतं , आपला अपमान करणारे व त्रास देणारे लोक भेटतात आणि अशांतूनच तुम्हाला तुमची शांति टिकवायची आहे. तुम्ही साक्षात्कारी झालांत म्हणून मी तुमचं खुप अभिनंदन करते. आज इतके साक्षात्कारी लोक एकत्र आलेले पाहून आईला अभिमानच वाटेल. माझं आतां वय झालं आहे हे तुम्ही पाहताच पण दहा वर्षांपूर्वी इतक्या संख्येनें साक्षात्कारी आत्मे पहायला मिळतील असं मलाही वाटलं नव्हतं. माझे वडील हे फार थोर व्यक्ती होते आणि त्यांनी मला सांगितलं होतं की जोपर्यंत हजारो लोकांना एकत्रितपणें साक्षात्कार होणार नाहीं तोपर्यंत तूं त्याच्याबद्दल बोलूं नकोस , जोपर्यंत सामुदायिक साक्षात्कार मिळत नाहीं तोपर्यंत लोक परमेश्वराला ओळखूं शंकणार नाहीं च संतानांही ओळखणार नाहींत. पण आज ते शक्य झालं आहे. घडून आलं आहे. साक्षात्कार ही कल्पना नाहीं. परमेश्वर ही पण नुसती कल्पना नाहीं हे सत्य ठरलं आहे आणि त्या आनंदाने व समाधानानें तुम्हाला 'सच्चिदानंद स्थिति' मिळाली आहे. सत् , चित् आणि आनंद यांचा आविष्कार झालेला पाहून मला फार आनंद होत आहे.

आणि प्रत्येकानें हेच ओळखायचं आहे की या जगांत पुष्कळ लोक आहेत जे थोर आत्मा आहेत. तुम्ही फक्त त्यांना शोधून त्यांच्या जवळ जायचं आहे आणि त्यांना ओळखायचं आहे. आताचें सहजयोगी दहा वर्षांपूर्वी व्हायचे तसे अस्वस्थ होत नाहींत. त्यांना आतां माहीत आहे की आतां या जगात सहजयोग जाणलेले खूप लोक आहेत. पण एवढं पुरेसं नाहीं. आपल्याला अजून पुष्कळ लोकांना 'जागृत' करायचं आहे. हजारो - लाखो लोकांना साक्षात्कार मिळायला हवा. तुम्ही माझा वाढदिवस साजरा करता तेव्हां हेच सिद्ध होतं की कलियुग आता संपलं आहे आणि कृतयुग सुरु झालं आहे. आणि हे कृतयुग संपूनही सत्ययुगाचा या पृथ्वीवर प्रारंभ होणार आहे.

तुम्ही परमेश्वराच्या प्रेमाची किंमत मोजू शकत नाहीं. कधीं कधीं मला याचं हसूं येत. सामान्य माणूस या प्रेमाला समजूं शकत नाहीं. कारण तो फार लहानशा कक्षेत जगत असतो. ते प्रेम अमर्याद आहे. आपण तर "अमर्याद , अपरंपार" हे शब्दही नीट समजूं शकत नाहीं कारण तसं कांही असूं शकतं ही कल्पना आपण करुं शकत नाहीं. आपण कृत्रिम आणि काल्पनिक जगांत वावरत असतो आणि भांडण करत बसतो. या सर्व मर्यादित धडपड करत असलेल्या माणसाला आणि त्यातून मिळणाऱ्या अनुभवांमुळे त्याला इतकं कण्डिशण्ड बनवून टाकलं आहे की परमेश्वर म्हणजे काय हे समजणं अवघड झालं आहे. परमेश्वरानें हे सर्व विश्व त्याच्या प्रेमांतून आणि करुणेतुन निर्माण केलं. तुम्ही मनुष्यप्राणी सुद्धां याच प्रेमांतून आणि करुणेतुन निर्माण झालात. परमेश्वराला कांहीही नको असतं. तो फक्त प्रेम करतो. आणि तुम्हाला तर कुठलीही अपेक्षा न करता , कसलंही कारण नसतांना प्रेम करणारा माणूसच ओळखतां येणार नाही. फक्त प्रेमासाठीं प्रेम. फक्त प्रेमासाठींच प्रेम करणारा एक माणूस सुद्धां आपण ओळखूं शकणार नाहीं. किंवा त्याची कल्पना करुं शकणार नाहीं. फक्त साक्षात्कार झाल्यानंतरच , जसजसे तुम्ही जास्त उन्नत व्हाल तेव्हा प्रेमाचा आनंद केवढा आहे हे समजेल. त्यानंतर परमेश्वराच्या बाबतीत पैशाचा विचारही तुमच्या मनांत येणार नाहीं.

माझ्या या भारतमातेला मी नमस्कार करते कारण ही योग्यांची भूमि आहे. भारतीय म्हणून तुम्ही विशेष नशीबवान आहांत कारण सारे अष्ट-विनायक इथें आहेत , सारी ज्योतिर्लिंग इथेंच आहेत , आदिशक्तीची सर्व पीठें इथें आहेत. कुंडलिनीची साडे-तीन पीठे तर महाराष्ट्रांतच आहेत. हे सर्व तुम्हांला माहीत आहे; आणि पाश्चिमात्यांकडून ही आपल्याला आणखी मिळालं आहे ते म्हणजे पाश्चात्य देशांत जन्मलेले थोर संतपुरुष. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते खरोखरच संत आहेत आणि एकदां सहजयोगांत आले की ते त्यालाच चिकटून राहणार आणि मग त्यांना दुसरं कांही नको असतं. त्याचं जीवन हे असं असतं. तसंच सर्वांनी समजून राहिलं पाहिजे. भारतीयांना साक्षात्कार त्यांच्यापेक्षा लवकर मिळतो पण तरीही तुम्ही लक्षांत ठेवायला हवं की सहजयोगामध्यें तुम्हाला मेहनत करुन इतकं पुढं यायला हवं की ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणें हा सहजयोगच महायोग होईल. माझी खात्री आहे कीं तुमच्या सर्वांच्या एकमेकांवरील प्रेमामुळें , माझ्या व साऱ्या मानवजातीवरील प्रेमामुळें माझ्या आयुष्यांतच तुम्ही , आंतून आणि बाहेरुन अशा स्थितीला येऊन पोचाल की सहजयोगी महायोगी झाले असं सर्वजण म्हणतील.

ही सृष्टी निर्माण करुन परमेश्वराला त्यांतून कांही फायदा नव्हता मिळवायचा अगदी कसलाही नाहीं. पैसा आणि तत्सम गोष्टी या तुमच्या कल्पना आहेत. त्यानें सृष्टि निर्माण केली कारण निर्मितीचा आनंद, त्याला या प्रेमाचा आविष्कार करायचा होता. त्या आविष्कारांतून ही सृष्टि निर्माण झाली. या व्यतिरिक्त त्याची कांहीच अपेक्षा नव्हती. मानवी मनाला त्या उंचीवर

आईनें सर्व सहन केलं - तुम्हाला जन्म मिळाला.हे सर्व कशासाठी ? हें सुंदर फुलासारखं होण्याचा उद्देश काय होता ? आणि हें फुलच स्वतःचाच नाश का करत आहे ? असं कधीं तुम्ही ऐकलं तरी आहे कां ? पाश्चात्य लोकांमध्ये हाच एक मोठा आजार आहे.फ्रेंच लोकाचं ठीक आहे.आज इथें आहेत त्यापेक्षां दुप्पट लोक तेव्हां होते.हे आश्चर्यच आहे.पण सगळ्यांना एकच त्रास होता , त्यांच्या मानसशास्त्रज्ञांनी , मनो वैज्ञानिकांनी एवढंच काय तर पुस्तकें, लेखक , तत्वज्ञ सगळ्यांनी त्यांना हा त्रास दिला - सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते स्वतःलाच शिव्याशाप देत राहतात , चेहरा सदोदित त्रासलेला - त्यांना विचारलं तर म्हणतात "माताजी , आम्ही फार अभागी लोक आहोत." जणुं निराशेलाच आमंत्रण देऊन स्वतःला सजवतात.

पण याच्यामागें एक सूक्ष्म विचार आहे जो लोकांना माहीत नसतो.हा काळ तुम्हाला आत्मसाक्षात्कार देणार आहे.ही सामुहिक जागृति येणारच आहे - हे आधीच केलेलं भाकित आहे.आणि हा फार महत्वाचा काळ आहे.सर्व ग्रह आणि तारे यांत मदत करणार आहेत. सारं विश्वच मुळी मदत करणार आहे. सर्व पंचमहाभूतं मदतीला येणार आहेत. आपण रंगभूमीवर आलो आहोत.पण हे कलाकार जेव्हां पडद्यासमोर येतात तेव्हां ते खचलेले असतात.ते त्यांची भूमिका करूं शकत नाहींत , काम करूं शकत नाहींत , अगदीं निष्क्रिय झाले आहेत.ते दुसऱ्याच कुठल्या तरी भूमिकेंत गुंतले आहेत.म्हणूनचं हा सूक्ष्म अर्थ जाणून घ्यायला हवा म्हणजेच ही अपराधीपणाची भावना जाईल.तुम्ही विरोधी शक्तींच्या प्रभावांत येऊं नका , त्या तुमच्यांत पेरलेल्या ॲटम बॉम्बसारख्या आहेत.

पण याचं सुसुत्रीकरण , तुमच्या अंतरंगातील सर्व व्यक्तिमत्वाचे सुसुत्रीकरण शक्य केव्हा होतं जर तुम्ही , या ना त्या मार्गानें , हे सुसुत्रीकरण करणारी शक्ति , जी तुमच्यांत आहे पण ती क्षीण झाली आहे , जागृत केली तर ही आतां एक शेवटची संधी तुम्हाला प्राप्त झाली आहे.या विरोधी शक्ती , ज्यांची तुम्हाला अजून पूर्ण जाणीव झाली नाहीये , कार्यरत झाल्या आहेत , त्या तुम्हाला कुठल्या अंधारकोठडीत नेतील सांगता येणार नाही.त्या सर्वांना तोंड देण्याचा एक-च मार्ग आहे तो म्हणजे आत्म्याच्या प्रकाशांत येणं , जो सुसुत्रीकरण करणारा आहे.अंधारात नेहमी तोडफोडच होत असते.आपण प्रकाशात आलो कीं संस्था , प्रशासन याची जरुर अजिबात पडत नाही.

नवीन - नवीन शोध लावायचे आणि त्यातून पुढें आपलाच नाश करुन घ्यायचा हे फक्त मनुष्यप्राणीच करतो.अशी ही वृत्ति (शक्ति) आपल्या मनांत , आपल्या अंतरंगात , आपल्या पूर्ण व्यक्तिमत्वात काम करते आणि मग आपणच आपला तिरस्कार करूं लागतो - मला कधीं कधीं वाटतं आपणच आपला नाश करुन घेतो.ही परिस्थिति निर्माण व्हायला विकृत लेखक , कण्डिशनिंगबद्दल बडबडणारे लोक कारणीभुत होतात. आपण जास्तच कण्डिशनड होतो. खरं म्हणजे तुम्ही पक्षांसारखं गायला आणि चिवचिव करायला हवं , एकाद्या फुलासारखं गोंडस आणि प्रसन्न असावं.पण प्रत्यक्षांत माणसं तुम्हाला असमाधानी दिसतात.हे कां होतं ? कारण तुम्ही तुमच्या खऱ्या अस्तित्वापासुन अलग होता , ज्याच्यामुळें तुम्ही पूर्णपणें समग्र व्हायचं त्याच्यापासूनच तुम्ही तोडून घेता. हैड्रोजन ॲटमचं विभाजन केल्यावर त्यांत फार मोठी शक्ति निर्माण होते. त्याचप्रमाणें तुम्ही तुमच्या खऱ्या अस्तित्वाचं विभाजन करतां - मग एक शारीरिक अर्थानें स्वतः , एक मानसिक स्वरुपांत आणि आणखी एक दैवी स्वरुपांत.या वेगवेगळ्या स्वरुपांना एकत्र जोडणारी यंत्रणा नाहीशी होते.अशा तऱ्हेनें तुमचं समग्र व्यक्तिमत्व विभागल्यावर तुम्ही स्वतःला अपराधी समजूं लागता आणि ही भावनाच पुढच्या तीव्र अंतःशक्तीचं लक्षण आहे.अशाच तऱ्हेनें आपण आपलाच नाश करुन घेणार आहोत.दुसरं कांही नाही.आपला विनाश कुठल्या बाहेरच्या कारणांनी नाहीं होणार कारण त्याचं नियमन करणं शक्य आहे.पण हें आंतुनच होणार आहे.आणि यापुढे आपण जे कांही करणार आहोत त्यामुळें आणखीनच विभाजन , तोडमोड होणार आहे आणि या विरोधी शक्तीच आपल्यामधें ठाम मांडून बसणार आहेत.तुमच्यातील जाणीव ही दुसरं कांही नसून तो तुमच्यातील आत्म्याचा प्रकाश आहे जो आजपर्यंत तुम्हांला माहीत नव्हतां.आत्म्याचं सदैव तुमच्याकडे लक्ष असतं.हे एका विशिष्ट मर्यादेपर्यंत चालतं.तुमचा मुर्खपणा , तुमची परिसीमा त्याला माहीत असते.हे सर्व खूप दूरपर्यंत चालतं आणि मग एक दिवस थांबतं तेव्हां मनुष्याला मृत्यु येतो किंवा त्याला कांही तरी त्रास होऊं लागतो.तो एक प्रकारे वेडा , चमत्कारिक वगैरे बनतो , त्याला आणखी कांही रोग होतात , कॅन्सरसारखे आजार , जे एकादशांमुळे होतं. हे तुम्हाला माहीत आहेच. अशा तऱ्हेने आपण सर्व वाईट गोष्टींच्या मागें लागल्यानें ही विरोधी शक्ती आपल्यांतच जमून येते.

या सर्वांपासून वाचवून घ्यायचा एकच एक मार्ग आहे तो म्हणजे आत्मसाक्षात्कार मिळवणें.बाकी इतर सर्व गोष्टी फक्त गोंधळ माजवणाऱ्या आणि विनाशाकडे नेणाऱ्या आहेत.पण ही एकच गोष्ट जर तुम्हांला मिळाली तर सर्वांतून तुम्ही पार होणार आहांत. जणु एक दिवा लावायचा. बस्स. पण लोकांना आत्मसाक्षात्काराचं महत्वच समजत नाहीं.आज मानवजात कुठल्या स्थितीकडे आली आहे बघा , आणि त्यांना त्यापासुन वाचवायचं असेल तर नुसतं दुःख करीत बसण्यानं कांही होणार नाहीं.मी सुद्धा अशीच दुःखी आहे.कांहीतरी सांगून मला तुमची किती काळजी आहे , मला साऱ्या जगाची काळजी आहे वगैरे वगैरे मला म्हणावं लागतं , तुमच्याचप्रमाणें मी सुद्धा रडत रहावं असं तुम्हांला वाटतं.पण तुमच्याजवळ कांही उपाय आहे कां ? का दहा लोक रडत आहेत म्हणून आपणही त्यांच्याबरोबर रडायचं ? पण हा जो एकच एक उपाय आहे, ज्याच्याबद्दल आजपर्यंत सांगितलं,सुचवलं गेलं आणि कितीतरी पूर्वीपासुनच हे भाकीत सांगितलं गेलं, त्याच्याकडे यायला कोणी तयार नाही. बायबल मध्येंसुद्धा म्हटलं आहे "तुमचा पुनर्जन्म होणार आहे. ख्रिस्त तुमच्या हृदयांत अवतीर्ण होणार आहेत.

मूलाधारचक्रामधें आहे. पुष्कळ लोक इथें एक चूक करतात, कारण त्रिकोणी माकडहाड हे कुंडलिनीचं स्थान आहे (मूलाधार) आणि त्याच्याखाली श्रीगणेश मूलाधार चक्रावर आहेत, या दोघाचं कार्य अगदीं वेगळं आहे हें पण तुम्हाला माहीत आहेच.

माझ्या कांही फोटोमध्ये श्री गणेश माझ्यामागें माझ्याही वरपर्यंत आहेत हें तुम्ही पाहिलं आहे - इतर देवतांबरोबरही ते असेच असतात. भारतीय लोकांना श्री गणेशांची पावित्र्य-शक्ति माहीत आहेच, आणि म्हणून स्वतःच्या पावित्र्याची काळजी घेण्याचं महत्व ते ओळखतात. परकीय लोकांना त्यची एवढी जाण नसते. त्यांच्यामध्यें उपभोगवृत्ति जास्त आहे. भारतीय लोकांना याची जाण आहे आणि कांही थोडे लोक शुद्धता व पवित्रता पाळत नसले तरी ते वरवर तसं दाखवतात. याचा एक फायदा म्हणजे अनीतिचा कॅन्सर समाजांत उघड-उघड पसरुं शकत नाही. उलट परकीय लोकांच्यामधें आपण याबाबतीत कांही तरी मोठं, नवीन काम करता आहोत आणि त्याला आपणच योग्य आहोत ही वृत्ति आहे. भारतीय लोक याला मूर्खपणा समजतात. अमेरिकेमधें तर श्रीगणेश कुठेंच दिसत नाहीत. आतां सर्वनाश व्हायची वेळ आल्यावर मात्र त्यांना पावित्र्याचं महत्व कळूं लागलं आहे आणि हे पण त्यांच्यातले जे सहजयोगी झाले आहेत त्यांनाच.

श्री गणेशांचा सर्वांत मोठा गुण म्हणजे त्यांची अबोधिता. तुम्ही जेव्हां अबोधित होता तेव्हा तुम्ही सहज व शुद्ध बनता. ख्रिस्त म्हणाले होते, "तुमच्या उद्धाराची वेळ येईल तेव्हां तुम्ही लहान मुलांसारखे व्हाल." श्रीगणेशांची कृपा असतेच पण विशेष म्हणजे या अबोधितेच्या शक्तीमधूनच तुम्हाला आत्मसाक्षात्कार होत असतो.

बुद्धिवादी लोकांना श्रीगणेश हे आपलं विशेष दैवत आहे ही गोष्ट एकदम पटत नाहीं. अडचणी ही आहे की जोपर्यंत ते सूक्ष्मात येत नाहीत तोपर्यंत सर्व देव-देवता आपल्या अंतरंगातच आहे हें त्यांना समजणार नाहीं. श्रीगणेशांना चार हात आहेत आणि कार्बनच्या अणूलाही चार धारणा (**Valencies**) आहेत. या कार्बनकडे तुम्ही डावीकडून पहाल तर "स्वस्तिक" दिसेल, उजवीकडून पहाल तर "ओंकार" दिसेल, आणि खालून पहाल तर "अल्फा व ओमेगा" हे चिन्ह दिसेल. येशू ख्रिस्त म्हणाले "मी अल्फा आहे आणि मीच ओमेगा आहे" - अल्फा म्हणजे सुरुवात व ओमेगा म्हणजे शेवट. अल्फा व ओमेगा चिन्हें (लिपीमध्ये लिहिलेली) त्या अणूवर दिसतात. मी जेव्हां हे आत्मीयतेने परकीयांना सांगितलं तेव्हां ते त्याच्यावर संशोधन करायला लागले. त्यांनी कार्बन-अणूचे तीन्हि दिशांनी फोटो काढले, त्या फोटोंत मी वर सांगितली अगदी तशीच रचना दिसली. आतां येशु ख्रिस्त म्हणतात की हाच श्रीगणेश आहे. हाच ॐकार आहे. हाच स्वस्तिक आहे हे सिद्ध झालं.

हिटलरने पण स्वस्तिक हे चिन्ह वापरलं. घड्याळाच्या फिरणाच्या काट्याच्या दिशेप्रमाणें जे स्वस्तिक काढतात ते अबोधिता व प्रगतीचं द्योतक असतं. पण त्यानं वापरलेलं स्वस्तिक चिन्ह उलट्या दिशेनें काढलेलं होतं आणि ते विनाशाच द्योतक असतं. म्हणजेच शक्ति जेव्हां घड्याळाविरुद्ध दिशेने फिरते तेव्हा खूप त्रास व्हायला लागतात, असा माणूस दुर्धर व्याधींनी पीडित असतो. काल एक माणूस आला होता त्याला स्नायूचं दुखणं होतं, या दुखण्यात **Myelitis** - स्नायू हळुहळु निकामी बनत जातात. श्रीगणेशांची शक्ती जेव्हां अशीच उलट्या दिशेने फिरायला लागते तेव्हां असेच त्रास होतात. हिटलरची अगदी तीच अवस्था झाली जेव्हां त्याने स्वस्तिकामधून श्रीगणेशांची शक्ति वापरायचा प्रयत्न केला. वरच्या संशोधनामध्ये स्टेन्सिल वापरलं गेलं. जोपर्यंत ते बरोबर फिरवलं तोपर्यंत सर्व ठीक झालं पण जेव्हां नंतर ते स्टेन्सिल उलट फिरवलं गेलं तेव्हा त्याला अपयश येऊं लागलं. अशा तऱ्हेनें चिन्हाचा चुकीचा उपयोग केल्यामुळेंच परिणामी तो रसातळाला गेला.

पुण्यामधे जाहीर सभांमधे तीन-चार वेळा मी लोकांना सांगितलं की श्रीगणेश यांचा आदर करा, त्यांच्यासमोर प्रामाणिकपणें काम करा त्यांना चुकीचं, अपवित्र अशी कुठलीही गोष्ट वा काम आवडत नाही. लोकमान्य टिळकांनी चालू केलेला हा गणेशोत्सव दहा दिवस चालतो. पण पुण्यांतला हा उत्सव पाहिल्यावर मला खरोखरच धक्काच बसला. श्रीगणेशांच्या मूर्तीपुढें अश्लील नाच - गाणी चालली होती. महिलांचे कपडेहि असभ्य होते. दारु - सिगरेटचा अतिरेक चालला होता. श्रीगणेशाचं वाहन विजय आहे (जयदूत वाहन). मी लोकांना सांगितलं की श्रीगणेशांच्या रागापासून सावध रहा. माझ्या भाषणामधूनही मी सांगत होते की भूमितत्व असंच असतं की त्याचे नियम जर तुम्ही पाळले नाहींत तर धरणी कंपसुद्धा होऊ शकतात. आणि तसंच झालं. गणपति विसर्जनाच्या दिवशी जे दारूच्या नशेनें झिंगून नाच-गाण्यांत धुंद होते त्यांच्या जमिनी दुभंगून खचल्या. पुष्कळांना वाटतं की पाश्चात्य देशांत जर हेच चालतं तर आमचं काय चुकलं? पण त्यांना कळत नाहीं की विनाशकारी शक्ति भयानक असते आणि त्याची सुरुवात माणसाच्या आंतमधूनच होते. इथें बसून त्या विनाश-शक्तीची आपल्याला कल्पना येणंही शक्य नाही. तिकडे ६५ टक्के पेक्षा जास्त लोक दुर्धर रोगांनी (उदा. सिझोफ्रेनिया) ज्यांची नांवपण आपल्याला टाऊक नाहीत- ग्रासलेले आहेत. अशा तऱ्हेचे हे रोग कुठवर पसरले आहेत त्याचीही आपल्याला कल्पना नाहीं. इथें बाहेर खूप प्रकारचे जंतू, किडे, धूर, धूळ आहेत. पण माणसं अजून ठीक आहेत. श्रीगणेशांच्या विरोधांत जाणं म्हणजे आईसमोर पाप करणं आहे. हे सर्व केव्हांपासून चालूं झालं म्हणालं तर फ्रॉइडसारखे घाणेरडे लोक आले आणि नीतिमत्तेविरुद्ध बडबडूं लागले तेव्हांपासून लोकांच्या मनातली ख्रिस्ताची प्रतिमा त्यांनी डागळली आणि स्वतःचाच उदो-उदो करु लागले. त्यालाही कॅन्सरसारख्या रोगांनी शेवटी यातनामय मृत्यू आलाच म्हणा.

श्रीगणेश जर तुमच्या चक्रावर प्रसन्न झाले तर कुठलेही मानसिक आजारही सहज बरे होऊं शकतात. ते एक चिन्ह आहे. शब्दांनी जेव्हां एखाद्या वस्तूचं वर्णन करता येत नाहीं तेव्हां असं चिन्ह वापरतात. आजकाल बऱ्याच जणांची अशी समजूत आहे कीं अशी चिन्हं म्हणजे नुसती कल्पना असते आणि माणूस त्याच्यातच अडकून नुसता त्याचा विचारच करु लागतो. पण सहजयोगांत ही चिन्ह म्हणजे सत्य आहे हे आपण सिद्ध करु शकतो. मानवी मन आणि दृष्टि मर्यादित असते. त्याला जर सत्य बघायचं असेल तर त्यानें आजपर्यंतच्या समजुती टाकून देऊन त्याचा प्रत्यक्ष अनुभवच घ्यायला हवा जो त्याला आजपर्यंत कधीच आला नव्हता. मानवाच्या त्याच्या सीमित जाणीवेतुन त्याला सत्य समजूं शकत नाहीं. म्हणूनच श्रीगणेशांना समजून घेऊन त्यांची पूजा करणं जरुरीचं आहे. श्रीगणेश जोपर्यंत या दिल्लीमध्यें प्रस्थापित होत नाहींत तोपर्यंत इथले राजकीय प्रश्न सुटणार नाहीत. त्याकरतां आपल्याला स्वच्छ व शुद्ध चारित्र्याचे लोक, ज्यांची अबोधिता बालकासारखी आहे. जरुर आहेत. लोकांना वाटतं की असे लोक देशाचा कारभार कसा करणार, आणि असे लोक आहेत कुठें? आजकाल सरकारी यंत्रणेमधें वरच्या जागांवरचे अधिकारी देखील इतके भ्रष्ट झाले आहेत की ते जनतेची प्रत्येक बाबतीत दिशाभूल करत आहेत, कारण आंतमधून ते स्वतः असुरक्षित आहेत, परमेश्वर हीच खरी संपत्ति आहे हें त्यांना अजून समजलं नाहीं.

तुम्ही जर सहजयोगी असाल तर तुम्ही दररोज ध्यान केलंच पाहिजे, प्रथम डावी नाडी, मग उजवी नाडी आणि नंतर दोन्ही नाड्या. डाव्या बाजूकडचे

गुण अग्नितत्वाचा (प्रकाश) उपयोग करतात - जे गणेशतत्त्व आहे, त्याचं काम अंधार नाहींसा करणें.त्यामुळें आपली पचनशक्ति व पचनक्रिया सुधारते. आपलं शरीर सुदृढ आणि कार्यक्षम रहावं म्हणून रोज आपण त्याची काळजी घेतो त्यापेक्षा जास्त काळजी आपण आपल्या अंतरंगातील घाण काढून टाकण्यासाठी घेतली पाहिजे, ही स्वच्छता झाल्यावर, जसं आपण आरशांत स्वतःला बघतो त्याप्रमाणें आपण स्वतःच आपल्या अंतरंगाची परीक्षा घ्यायला हवी, यावेळी श्रीगणेशांना फक्त मूलाधार चक्रावरच नव्हे तर सर्व चक्रांवर येण्याचं आवाहन करावं, त्यांची सत्ता आज्ञा चक्रांपर्यंत आहे.येशू ख्रिस्त म्हणाले होते "मी रस्ता आहे.मीच मार्गस्थ आहे." ते कधीच म्हणाले नाहींत की "मी म्हणजेच सर्वनाश आहे." इथुन पुढें त्यांनी सर्व आदिशक्तीवर सोपवलं आहे.

सर्व धर्मामध्यें शुद्धता व पवित्रता यांची महती सांगितली आहे, तीच श्रीगणेशांची मुख्य शक्ति आहे. माणूस जेव्हां मर्यादाचं उल्लंघन करतो व स्वतःच्या शुद्धतेचा आदर करत नाहीं त्यावेळी तो मोठमोठ्या संकटात अडकतो कारण श्रीगणेशांची शक्ती याच्यापासुन दूर गेलेली असते.त्याला वरीच दुखणी व आजार होतात. सहजयोग्यांनी नेहमी श्रीगणेशांना आवाहन करावं.त्यांच स्मरण करावं, जेव्हां मनात वाईट विचार येत असतील तेव्हां त्यांच्या शक्तीसाठीं आणि मदतीसाठीं प्रार्थना करावी.सातत्य आणि शुद्धता या गुणांमुळें मानव एवढा उन्नत होऊं शकतो की त्याचाच विश्वास बसणार नाहीं. ज्यांना श्रीगणेश मुलाधार चक्रावर दिसले त्यांनी चुकीने ते मुलाधार मानलं, जे कुंडलिनीचं स्थान आहे. याच कारणामुळें तांत्रिक लोकांनी खूप समस्या निर्माण केल्या.

शुद्धता आणि पवित्रता हा आपला वारसा आहे आणि आपण त्याचं जतन केलं पाहिजे."विवाह" ही एक संस्था म्हणून त्याचाच भाग आहे.ज्यांनी ज्यांनी आपल्या वंशांचं (दहा गुरु) रक्षण केलं त्यांनी त्याकरतां खूप कष्ट घेतले आहेत. उदा.मोहम्मद साहेब.त्यांना तीन बायका असल्याबद्दल पुष्कळ बोलतात, पण त्या समयानुसार ते योग्यच होतं.त्याकाळीं पुष्कळ तरूण युद्धांत मारले गेले आणि त्यांनी जर हा मार्ग दाखवला नसता तर अनेक तरुण विधवा, उपजीविकेचं कांहीच साधन न उरल्यामुळें वाममार्गाकडे वळल्या असत्या, कारण त्यांच्यांशी लग्न करायला उपवरच नव्हते.विवाह ही एक संस्था म्हणून पवित्र बंधन आहे आणि म्हणूनच स्त्रियांचं शील राखण्याकरतां त्यांनी वरीच लग्नं केली. आपण हे समजून घेतलं पाहिजे. आतां श्रीकृष्णांनासुद्धा सोळा हजार बायका होत्या, शिवाय पांच वेगळ्या.पण सोळा हजार या त्यांच्या शक्त्या होत्या व पांच ही पंचमहाभूत तत्व होती.त्या शक्तींचा व तत्वांना राजमान्यता देण्यासाठी त्यांनी त्यांच्याशी विवाह केले.आतां ते पुरुष होते म्हणून त्यांच्यावर कुत्सित टीका झाली. मी आई आहे व मी मुलांना जन्म देऊ शकते म्हणून माझी गोष्ट वेगळी आहे.तर हा वादविवाद टाळण्यासाठीं त्यांना श्रीकृष्णांनी पत्नी म्हणून स्वीकारलं.म्हणून या अवतारी लोकांनी वरवर विचित्र वाटणाऱ्या गोष्टी कां केल्या ते आपण नीट समजुन घेतलं पाहिजे.ते "परमात्म्या' चेच अंश (अवतार) होते आणि त्यांनी जे कांही केलं ते समाजहितासाठीच केलं.श्रीगणेश त्यांच्यामधें पूर्णपणें जागृत व कार्यान्वित होते.

आपण लक्षांत घ्यायला हवं की नुसती पूजा करुन, भजनांतुन स्तुति करुन, त्यांच्याबद्दल भाषण ठोकून आपल्याला श्रीगणेश प्राप्त होणार नाहींत तर आपण त्यांना आपल्यामध्येंच जागृत करायला हवं.तुमच्या सर्वांमधे ते जागृत झाले आहेत पण अजून पूर्णपणें नाहीं.म्हणूनच तुमचं स्थिर रहात नाहीं.प्रत्येकानें आपल्या स्वतःच्या चारित्र्याचा सन्मान राखला पाहिजे. आपलं व्यक्तिमत्व आपल्या काबूत ठेवलं पाहिजे, त्याचं प्रदर्शन करु नये, त्याची विक्री करुं नये, किंवा साध्या दृष्टिक्षेपानेंही त्याच्या अस्तित्वाला बाधा होऊ देऊ नये.या सर्व चुकीच्या गोष्टी आहेत. प्रत्येकानं हे समजलं पाहिजे. अशा वागण्यानं साक्षात्कार होणारच नाहीं पण चित्त मात्र भरकटेल.मग तुमचं चित्त भलत्या मार्गाला लागेल आणि शेवट तुम्हाला त्रास व आजार भोगावे लागतील.कांहीही होऊ शकतं.

आता 'स्तुति' करण्याचे वेगवेगळे प्रकार आहेत. येशू ख्रिस्ताची स्तुती करतांना मोहम्मदसाहेब म्हणाले की "तो सर्वार्थानें निष्कलंक आहे.आपणही रोजच्या रोज जास्त निष्कलंक बनत राहूं याची काळजी घेतली पाहिजे.ही स्थिति मिळवण्यासाठी आपलं लक्ष इतकं शुद्ध झालं पाहिजे की कुठलीही चूक आपल्या हांतुन होणारच नाहीं.यामधें आपलं मन अजिबात बाजूला ठेवायचं.एकदा ही अवस्था प्रस्थापित झाली आणि आपण चुकीची गोष्ट करु शकत नाहीं हे समजलं की बाहेरच्या कसल्याही दुष्ट, वाईट, घाणेरड्या प्रवृत्ति किंवा मोह आपल्यापासून दूरच पळतात. म्हणून मी म्हणते की लहान मुलासारखं निरागस, निष्पाप व सरळ होणं ही सर्वांत सोपी गोष्ट आहे. आजकाल पाश्चिमात्य देशांत मी बघते की लहान मुलांवर सर्व बाजूंनी बाधांचा हल्ला होत आहे, जसा एकादा विनाशकारी प्रवाहांचा स्रोत त्यांच्यावर चालून येत आहे.इथें असा हल्ला होणार नाहीं याबद्दल आपण खूप सतर्क राहिलं पाहिजे.आपली भारतीय संस्कृति इतकी समृद्ध व उत्तम आहे की मुलं खरोखरच लवकर उन्नत होऊ शकतील. या मुलांकडे आणि त्याचबरोबर स्वतःकडे जाणीवपूर्वक लक्ष देणें ही तुमची जबाबदारी आहे.मुलांना ते सहजयोगी असल्याची सतत आठवण करुन देणं आणि कुठल्या गोष्टी करायच्या नाहींत हें त्यांना समजावून सांगणं जरुरीचं आहे. आजकाल समज असा आहे की मुलांना अमुक करुं नको असं सांगणं हे त्यांच्या प्रगतीला अडसर घालणं समजतात.परदेशांत मुलांना काय वाटेल ते करुं देतात. मग त्यांना जन्म तरी कां दिलात?

मग तुमची जबाबदारी काय राहिली? तुम्ही काय करायला हवं? तुम्ही त्यांना समजावलं पाहिजे, "तुं हे करतोस ते चूक आहे, आम्ही मग काही मदतीला येणार नाही आणि तुला पैसा पण देणार नाही"असं सांगा

नाहीं तर आपला सारा समाज त्याच चुकीच्या मार्गाकडे जाईल.त्यातून आपल्याला चांगल तर कांही मिळणारच नाही, उलट बाहेरच्या वाईट गोष्टींचाच आपण नकळत स्वीकार करु मला आशा आहे कीं श्रीगणेशांच कार्य म्हणजे "सह" आहे हे तुम्ही सर्व जण समजाल. त्यांच्याकडून तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे, त्यांच्या मदतीनेंच तुमची सर्व चक्रे स्वच्छ व शुद्ध होतात.त्यांच्याकडून तुम्हाला प्रकाश मिळतो आणि तुम्हाला व तुमच्या दृष्टीला नेहमी प्रकाशाकडे वाटचाल करता येते. म्हणून श्रीगणेशांचा अपमान आपल्याकडून कधीही होणार नाहीं ही गोष्ट तुमच्यामधें अगदीं खोलवर रुजली पाहिजे.

माझी आशा आहे की या पूजेनंतर या दिल्लीमध्यें तुम्हा सर्वांच्या हृदयांत एक नवीन "धर्म" प्रस्थापित होईल - शुभंकर धर्म.जो माणूस "शुभ" आहे त्यांच्या नुसत्या एका दृष्टिकटाक्षानें सर्व लोक ठिक होतात - एका दृष्टिक्षेपांत पूर्ण निरिक्षण होतं, म्हणून "कटाक्ष कटाक्ष निरीक्षण" असं म्हणतात.तुमची स्मरणशक्ती वाढते,डाव्या बाजुकडील सर्व दोष श्रीगणेश जागृत झाल्यावर नाहींसे होतात.अर्थात हे सर्व बाहेरुन कांही मिळण्यासारखं नाहीं तर ते आंतल्या आंतच होत असते.हे तुम्ही मिळवूं शकाल आणि त्याच्या प्रकाशांत तुम्ही पण प्रकाशित व्हाल ही मी आशा करते.या शक्तीचं ज्ञान आणि जाणीव सर्व ब्रह्मांडांत पसरुं दे आणि सर्व लोकांना साक्षात्कार होऊं दे हेच माझे तुम्हा सर्वांना आशीर्वाद आहेत.

श्रीगणेशांबद्दल बोलायला लागलं तरी ध्यान लागतं आणि आपलं लक्ष आंत खोल जातं.जसं मोठ्या माणसांच्या ग्रुपमध्यें एकादा गोड मुलगा आला तर सर्वांचं लक्ष त्याच्याकडेच जातं.ह्याला "वात्सल्य रस" म्हणतात.हे वात्सल्य तुम्ही सर्वजण जीवनांत आणाल अशी माझी आशा आहे.

परमेश्वराचे तुम्हांला अनंत आशीर्वाद.



सहजयोगी सभासदांसाठी विनामुल्य